
# रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, २१ मे २०२३



# कर्नाटक सी.एम. खुर्चीच्या लढाईत!

# सिद्धरामय्यांनी मारली बाजी !

**आधुनिक केसरी**

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले पण मुख्यमंत्रीपदासाठी सिध्दारमैय्या व डी. के. शिवकुमार या दोन वरिष्ठ नेत्यांनी दावा केला.त्यामुळे काँग्रेससमोर राजकीय संकट निर्माण झाले होते! खूर्चीची ही लढाई ही पाच दिवस चालली.शेवटी ज्येष्ठ आणि अनुभवी नेते सिध्दारामय्यांनी यात बाजी मारली आहे. तर नेते डी. के. शिवकुमार यांना अखेर उपमुख्यमंत्रीपद स्विकारावे लागले.कर्नाटक निवडणुकीमुळे काँग्रेस पक्षाला जीवदान मिळाले तर भाजपासाठी ही निवडणूक धक्कादायक ठरली आहे. स्वातंत्र्यानंतर १९५६ म्हैसूर राज्याची निर्मिती करण्यात आली व १९७३ मध्ये राज्याचे कर्नाटक नामांतर करण्यात आले.१९४७ पासून राज्यात २३ मुख्यमंत्री झाले. राज्यातील सत्तेत काँग्रेस पक्ष अनेक वर्षे राहिलेला आहे.विरोधी पक्ष जनता पक्ष, नंतर भाजपा थोडी फार संधी मिळाली.**

देशात प्रत्येक निवडणुकीचे पक्षाचे यश हे जाती-पात, धर्मावर आधारलेले आहे.या राज्यात लिंगायत समाजाची प्राबल्य अधिक आहे. त्यामुळे सर्व राजकीय पक्ष राज्याचे नेतृत्व समाजाचे प्राबल्य नेत्यांकडे देत असतात. तसेच वोक्कालिगा, नंतर मुस्लिम मतदाराच्या एकगठ्ठा मताला अधिक महत्व आहे. हिंदु मतदार आहे, पण तो विभिन्न जातीत विभागला गेला आहे. राज्यात २०१८ च्या विधानसभा निवडणुकीत एकूण २२४ जागा पैकी भाजपाला सर्वाधिक १०४ जागा मिळाल्या, तर





कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


काँग्रेसला ८० व जनता दल ( एस )३७ जागा जागेवर यश मिळविले होते.पण सत्तेसाठी किमान ११३ जागा बहुमत मिळणे आवश्यक असते.तेंव्हा भाजपाला बहुमताचा हा आकडा जुळविता आला नाही.प्रारंभी भाजपाचे ज्येष्ठ नेते बी.एस.युदियुरप्पा हे मुख्यमंत्री झाले.पण काँग्रेसने भाजपाला बहुमत मिळू नये, यासाठी कोंडी केली.त्यामुळे येदियुरप्पा यांना ५५ तासात राजीनामा द्यावा लागला. राज्यातील ते अल्पकालीन मुख्यमंत्री ठरले. नंतर काँग्रेसने जनता दलाचे ( एस )चे एस.डी. कुमारस्वामींच्या पक्षाला कमी जागा मिळाल्या असताना मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली. त्यामुळेच कुमारस्वामी हे मुख्यमंत्री झाले.काँग्रेसची ही खेळी भाजपाला सत्तेपासून रोखण्यात यशस्वी ठरली!त्यानंतर काँग्रेस नेत्यांनी कुमारस्वामींना इतके छळले की, ते अक्षरशः रडले! नंतर काँग्रेसचा गट भाजपामध्ये गेला. राज्यातील सत्तेचे गणित बदलले.भाजपाला सत्तेचा मार्ग मोकळा झाला. भाजपाचे येदियुरप्पांच्या त्यानंतर बसवराज बोम्मई हे मुख्यमंत्री झाले. त्यांनी हा कार्यकाल पूर्ण केला.२०२३ मध्ये राज्यात पुन्हा भाजपाचे सरकार येईल असा आत्मविश्वास होता, तोच अंगलट आला आहे.
२०२३ च्या कर्नाटक विधासभा निवडणुकीपूर्वी व निवडणुकीत मतांच्या धृव्रीकरणाचा प्रयत्न काँग्रेस व भाजपाने केला.राज्यात कट्टर मुस्लिम मुस्लिम संघटनेने 'हिजाब' प्रश्न जाणीवपूर्वक निर्माण केला. कारण कर्नाटकात भाजपाची सत्ता होती.काँग्रेसने"हिजाब' चे पाठराखण केले तर भाजपा व हिंदू संघटनांनी विरोध केला.यातून हिंदु -मुस्लिम वादाला तोंड फुटले, हे प्रकरण उच्च न्यायालय नंतर सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले. संपूर्ण देशात' हिजाब' प्रकरण गाजले.याचा परिणाम राजकीय पक्षावर होणार होता, तो निश्चितच होता.काही राज्ये तुष्टीकरणाच्या नीतीतून मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याचे प्रयत्न करीत आहेत.घटनेत धर्माच्या आधारावर आरक्षण देता येत नाही. कर्नाटकात मुस्लिमांना आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता.भाजपा सरकारने हा निर्णय रद्द केला.भाजपा सरकार मुस्लिम विरोधी आहे, असा अपप्रचार काँग्रेसने करुन 'मुस्लिम व्होट' बँक मजबूत केली.या पक्षाचे धोरण म्हणजे 'मु मैं राम, बगल मै छूरी'असे आहे. धर्मनिरपेक्षाचा अर्थ काही पक्ष राजकीय स्वार्थासाठी आपल्या सोयीनुसार काढत आहेत.धर्माच्या आधारावर दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकले नसते.पण भाजपाला इतर समाजाला खूष करावयाचे होते, त्याच अपेक्षेने आरक्षण रद्द केले.यामुळे मुस्लिम मतदार भाजपाच्या विरोधात गेला.केंद्रातील भाजपा सरकारने बंदी घातली होती, त्या बंदीला काऊंटर म्हणून तर कर्नाटक काँग्रेसने राज्यात काँग्रेसची सत्ता आली तर 'बजरंग दला'वर बंदी घातली जाईल, असे नमुद केले! पण बजरंग दल ही धार्मिक संघटना आहे, ती काही राष्ट्रविरोधी संघटना नाही.काँग्रेसने इतर कट्टर धार्मिक संघटनेवर बंदी घालण्याचा उल्लेख जाहीरनाम्यात का केला नाही.पक्षाने हा उगावूपणा का केला ? केवळ काँग्रेसने यातून मुस्लिम मताचा डाव खेळला आहे!भाजपाने लगेच प्रश्न उचलला! पंतप्रधान मोदी यांनी तर जाहीर सभेत 'बजरंग बली 'जयघोष केला!त्याचप्रमाणे 'केरळ स्टोरी या'चित्रपटाला मोदीने समर्थन केले तर काँग्रेसने विरोध केला! बजरंग दलाच्या बंदी'च्या प्रस्तावामुळे हिंदु संघटना रस्त्यावर उतरल्या पण यातून हिंदू - मुस्लिम समर्थक कोण ? हा संदेश मतदारापर्यंत निर्माण. काँग्रेस मात्र यशस्वी झाला! त्यात मुस्लिम मतदार एकवटला तर हिंदु मतासाठी एकवटाला नाही.या प्रश्नावरुन काँग्रेस पक्ष बॅकफूटवर गेला, असे वाटले होते!पण नेते डी.के शिवकुमार यांनी मात्र राज्यात पक्षाची सत्ता येताच की, बजरंग बलीचे मंदिरे बांधले जातील, असे सांगितले! वास्तविक धर्मनिरपेक्ष सरकारला धार्मिकस्थळे उभारता येत नाही.यातून मुस्लिम समाजाने काँग्रेसच्या बाजूने भक्कम मतदान केले!काँग्रेसने सर्वाधिक १३५ जागा जिंकल्या तर मताची टक्केवारी ४२.९ टक्के, तर भाजपा केवळ ६६ जागेवर समाधान मानवे लागले! मताची टक्केवारी ३६ टक्यावर गेली. जनता दल ( सेक्युलर ) यावेळेस १९ जागा मिळाल्या आहेत.मताचे टक्केवारी १३.२९ इतकी आहे.या पक्षाची मते काँग्रेसच्या बाजूने फिरली काँग्रेसने 'जेडीएस' ची साथ सोडली आहे.त्यांना आता "जेडीयु"च्या मदतीची गरज नाही.या सर्व घटनांमुळे काँग्रेस पक्षाचा फायदा झाला. हिंदू मतदार मात्र गाफिल राहिला व तो विभागला गेला. यात भाजपाचा पराभव नव्हे दारुण पराभव झालेला आहे.यामुळे दक्षिणेतील एकमेव राज्य भाजपाच्या हातातून गेले आहे.काँग्रेसची आता चार राज्यात सत्ता आलेली आहे.कर्नाटकातील यशामुळे काँग्रेस नेते व कार्यकर्त्यात उत्साह संचारला आहे.त्याचबरोबर काँग्रेसधाराजिणे व मोदी व्देषी तथाकथित विचारवंत, पत्रकार लेखक, समाजसेवक यांचेत आंनदाच्या उकळ्या फुटल्या आहेत!कारण ५५ वर्षात काँग्रेस सरकारने काँग्रेसधार्जिण्यांचे चोचले पुरविले.या मंडळी समाजसेवेच्या नावाखाली 'एन जी ओ'.मार्फत विदेशातून करोडा रूपयांचा निधीचा आणण्याचा गोरखधंदा बंद केला. या मंडळीच्या मोदी सरकारने आर्थिक नाड्या आवळल्या आहेत. तसेच "चमचे चोर" पत्रकारांचे विदेशी शासकीय दौरे बंद केले आहेत.अश्याच पत्रकारांचे तीळपापड होत आहे.काँग्रेसने कर्नाटक निवडणूक कोणता यशासाठी हातखंडा वापरला, त्यावर मंडळी बोलणे, लिहिणे पध्दशीरपणे टाळत असतात.ते विविध माध्यमातून मोदी सरकारच्या विरोधात नकारात्मक अजेंडा चालवित आहेत, जनतेत भ्रम पसवित आहेत! ते ओळखता पाहिजेत.काँग्रेस पक्ष २०२४ ची लोकसभा निवडणुकीत स्वंतत्रपणे निवडणूक लढविण्याच्या तयारीत करत आहे. नेते राहूल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेचा कर्नाटक निवडणुकीत काँग्रेसला तीळमात्र फायदा झालेला नाही. गांधी यांना खूष करण्यासाठी नेते प्रतिक्रिया दिली जात आहे.कारण भारत यात्रेनंतर तीन राज्यात काँग्रेसचा दारूण पराभव झालेला आहे. कर्नाटक निवडणुकीच्यावेळी उत्तरप्रदेश राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका झाल्या.त्यात काँग्रेस पक्षाचा सुपडासाफ झालेला आहे.या राज्याच्या निकालानंतर गांधी हे २०२४ मध्ये देशाचे पंतप्रधान होतील, असे भाकित नेत्याने केले आहे! पण 'दिल्ली अभी दूर है' माहित असावे.भाजपाची अजून सोळा राज्यात सत्ता आहे, तो इतर राज्यात प्रबळ विरोधी पक्ष आहे.राज्याच्या विधानसभा निवडणुकीत स्थानिक व इतर प्रश्न महत्व असतात! तर लोकसभा निवडणूक राष्ट्रीय प्रश्नांवर होत असते.कर्नाटक निवडणुकीत मोदी व शहा या दोन भाजपा नेतृत्वाचा प्रभाव दिसलेला नाही, हे तितकेच खरे आहे. राहूल गांधी यांना तर भारतीय लोकशाहीवर, तसेच संवैधानिक संस्था, इव्हीएम वर विश्वास नाही.तर मग कर्नाटक राज्यात काँग्रेस पक्षाला यश मिळाले कसे ? हे यश' लोकशाहीच्या व्याख्येत बसत नाही काय ? हे त्यांना विचारले पाहिजे. तसेच देशातील घटनात्मक संस्था, या भाजपा, आर.एस, एस.च्या ताब्यात गेल्या आहेत. ईव्हीएम, मुळे भाजपाला सतत विजय मिळत असतो! अश्या वलग्ना काँग्रेस नेते करत होते.त्या ईव्हीएम ने काँग्रेसला राजस्थान, हिमाचल छत्तीसगड प्रदेशात निवडून दिले आहे.परंतु संवैधानिक निवडणूक आयोगावर बेछूट आरोप करणाऱ्या काँग्रेस पक्षाचे आता तोंड बंद झाले असेल! कर्नाटक निवडणुकीत तर पक्षाचे महासचिव रणजीत सुरजेवाला यांनी तर इ.व्ही एम.मशीन या दक्षिण अफ्रिकेतून आणले गेल्या, असा गंभीर आरोप केला होता. निवडणुक आयागाने पक्षाने अशी अफवा पसरू नका, अशी तंबी दिली.तेंव्हाते गप्प बसले.निवडणुकीत काँग्रेसने आश्वासनाची तर खैरात केली!त्याचबरोर देशात आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवरुन ७५



टक्क्यापर्यंत वाढविले जाईल, असेही आश्वासन दिले.काँग्रेसने राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार न करता राजस्थान व हिमाचल राज्यात सवंग घोषणा केल्या.राज्यस्थानमध्ये दहा दिवसात शेतकऱ्यांचे सातबारा कोरा होईल, अन्यथा मुख्यमंत्री बदला जाईल, असे आश्वासन दिले होते त्याचे काय झाले ? आजपर्यंत या राज्यात शेतकरी कर्ज मुक्त झाला, ना मुख्यमंत्री बदलण्याची ताकद काँग्रेस श्रेष्ठीत आहे.उलट काँग्रेसमध्ये लाथाळ्या लागल्या आहेत. कर्नाटक राज्यात पाच हमी( ग्यांरटी ) योजना लागू करण्याचे आमिष दाखविले गेले.यात गृह ज्योती योजनेअंतर्गत प्रत्येक परिवाराला २०० युनीट वीज बील माफ. २ ) प्रत्येक परिवारातील प्रमुख महिलेला २ हजार प्रति महिना मानधन ३ ) पदवीधर बेरोजगारांना ३ हजार रू., तर डिप्लोमाधारकाला १५०० रूपये भत्ता ५ ) गरीब कुटुंबाला १० किलो तांदूळ मोफत देण्याचे वचन दिले आहे.पण या योजना अंमलात आणण्यासाठी सुमारे ६२ हजार कोटी प्रति वर्ष खर्च येणार आहे! कर्नाटक राज्याचे २०२२- २०२३ या वर्षाचे महसुली उत्पन्न ७२ हजार कोटीचे आहे.या राज्याच्या निधी इतर विकास कामांना निधी मिळणार नाही.राज्य सरकारवर कर्जाचा बोझा वाढणार आहे.आम आदमी पक्ष व तेलंगणात भारत राष्ट्र समिती पक्षाने अश्या सवंग योजना घोषणा आहे.यामुळे राजस्थान, दिल्ली.पंजाब तेलंगणा राज्य आर्थिक संकटात सापडले आहेत.केंद्रात मोदी यांचे नेतृत्वाखाली देश हितासाठी घेतलेले महत्वपूर्ण निर्णय तसेच गरिबांसाठी घर, पाणी, वीज, गॅस, आरोग्य स्वच्छता, मोफत धान्य, तसेच शेतकऱ्यांना अनेक योजना राबवित आहे.देशात अनेक महत्वपूर्ण विकासांचे प्रकल्प व रस्ते विकासाच्या योजना राबविल्या जात आहे.भारत आर्थिक प्रगतिकडे वाटचाल होत आहे.भाजपाचे विकास मॉडल या निवडणुकीत मागे पडले.मग भाजपा सरकार कोठे कमी पडले ?काँग्रेसने राज्यातील भाजपा सरकारच्या अथवा धोरणावर टीका न करता मोदींना शिव्या देणे सुरू केले.पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पंतप्रधानांना विषारी 'साप' म्हंटले गेले. तरीही याबद्दल गांधी परिवाराला खेद वाटला नाही, उलट टिंगल टवाळी केली गेली.देश व राज्य खड्यात गेले तरी चालेल! आम्हाला मोफत मिळते ना!हिच संस्कृती वाढत चालली आहे.कर्नाटक मतदार सवंग योजनेला भुलला आहे.देशात २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत विरोधी पक्ष हा 'रेवडी' संस्कृतीला बळ दिले जाईल, यातून भाजपाची कोंडी येऊ शकते!कर्नाटक विधानसभा तुष्टीकरण राजकारण सवंग योजना या फॉम्मुल्याने काँग्रेसला विजय मिळवून दिला आहे.भाजपाकडे राजकीय विव्दान, जाणकार, चाणक्य नेते कमी नाहीत.पक्षाला निवडणुकीपूर्वी राजकीय अंदाज घेता आलेला नाही.यात भाजपा कमी पडला आहे. काँग्रेसचे राज्यातील ४० टक्के कमीशन हा भ्रष्टाचाराचा प्रश्न लावून धरला होता.भाजपाने काँग्रेसला ८५ टक्के भ्रष्टाराचाराचे उत्तर दिले!राज्यात काँग्रेस सत्ता आली आहे. काँग्रेस सरकार ४० टक्के भ्रष्टाचाराचे प्रकरणे शोधून काढणार आहे काय ? हे पहावे लागेल!त्यात कर्नाटक काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष डी.के. शिवकुमार यांचे विरोधात भ्रष्टाचार प्रकरणांची चौकशी चालू आहे.ते मात्र भ्रष्टाचारी नाहीत! असे काँग्रेस म्हणते, त्यांना खोट्या केसेसमध्ये अडकविले गेले. काँग्रेस पक्ष भ्रष्टाचार प्रकरणाची न्याय देणारी संस्था आहे की काय ? काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेत्या श्रीमती सोनिया गांधी, आणि राहूल गांधी हे तर भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली जामीनावर आहेत!भ्रष्टाचार हा पक्षाचा आत्मा आहे, तो देशात वरीष्ठनेत्यांपासून स्थानिक पुढाऱ्यापर्यंत पोहचला आहे.काँग्रेसला ५५ वर्षात देश भ्रष्टाचार मुक्त करता आलेले नाही, तरीही काँग्रेस आम्ही भ्रष्टाचार मुक्त करू, अशी भाषा करते, त्याचे आश्चर्य वाटते! कर्नाटक निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळाले!पण पक्षाचे नेते सिध्दरामय्या व डी. के. शिवकुमार हे मुख्यमंत्रीपदाच्या खूर्चीसाठी दावा करत होते. काँग्रेसने तीन निरीक्षक पाठविले, त्यात चर्चा, पर्याय देण्यावरून मॅराथॉन बैठका झाल्या.पण तडजोड होत नव्हती!काँग्रेस पक्षाने सिध्दरामय्या यांना अनुभवी नेता म्हणून त्यांना मुख्यमंत्री करावे, अशी समंती झालेली होती.पण त्याला शिवकुमार यांचा मात्र विरोध होता! खूर्चीचा हा वाद दिल्ली दरबारपर्यंत गेला.राजस्थानप्रमाणे पक्षात दोन गट पडतात की काय ? याची पक्षाला भीती वाटत होती, पक्षासमोर संकट निर्माण झाले होते. शेवटी पक्षाला दोन नेत्यात तडजोड करण्यात यश मिळाले आहे. लोकशाहीत निवडणुकीत जय -पराजय होत असतो! भाजपाने पराभव मान्य केला आहे.पंतप्रधान मोदी यांनी तर कर्नाटक निवडणुकीत यश मिळविल्याबद्दल काँग्रसचे अभिनंदन केले!तर नेते राहूल गांधी यांनी तर 'प्रेमाने व्देषाला हरविले' असे विधान केले.हे राजकीय सभ्यतेला धरुन नाही. स्वातंत्र्या- नंतर काँग्रेस पक्षात सेवा, त्याग, निस्पृह चारित्र्याचे नेते, मंत्री होते.यांना कधीच सत्तेचा मोह नव्हता.त्यांनी पक्षासाठी आणि जनतेच्या प्रश्नावरुन सत्तेचा त्याग केला हा इतिहास आहे.आ काँग्रेस पक्षात मुख्यमंत्रीपदाच्या खूर्चीसाठी रस्सीखेच झाल्याचे देशाने उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.तेंव्हा काँग्रेस पक्षाच्या विचारात हा बदल झालेला आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## चला एका अनोख्या सफरीवर...

आधुनिक केसरी

तो उसळलेला दर्या, येणारी संकटं मी श्वास रोखून पाहायचो. भा रा भागवतांचा बनेश म्हणजेच फास्टर फेणे विविध रहस्यांचा शोध घ्यायचा. हा छोटा गुप्तहेर भल्याभल्यांची मती गुंग करायचा. अकबराच्या दरबारातले कोणालाही न सोडवता येणारे असे कठीण प्रश्न चतुर बिरबल सहज कसे सोडवायचा ! त्याचा विचार करताना मती गुंग होऊन जायची. चांदोबातल्या विक्रम वेताळाच्या गोष्टी तर वेगळ्याच विश्वात घेऊन जायच्या. बिरबलासारखेच त्या वेताळाच्या कठीण प्रश्नांना विक्रमाने कशी उत्तरं दिली आणि आपली सुटका कशी करून घेतली, ते वाचताना मजा यायची. कधी ती पुस्तकं पऱ्यांच्या राज्यात घेऊन जायची तर कधी क्रूर राक्षसांच्या ! एखादा देखणा, शूर आणि चतुर असलेला राजपुत्र आपल्या बुद्धिचातुर्याने त्या बलाढ्य राक्षसाचा पराभव करून त्याच्या बंदिवासात असलेल्या राजकन्येला कसा सोडवून आणायचा हे वाचताना वेळ कसा जायचा हे कळायचं नाही. अरबी सुरस आणि चमत्कारिक कथा मला वेगळ्याच दुनियेत सफर करून आणायच्या तर विष्णुशर्मांच्या पंचतंत्रमधील प्राणी माझ्याशी चक्क हितगुज करायचे. त्यांच्याशी बोलता बोलता मानवी व्यवहार आणि संबंधातील खूप काही गोष्टी आपोआपच कळायच्या. अशाच पुस्तकांमध्ये काही थोर व्यक्तींची चरित्रं पण वाचायला मिळायची. ती वाचताना कळायचं की कुणी जन्मतःच थोर असत नाही. ही माणसं तुमच्याआमच्यासारखी सामान्यच होती. पण ती थोर झाली ती आपल्या कर्तृत्वाने. त्यांनाही अनेक संकटांचा सामना करावा लागला. पण दोस्तांनो, आपण सामान्य माणसे आणि अशी आपल्या कर्तृत्वाने महान झालेली मंडळी यांच्यात मोठा फरक असतो. तो कोणता ? तर आलेल्या संकटांनी ही माणसे निराश होत नाहीत, आपले प्रयत्न सोडून देत नाही. उलट ते त्या संकटांना आपल्या ध्येयापर्यंत पोहचण्याचे साधन बनवतात. अडचणी, संकटे यापासून शिकत जातात. त्यातून मानसिक आणि शारीरिक दृष्ट्या मजबूत होत जातात. मित्रांनो, शाळेत तर मी शिकतच होतो ना !





## आनंदी पहाट

### नैराश्याशी करावेत दोन हात

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मी आणि माझे, आपण आणि आपले या वैचारीकतेमुळे कुटुंबातील सदस्यांनी आपल्या स्वतः भोवती जणू लक्ष्मणरेषा आखून घेतल्याप्रमाणे वर्तन, विचार अंगीकारल्याचे दिसत आहे. सामाजिकदृष्ट्या आपणच आपले अधःपतन तर करत नाहीत ना, हा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. आपले नाते इतके संकुचित ठेवण्याची कदाचित अनेकविध कारणेही असतील, ती कारणे प्रत्येकाची भिन्न देखील असतील. पण निर्माण होणाऱ्या समस्येला जबाबदार कोण ? ह्याचा अनेकांच्या मनावर काय आणि किती खोलवर परिणाम होऊ शकतो, हे आपण समजू शकणार का ? आणि कधी ? अर्थात प्राप्त परिस्थितीचा विचार करून अनेक अनाकलनीय समस्यांवर योग्य मार्ग काढणे महत्वाचे असते. अलीकडच्या काळांत अगदी सामान्य ते असामान्य व्यक्तींनी नैराश्याची विविध कारणे पचवू न शकल्यामुळे, अपयशाने खचल्यामुळे स्वतःच्या आयुष्याला संपवण्याचे टोकाचे पाउल उचलले; ज्याचा त्यांच्या आप्तेष्टांना बसलेला मानसिक धक्का, त्यांच्या कुटुंबात निर्माण झालेली पोकळी, चाहत्यांना होणारे दुःख हे सहन करणे देखील निश्चितच खूप कठीण असणार, यात कोणतेही दुमत नाही. पण अशा अघटीत घटना घडताना त्या व्यक्तीचा मानसिक समतोल ढळलेला असतो. अनेकदा तेच नेमके कोणाच्याही ध्यानात येत नाही. अत्यंत हुशार, कर्तुत्ववान, मेहनती, सामाजिक कार्यात देखील मोलाची भूमिका बजावणारी व्यक्ती जेव्हा आत्महत्येचे पाउल उचलते, त्या व्यक्तीच्या अंतर्मनाशी जोडल्या गेलेल्या प्रत्येकाला सैरभैर व्हायला लागते, खंत वाटायला लागते, आपल्या जवळच्या आणि प्रिय व्यक्तीला गमावल्याचे होणारे दुःख, घडलेली घटना टाळण्यासाठी आपण काही करू न शकल्याचा संताप देखील होत असेल. त्या व्यक्तीच्या आयुष्याशी संबंधित अनेक प्रश्न अनुत्तरीत राहतात आणि इतरांना नवीन समस्यांना सामोरे जावे लागते.

## चुकलं तर काय..??

आधुनिक केसरी

सुखाची जाहिरात केली तर खरेदीदार खूप भेटतील.पण दुःखाची कितीही मोठी जाहिरात केली तरी त्याला खरेदी करणारं कोणीच भेटणार नाही. म्हणून आपलं काही चुकलं किंवा मुलांचं चुकलं तर त्यासाठी कोणाला शिक्षा नको.आईकडून बऱ्याचदा दूध,भाजी,चहा ऊतू जातात. मग ती काहीच कुरकुर न करता साफ करते. पण मुलांकडून, नवऱ्याकडून एखाद्यावेळी जरी दूध ऊतू गेलं तर त्या बिचाऱ्यांना कितीतरी शब्दांचा आहेर मिळत असतो. तेव्हा त्यावेळी शांत मनाने विचार करा की, आपल्या हातून झालं असतं तर!!!! आणि मुलांना रागवू नका. मुलं सुद्धा विचारतात हेच जर तुझ्या हातून झालं असतं तर..!! बोलती बंद आपली.... परक्यांना सुद्धा आपल्याला काही बोलता येत नाही. मग आपल्याच मुलांना का?? ठीक आहे,फुटलं तर फुटू दे, पडलं तर पडू दे,सांडलं तर सांडू दे.पण तुला नाही ना काही लागलं?? असं प्रेमाने समजावं. चुकलं तर लगेच शिक्षा नको. चुकता चुकता शिकतात सगळं. पहिल्याच प्रयत्नात पुरणाची पोळी जमेलच असं नाही. काहींना जमेलही!!. पण ताबडतोब सगळ्या गोष्टी मिळाव्यात, याव्यात, द्याव्यात असा अट्टाहास नको. चुलीतल्या धुरामुळे फक्त भिंत काळी होते,आकाश नाही होत. तेव्हा एखाद्या लहानशा चुकीने आभाळ तर कोसळतच नाही पण घराची साध्या खिडकीला पण तडा जाणार नाही. पण मनाला मोठा तडा जाईल. तेव्हा चुकलं तर जरा जपून.तराजूत जसं मापाचे फक्त वजन होतं. त्याचा दर्जा कळत नाही. तसं लहानसहान चुकातून मुलांसमोर स्तर घसरू देऊ नका. ते अशा व्यक्तीसोबत घरात राहत असतात वाकडे वळण सुद्धा त्यांना त्यांच्यामुळे सरळ वाटतात. आपल्या आवाजावरून आपण एकमेकांची सुखदुःख समजावून घ्यावीत.आणि सांडण, पडणं, फुटणं, पोळणं, घसरणं ,भांडणं, चकवणं ,दुखणं, हेलपाटणं या गोष्टी जीवनात असाव्यात. त्या घडाव्यात.नसता आयुष्य कसं बेचव वाटतं बघा. वेळ निघून गेल्यावर जसं वाटतं,जपलं असतं तर संपलं नसतं. त्यासाठी वेळे आधीच जपू. चुकलं तर माफ करू. आपल्याकडे पाहून कोणीतरी म्हणावं , असा जन्म लाभावा, ज्याचं चंदन व्हावं, आयुष्य संपले तरी , सुगंध दरवळत राहावा..... चला सगळ्यांना माफ करा.

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-74

## सवय



एका माणसाने त्यााच्याा घरी एक पोपट पाळला होता. पिंज-यात ठेवलेल्यो पोपटाला चांगले खायलाप्याययला मिळत असे व पोपट बोलका असल्यालने घरातील लोकांकडून त्यातचे फार कौतुकही केले जाई. पण पोपटाच्यास मनात मात्र पारतंत्र्याचे शल्यल दाटून येई. अखेर एकेदिवशी पोपटाला संधी चालून आली. त्यार माणसाने पोपटाला खाणे देण्याईसाठी पिंज-याचे दार उघडले होते व त्या च्या.हातून ते तसेच उघडे राहिले होते. माणसाला अचानक काही काम आल्याघने तो ते दार उघडे टाकून निघून गेला असता पोपट पिंज-याच्यात बाहेर निघून गेला. पण लहानपणापासूनच पिंज-यात राहिला असल्योने त्यांला फारसे नीट उडताच येत नव्हनते. एका झाडावर गेला असता त्योला इतर पोपटांशी बोलता येईना कारण लहानपणापासूनच तो परकी भाषा शिकत असल्या ने त्याइला पोपटांची भाषा येत नव्हरती म्ह णून इतर पोपटही त्या.ला सहकारी मानत नव्ह ते. पिंज-यात आयते खायची सवय असल्यााने त्या ला अन्न मिळवणे अवघड जाऊ लागले व ऊन वारा पाऊस यांची कधीच सवय नसल्याअने तो आजारी पडला व मरून गेला. तात्पपर्यः जास्तल काळ पारतंत्र्यात( गुलामगिरीत ) राहिल्याने तशीच गुलामगिरीची सवय अंगात मुरुन राहते. मग परक्याची भाषा, संस्कृरतीच आपली वाटू लागते आणि मिळालेले स्वापतंत्र्य टिकवण्याहसाठीची जिद्द अंगी राहत नाही. परक्याग संस्कृटतीचे चांगले काही घेताना आपल्याम संस्कृयतीचे विस्म रण होऊ न देणे हाच खरा शहाणपणा.

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**लोकोत्तरस्वरूपाम्बां**
**चारुचन्द्रार्धशेखराम्|**
**तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं**
**नमाम्यहम्||५||**
**जिचे स्वरूप लोकोत्तर आहे अर्थात दिव्य आहे, आणि जिने सुंदर अशा अर्ध चंद्राला भाळी धारण केले आहे, अशा दुर्गा देवीला मी तीनही तापांच्या शांतीसाठी नमन करतो.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**कर्म से आयु जाति है, कर्म से भोगत भोग ।**
**कर्म विपाक न छूटई, कर्मन संसृत रोग**
**।।१०।। (स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/१०**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
जीव आपल्या शुभाशुभ कर्मांनुसार आयुष्य, जात (जात म्हणजे मनुष्य जात, पशू जात असं) आणि भोगांना प्राप्त करतो. कर्म फल भोगल्याशिवाय सुटू शकत नाही. संसारातील जन्म-मृत्यूचे कारण कर्म आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## वेदांचा अभ्यास का करायचा!

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

"पुराण"या शब्दाचा अर्थ, पुरातन पण नित्य नवे कारण पुराणांनी सर्व वर्णांना,वर्णबाह्य सर्व प्राणीमात्रांना मी तर अगदीच अभिमानाने म्हणेन की संपूर्ण मानवजातीला पारमार्थिक क्षमता,भेदाभेद भ्रम अमंगळ ही शिकवण जर कुणी दिली असेल तर ती पुराणाने असे म्हणले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. मित्रांनो सर्व प्राणीमात्रात चैतन्यतत्व आहे. आणि ते सतत युगानुयुगे वाढत आहे ते तत्व म्हणजेच पारमार्थिक क्षमता पुराणाच्या अभ्यासाने सतत जीवंत राहिली आहे. भक्तिमार्गाची समता आणि क्षमता ही पुराणाचीच देणगी आहे. ही आपली प्राचीन काळापासून चालत आलेली सभ्यता आहे. मित्रांनो तुम्ही मला सहजं म्हणाल की काय हे' पुराण 'सुरू केलं आहे सकाळी सकाळी, पण असं नाही माझ्या मित्रानों नीट समजून घेतले तर माझ्या म्हणण्याचा अर्थ तुम्हाला कळेल. एक लक्षात घ्या भारतीय सण समारभं आपण चैत्रशुध्द प्रतिपदा गुढी उभारून करतो .चैत्र मासापासून सुरू झालेल्या प्रत्येक सणाचं महत्व आज या ठिकाणी मी तुम्हाला सांगत नाही .

## संतांनीच भगवंताला सगुणात आणले

आधुनिक केसरी

सर्वांत अर्पणभक्ती श्रेष्ठ आहे. पूजा करताना 'मी तुझा दास आहे' असे म्हणावे, म्हणजे प्रेम येते. यात लाज वाटायचे काहीच कारण नाही. आधी भगवंताचे दास व्हावे आणि मग पूजा करावी. आम्ही इतर कित्येकांचे दास होतो, आणि इतक्यांतून उरेल तेव्हा भगवंताचे दास होणार; मग पूजेत अर्पणभक्ती कशी येणार ? आपल्याला जे जे आवडते ते ते मनाने भगवंताला अर्पण करावे. इथे सर्व काही मनानेच करायचे असते. नुसते शरीराने काबाडकष्ट केले म्हणजे प्रेम येतेच असे नाही. चित्त विषयाकडे ठेवून भगवंताची सेवा करणे म्हणजे अंगचोरपणा आला. असा अंगचोरपणा करू नये. भगवंताकडे मन लागायला सगुणोपासना उत्तम होय. सर्व लोक या ना त्या रूपाने सगुणाचीच उपासना करणारे असतात. ठरलेली वेळ आणि ठरलेले साधन असावे, म्हणजे त्यामध्ये प्रेम येते. आपण ज्याची उपासना करतो तो तरी सगुणामध्येच असतो ना ? म्हणून त्यालासुद्धा मग ती सवय लागते. आपण ज्या मूर्तीची उपासना करतो त्या मूर्तीमध्ये तेज वाढत असते. ज्या मूर्तीची



उपासना एखाद्या साधूने केलेली असेल त्या मूर्तीमध्ये फार तेज असते, आणि ते पुष्कळ काळ टिकते. शिवाय ते इतरांनाही उपयोगी पडते. जगाचे खरे स्वरूप कळण्यासाठी सगुण उपासनाच कारणीभूत आहे. सर्व भोग भोगून काळजी नसणे हे उपासनेचे खरे मर्म आहे. उपासनेचे तेज कसे झळकले पाहिजे ! हे तेज फार विलक्षण असते. पैशाचे किंवा विद्वतेचे तेज तितके नसते. ज्याच्या मागे उपासनेचा जोर आहे तोच जगात खरे काम करतो. एक बाई डोळे झाकून बसली म्हणजे तिला एक देवी दिसे. त्या बाईशी देवी बोलत असे, आणि प्रपंचातल्या वगैरे सर्व गोष्टी कशा कराव्यात हे सांगत असे. परंतु बाईने ध्यान करणे सोडून दिल्याने तिला देवी दिसणे बंद झाले. तसेच एक मुलगा डोळे झाकून बसला म्हणजे त्याला पांढरी दाढी असलेला एक साधू दिसे. कसे वागावे, काय करावे, वगैरे सर्व गोष्टी तो त्या मुलाला सांगत असे. परंतु मुलाने ध्यान करणे सोडून दिले, आणि तो दाढीवाला दिसेनासा झाला. या गोष्टींचा अर्थ असा की, आपल्याला सांभाळणाऱ्या शक्ती आपल्या मागे असतात, त्यांची उपासना आपण सोडू नये. भगवंताला सगुणामध्ये आणला हा संतांचा आपल्यावर फार मोठा उपकार आहे. संतांनी आपल्याला सांगितले की, 'ही दृश्य मूर्ती तुझी आहे, तुला हव्या असणाऱ्या सर्व वस्तू देणारा भगवंत तोच आहे.' ही जाणीव आणि कल्पना आपल्या ठिकाणी वाढत गेली तर त्यामुळे 'भगवंत दाता आहे' ही जाणीव उत्पन्न होईल. 'भगवंत दाता आहे, तो माझ्या मागे आहे, तो माझ्या सुखाचा आधार आहे, तो माझे कल्याण करणारा आहे,' ही जाणीव झाली की, जे मिळाले ते भगवंताच्या इच्छेनेच मिळाले ही भावना होऊन, आहे त्या परिस्थितीमध्ये समाधान टिकेल.

**आजचे बोधवचन आहे - आनंदरूप परमात्मा मिळविण्यासाठी सगुणोपासना पाहिजे. श्रीराम समर्थ**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**शोकस्थानसहस्राणि भयस्थानशतानिच**
**दिवसे दिवसे मूढमाविशन्ति न पण्डितम् ॥**
**स्पष्टीकरण - हे जग अनेक बऱ्यावाईट गोष्टींनी भरलेले आहे. त्यामुळे जडबुद्धीचा मनुष्य हजारो गोष्टींची चिंता करीत बसतो. इथे भय आहे, तिथेही भय आहे, या कल्पनेने तो सदैव चिंताच करीत राहतो. त्याला पुरुषार्थासाठी पुढे पाऊल टाकावे, असे वाटतच नाही. शहाणा माणून मात्र असल्या गोष्टींची फिकीर न करता वेळ येईल तेव्हा पाहून घेईन, या धीराने काम करीत राहतो. शेवटी तोच विजयी होतो. शंकेखोर मात्र जिथल्या तिथेच राहतो.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

रविवार, २१ मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२५३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 21 MAY 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-253 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5


# खाकीच्या स्वप्नासाठी चार महिन्यांच्या चिमुकलीपासून दूर राहिली हिरकणी

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड : लहरों से डरकर नौका पार नहीं होती, कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती! हरिवंशराय बच्चन यांनी लिहिलेली या काव्यपंक्तीची ज्योत घेऊन धावणाऱ्याच्या जीवनात अंधकार येण्याची शक्यता कमी आहे. अश्रूंची फुले करण्याची ताकद या कवितेत सामावलेली आहे. ताकद, स्फूर्ती, आणि प्रेरणा काठोकाठ भरलेली ही कविता निफाड तालुक्यातील गोंदेगाव येथील एका हिरकणीने प्रेरक मानली अन त्या जोरावर मुंबई पोलीस दलात पोलीस होण्याचे स्वप्न पूर्ण केलं. चार महिन्यांच्या तान्ह्या मुलीला सासूच्या पदरी देऊन भरती होण्यासाठी जाणाऱ्या दीपाली पगार- गाडे या आधुनिक हिरकणीचे जिल्हाभरात कौतुक होत आहे. काल जाहीर झालेल्या मुंबई पोलीस अंतिम यादीत दिपालीची निवड झाली आहे.**

कोपरगाव तालुक्यातील धामोरी येथील बाबासाहेब पगार यांची कन्या असलेल्या दीपाली यांचा विवाह गोंदेगाव (ता. निफाड) येथील रावसाहेब गाडे यांचा मुलगा अमोल यांचेशी २०२० मध्ये विवाह झाला. विवाहापूर्वी विज्ञान शाखेतून बारावीचे शिक्षण घेत असतांनाच दीपालीने पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणास सुरुवात केली होती. विवाह झाल्यास वर्दीच्या स्वप्नांचा चुराडा होणार नसेल तरच लग्न करेन या अटीवर दीपालीने विवाह केला. पोलीस भरतीचे स्वप्न पूर्ण करण्याची ईच्छा दीपालीने अमोल यांना बोलून दाखविली. सुशिक्षित कुटुंब असलेल्या गाडे परिवाराने दीपालीच्या स्वप्नांच्या आड न येण्याचे ठरवले. त्यात दोघांच्या संसारात अन्वी या गोंडस मुलीचा जन्म झाला. एकीकडे बाळाचा लळा आणि दुसरीकडे खुणावणारी पोलीस वर्दी यांच्या द्वंद्वात असलेल्या दिपालीच्या पंखात अमोलने बळ भरले. खरा प्रश्न होता त्या चिमुकलीचा. अवघ्या चार महिन्यांच्या मुलीला सोडून दूर जायचे दीपालीचे मन होईना. तो प्रश्न सासू लता गाडे यांनी सोडविला. मुलीचा सांभाळ करण्याची जबाबदारी सासू लता यांनी स्वीकारली अन दीपालीच्या स्वप्नांचा रस्ता मोकळा झाला. भरती पूर्व प्रशिक्षण घेण्यासाठी दिपालीने थेट पुणे गाठले. अंतःकरणात पाझर फोडणारी हिरकणी आणि दुसरीकडे स्वप्न पूर्ण करण्यासाठी झटणारी तरुणी अशा दोन्ही आघाड्यांवर दिपाली झुंजत होती. शेतीवर अवलंबून असलेल्या गाडे कुटुंबाने तडजोड करत तर कधी मोलमजुरी करत दिपालीचा खर्च भागविला. या कष्टांची जाणीव ठेवून दीपालीने देखील मैदानी कसरत आणि लेखी परीक्षेचा जोरदार सराव केला. मुंबई पोलीस भरतीमध्ये जीवाचे रान करत तिने झोकून दिले. जिद्द, चिकाटी, सरावात सातत्य असेल तर यश देखील चरणी लोटांगण घेते, याची प्रचिती दीपालीला आली. दि.१७ लागलेल्या निकालात मुंबई पोलीस दलात निवड झाल्याचे कळता मात्र तिचे आनंदाश्रू थांबता थांबेना. वर्दीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तानुल्यापासून दूर गेलेल्या तिच्या अंतःकरणातील मातेस रडू आवरत नसल्याचे चित्र बघायला मिळाले. दीपाली पगार - गाडे हिने मिळविलेल्या यशामुळे नाशिक जिल्ह्यात दीपालीचे कौतुक होत आहे.



## सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी न्या. मिश्रा, विश्वनाथन यांना शपथ

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाच्या दोन नवीन न्यायाधीशांना शपथ दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या सभागृहात आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्या. प्रशांत कुमार मिश्रा आणि ज्येष्ठ वकील कल्पती वेंकटरामण विश्वनाथन यांना शपथ देण्यात आली. यामुळे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची एकूण संख्या ३४ झाली आहे. गेल्या सात दिवसांमध्ये न्या. दिनेश माहेश्वरी आणि न्या. एम आर शहा हे निवृत्त झाल्यामुळे ही संख्या ३२ झाली होती. सरन्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील न्यायवृंदाने १६ मे रोजी या दोन नावांची केंद्राकडे शिफारस केली होती. केंद्र सरकारने दोन दिवसांत त्याला मंजुरी दिली आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी तसे आदेश काढले. शपथविधी कार्यक्रमात सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी पुढील महिन्यात निवृत्त होणाऱ्या न्या. के एम जोसेफ, न्या. अजय रस्तोगी आणि न्या. व्ही रामसुब्रमण्यन यांच्याबद्दल प्रशंसोद्गार काढले. शपथ घेतलेल्यांपैकी न्या. विश्वनाथन हे ११ ऑगस्ट २०३० ते २५ मे २०३१ या काळात भारताचे सरन्यायाधीश होतील. वकील म्हणून काम करताना बारमधून थेट सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक होऊन सरन्यायाधीश होण्याचा मान मिळवणारे न्या. के व्ही विश्वनाथन हे केवळ चौथे न्यायाधीश असणार आहेत.






## सिद्धरामय्यांना मुख्यमंत्री, शिवकुमारांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** कर्नाटकात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्री पदाची तर, डी. के. शिवकुमार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. तसेच, आठ मंत्र्यांनीही शपथ घेतली. कर्नाटकात काँग्रेसची सत्ता स्थापन झाली असून मंत्रिमंडळही सज्ज झाले आहे. त्यामुळे राहुल गांधींनी निकालाच्या दिवशी दिलेल्या आश्वासनानुसार पहिल्या मंत्रिमंडळात पाचही आश्वासाने पूर्ण करण्यात येणार आहेत. राहुल गांधी यांनी शपथविधी सोहळ्यात उपस्थितांना संबोधित केले. यावेळी त्यांनी कर्नाटकातील जनतेचे आभारही मानले. राहुल गांधी म्हणाले, कर्नाटकच्या जनतेला मी मनापासून धन्यवाद देतो. तुम्ही पूर्णपणे काँग्रेस पक्षाला समर्थन दिले. गेल्या पाच वर्षांत तुम्ही कोणती संकट झेलली आहेत हे आम्हाला माहितेय. कर्नाटकचा निकाल लागल्यानंतर माध्यमातून खूप लिहिलं गेलं की ही निवडणूक काँग्रेस का जिंकली, रॅली झाल्या, थिएरी चालू केल्या वगैरे. पण या विजयाचं एकच कारण आहे, ते म्हणजे काँग्रेस पक्ष गरीब, कमजोर, दलित, आदिवासींसोबत उभा राहिला. आमच्याकडे सत्य आणि गरीब लोक होते. त्यांच्या पूर्ण ताकदीला कर्नाटकच्या जनतेने हरवलं, त्यांच्या भ्रष्टाचाराला हरवले. त्यांच्या द्वेषाला हरवले. द्वेषाच्या बाजारात कर्नाटकच्या लोकांनी प्रेमाचं दुकान उघडलं. गेल्या पाच वर्षांत भ्रष्टाचार सहन केला. आम्ही तुम्हाला पाच आश्वासने दिलं होते, गृहलक्ष्मी योजना- दोन हजार रुपये प्रत्येक महिलेला, गृहज्योती योजनेतून २०० युनिट वीज मोफत, अन्नभाग्य योजनेतून १० किलो तांदूळ, शक्ती योजनेतून महिलांना संपूर्ण कर्नाटकात मोफत बसप्रवास, युवानिधी योजनेतून तीन हजार प्रत्येक ग्रॅज्युएट्स आणि १५ ०० रुपये डिप्लोमाधारकाला मिळणार, असा पुनरुच्चारही राहुल गांधींनी यावेळी केला.

## विहिरीत पडलेल्या सशाला वनमजूर युसुफ पठाण यांनी दिले जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि.१८/५/२३ रोजी साठवण तलावामधे रात्री च्या वेळेस पाण्यासाठी भटकंती करत असताना जंगली ससा विहिरीमधे पडलेला असल्याचे कळाले असता ही विहीर टिटवी येथील जल जीवन योजने मधुन ही विहीरी सावळदबारा साठवन तलावामधे खोदण्याचे काम सुरु आहे या विहीरीमधे मोठ्या प्रमानात पाणी साठलेले असुन या विहीरी मधे एक मोठा जंगली ससा पडलेला असल्याचे काही शेतक-यांनी पत्रकार जब्बार डी तडवी व पत्रकारांना सांगीतले असे कळताच पत्रकारांनी घटनास्थळी धाव घेऊन विहीरीमधे बघीतले तर एक मोठा जंगली प्राणी ससा पाण्यामधे पडलेला आढळुन आला या संदर्भामधे अजिंठा वनपरिक्षेत्र अधीकारी यांना काल करुन या घटने संदर्भामधे माहिती देण्यात आली. सावळदबारा येथील वनकर्मचारी यांचा जंगली प्राण्यांचा जीव वाचविण्यासाठी वेळ नसल्याचा धक्कादायक बेजबाबदार पणा समोर आला आहे नंतर वनरक्षक सुनिल खरडे यांना काल करुन या घटनेची माहिती दिली असता खरडे यांनी सांगीतले मी थोड्यावेळात लगेच येतो परंतु खरडे हे ही पोहचु शेकले नाही त्या नंतर एक वन मजुर युसुफ पठाण हे घटनास्थळी पोहचले आणि या वन मजुराने एक जाड दोर ( सोल ) चा बंदोबस्त केला दोर एका झाडाला बांधला आणि एक राजस्थान येथील आपल्या पोटाची उपजीविका भागविण्यासाठी मोलमजुरी करण्यासाठी आलेल्या अब्दुल हकीम या व्यक्तीने स्वताच्या जिवाची आणि मुलाबाळांची व कुटुंबाची पर्वा न करता विहीरी मधे दोराच्या सहाय्याने उतरुन दिनांक १९ / ५ / २०२३



रोजी सकाळी ससा या प्राण्याचे प्राण वाचविण्यात यश आले या सशाला मार लागलेला होता आणी ते जखमी अवस्थेमधे होते जर लवकरात लवकर पत्रकार यांनी खबरदारी घेतली नसती तर ससा या विहीरीमधे मरण पावला असता कारण हा या सशाच्या पोटामधे पाणी गेल्यामुळे पुर्ण थकुन फुगलेल्या अवस्थेमधे होता अब्दुल हकीम आणि वन मजुर युसुफ पठाण तसेच पत्रकार यांनी या सशाचे प्राण वाचविले मात्र अजिंठा वन विभागाचे अधीकारी, कर्मचारी यांना पत्रकारांनी काल करुन संपर्क साधला सदर घटनेची माहिती दिली.वनकर्मचारी यांचा दिसुन आला आहे या कामचुकार पणा करना-या कर्मचा-यांवरती कारवाई ची मागणी सध्या नागरिकांनी केली आहे.




# शैक्षणिक राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**शिक्षणाचा आणि राजकारणाचा संबंध काय असा प्रश्न आपणांस पडू शकतो, परंतु आधुनिक काळात राजकारण हे सर्वव्यापी झाल्यामुळे मानव्यविषयक जेवढी क्षेत्रे आहेत, त्यावर राजकारणाचा प्रभाव असणारच. त्यास शिक्षण क्षेत्र देखील अपवाद नाही. मन आणि मेंदू घडविण्याच्या अनेक घटकांपैकी औपचारिक शिक्षण हे एक प्रभावी साधन आहे आणि ते कोणीच नाकारू शकणार नाही. केवळ चरितार्थ चालविण्यासाठीच शिक्षणाचा उपयोग होतो असे नव्हे तर पंचवीस वर्षानंतर तुमच्या देशातील जनता कशा पद्धतीची हवी आहे, याचे नियोजन शिक्षण क्षेत्राशिवाय दुसरीकडे कसे होईल?**



## क्षितिजापल्याड

अनेक थोर विचारवंतांनी शिक्षणाविषयी आपले मत मांडले आहे. जे. कृष्णमूर्ती म्हणतात, शिक्षणातून आध्यत्मिकता, सृजनात्मकता, स्वातंत्र्य आणि परस्पर विश्वास निर्माण झाला पाहिजे. तर ओशोंनी शिक्षित मंडळींकडून विद्रोहाची अपेक्षा केली आहे. प्रतिस्पर्धा, महत्त्वकांक्षा हे शिक्षणातील दुर्गुण असल्याचे ते म्हणतात. आधुनिक शिक्षणाचा पायाच जर आम्ही स्पर्धात्मक ठेवत असू तर त्या ठिकाणी प्रेमाचा लवलेश उरणार नाही. राजकारणाचा उद्देश सर्वांना मागे सारून आपण पुढे जाण्याचा असल्यामुळे शिक्षणात देखील प्रेमाच्या ऐवजी स्पर्धा आढळून येते. कारण प्रेम समन्वय साधण्यावर भर देते तर राजकारण विरोधावर उभे असते. तुम्ही कोणाचा तरी विरोध केल्याशिवाय स्वतःचे अस्तित्व सिद्ध करू शकत नाहीत. सर्वांसोबत राहूनही स्वतःस वेगळे राखण्याची कला म्हणजे राजकारण आणि ज्याच्यासोबत आपण राहतो त्यासारखेच होऊन जाणे म्हणजे प्रेम. किंबहुना आपपरभावाच्या पलीकडची अवस्था म्हणजे प्रेम. हा भाव आम्ही शिक्षणातून शिकतो आहोत का? हा खरा प्रश्न आहे. नैसर्गिक जीवनप्रवाहाला हळुवारपणे मानवी मूल्याच्या कोंदणात सजविण्याचे कार्य शिक्षणाकडून होणे अपेक्षित असताना यथा राजा तथा प्रजा या न्यायाने आम्ही शिकत असू तर मानवी मूल्ये वृद्धिंगत होणार नाहीत. आपण नेहमी समाज बिघडला म्हणून ओरड करतो, सुधारण्यासाठी पोलिसी बळाचा वापर सुद्धा करतो, पण ही समाज बिघडण्याची सुरुवात कुठून सुरू झाली याकडे मात्र साफ दुर्लक्ष करतो. अगदी प्राथमिक ते विद्यापीठीय शिक्षणाची देशातील सांख्यिकीय माहिती आपणास आज गुगलच्या माध्यमातून उपलब्ध होऊ शकते. पण त्या माहितीचे करायचे काय? पोलीस प्रशासन, न्यायव्यवस्था ह्या समाजाला, व्यक्तीला वरून बांधून ठेवणाऱ्या व्यवस्था असून माणूस स्वतःतच चांगला घडण्याची प्रक्रिया ही फक्त शिक्षणातून शक्य आहे. आपण गरजेपेक्षा उत्सुकतेपोटी आज एवढे पुढे निघून आलो आहोत की कधी कधी एक माणूस म्हणून विचार येतो, आपणास या सर्वांची खरेच गरज होती का? पुढे काय हा प्रश्न किंवा उत्सुकता कधीच संपणारी नाही. आम्ही शिक्षण व्यवस्था समाधानाऐवजी उत्सुकतेवर अधिष्ठित केली आणि गुंता सोडवत बसलो आहोत. जीवन सुतासारखे सरळ असताना अकारण करदोड्याच्या गुंत्यासारखे बनविण्यात आपल्या शिक्षणाचा, शैक्षणिक राजकारणाचा फार मोठा हात आहे. स्पर्धा, उत्सुकता, महत्वकांक्षा याचा आपणास एवढा अभ्यास झाला आहे की आपण आता दुसरा विचारच करू शकत नाहीत. न्यायदर्शनातील तिसऱ्या अध्यायात अभ्यास म्हणजे काय याविषयीचे विवेचन आले आहे. एखाद्या विषयातील माहितीचा सातत्यपूर्ण क्रम म्हणजे अभ्यास होय. एखाद्या पदार्थाच्या सातत्यपूर्ण चिंतनातून त्यविषयीचा संस्कार मनावर रुजत जातो. आपल्या राजकीय विचारप्रणालीला मान्य असलेला, समकक्ष असलेला अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकविल्यानंतर त्याच पिढीकडून सर्वसमावेशक असण्याची अपेक्षा गृहीत धरणे चुकीचे ठरेल. कारण राजकीय मूल्ये आणि मानवी मूल्ये



यात तफावत असणारच. आपण जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना नागरिक बनवू शकतो, पण या पद्धतीने माणूस बनवू शकणार नाही. वासिली सुखोम्लेनिस्की म्हणून एक रशियन शिक्षणतज्ज्ञ होऊन गेले. त्यांचे माझे विश्व मुलांचे या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध आहे. मुलांचा नैसर्गिक मुक्त वातावरणात मन आणि बुद्धीचा जेवढा विकास होतो, तेवढा विकास आखीव वेळापत्रकाने आणि रेखीव वर्गखोल्यात होऊ शकत नाही. आपण आता अशा पायरीवर आहोत की, इथून माघारी वळणे अशक्यप्राय वाटते आहे. तरीही आहे त्यात आपणांस काही सुधारणा निश्चितच करता येतील. आम्ही आमच्या शिक्षणप्रणालीतून संगीत, चित्रकला, नृत्य, खेळ यांना जणू काही तिलांजली दिली आहे. कित्येक वर्षांपासून या विषयाची पदभरती थांबवून विद्यार्थ्यांना एखाद्या यांत्रिक पद्धतीने हाताळत आहोत. मग ही यंत्रवत पिढी शिकून बाहेर पडल्यावर लोकांच्या भावनांचा विचार का करेल. तशी अपेक्षा ठेवणे चूक ठरेल. शिक्षणातून रोजगार आणि रोजगारातून आनंद ह्या सूत्रानुसार आपणांस अभ्यासक्रम गठीत करावे लागतील. आनंदी मनात द्वेष वास करत नाही. आज समाजात अकारण विद्वेषाचे वातावरण निर्माण झाले आहे. ती तात्कालिक निपज नाही तर त्याची पायाभरणी आम्ही खूप वर्षांपूर्वी केली आहे. त्या विषवल्लीला आज फळे येऊ लागली आहेत. सर्व बाबतीतले सम्यकत्व आम्ही विद्यार्थ्यांना शिकविले पाहिजे. सत्तास्थानी कोण आहे त्यानुसार अभ्यासक्रम तयार करण्यापेक्षा वसुधैव कुटुंबकम हे जे आमचे अपरिवर्तनीय मूल्य आहे, त्यानुसार पिढी घडली तरच आपण मानवतेला अधिकचे काहितरी देऊ शकू. अन्यतः येणारा काळ आम्हांस माफ करणार नाही. जग परिवर्तनीय असले तरी काही मूल्ये ही परिवर्तनीय असतात व काही शाश्वत स्वरूपाची असतात. कालातीत आणि तत्कालिक मूल्यांची जोड आपण कशी घालतो यावर आपला पुरुषार्थ ठरत असतो. आपल्या वर्तनाने दुसऱ्यास त्रास होणार नाही, एवढे जरी आम्ही शिकलो तरी पुष्कळ झाले. कारण एखाद्याने चाकू मागितल्यावर पाते आपल्याकडे धरून दांडा समोरच्याकडे धरणे ज्याला कळाले तेव्हा समजावे की, याचे शिक्षण पूर्ण झाले. हे एक छोटे उदाहरण झाले पण यातून मानसिकता लक्षात येते. असा व्यक्ती समाजाला त्रासदायक होऊ शकत नाही. पण आमच्या शिक्षणातून पाते समोरच्याकडे धरायचे शिकविले जात असेल तर आम्हांस आणखी खूप पल्ला गाठायचा आहे हे समजावे. आणि आम्ही जाणीवपूर्वक पाते समोरच्याकडे धरून रस्त्यावर फिरत असू तर मग काही बोलायलाच नको. या जगातील प्रत्येक गोष्ट प्रसंगी दुधारी तलवार असते, त्यास शिक्षणही अपवाद नाही. मानवतावादापेक्षा राजकारण प्रभावी ठरू लागल्यास शिक्षण हे हत्याराचे स्वरूप धारण करते आणि अधिकाधिक संकुचित होत जाते. आणि कोणत्याही संकुचितपणाकडून विवेकवादाची अपेक्षा चूक ठरते.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# काव्यप्रदेशातील स्त्री: मराठी काव्यातील मातृत्व संकल्पनांची टिपणे



बाळासाहेब जोगदंड
संपर्क क्र. 9423051246

आधुनिक केसरी

**"काव्यप्रदेशातील स्त्री" हा मराठी साहित्य सृष्टीतील एक महत्त्वाचा समीक्षा ग्रंथ असून आज सर्वत्र या ग्रंथाची चर्चा होत आहे. किरण शिवहर डोंगरदिवे यांच्या लेखणीतून साकार झालेला हा महाग्रंथ मराठी समीक्षेच्या प्रांतात स्वतःचे वेगळेपण आणि महत्त्व सिद्ध करणारा आहे यात शंका नाही. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या 75 कवींच्या कवितेतील स्त्री प्रतिकांचा, प्रतिमांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा एकूण 76 लेखाद्वारे आपल्याला परिचय होतो. कोणत्याही विशिष्ट वर्गाचा, कालखंडाचा किंवा प्रवाहाचा विचार न करता, अगदी जनाबाईपासून ते बाळासाहेब लबडे या नवीन पिढीच्या कवी पर्यंतच्या काव्यसंग्रहाचा अभ्यास करून लेखकाने आपले काम केल्याचे दिसून येते.**

सर्वच कविता मधून स्त्री जाणीव शोधण्याचे काम केल्यामुळे या संग्रहातील निवडले गेलेले कवी आपल्या कवितेचा स्त्रियांबाबत काय विचार करतात, त्यांच्या कालखंडात आणि त्याच्या सभोवताली स्त्रियांबाबत काय धारणा होत्या? इत्यादी बाबी ठळकपणे वाचकांना दिसून येतात.

किरण डोंगरदिवे यांनी केलेल्या या कार्याची दखल महाराष्ट्रातील सर्व साहित्य प्रांतातून घेतली जात आहे. स्त्री विषयक लेखन केले म्हणजे म्हणजे समाजात स्त्रियांच्या ज्या भूमिका आहेत, त्या भूमिकांबद्दल आपोआप भाष्य केले जाते. समाज जीवनात स्त्रीचे एक महत्त्वाचे रूप म्हणजे माता हे होय. मराठीच नव्हे तर जगातील सर्वच भाषांमध्ये मातृत्वाचे गोडवे कवितेतून गायल्या गेले आहेत. काव्यप्रदेशातील स्त्री या समीक्षा ग्रंथात किरण डोंगरदिवे यांनी स्त्री जाणिवांचा अभ्यास करत असताना मातृत्वाकडे महाराष्ट्रातील कवींनी कोणत्या दृष्टिकोनातून पाहिले आहे याबाबत स्वतंत्रपणे विचार केलेला दिसून येतो. संत जनाबाईच्या अभंग आणि ओवी काव्यातील मातृत्वाचा शोध घेताना, क्षी जाय दिगंतरा बालकाची आणि चारा या अभंगापासून विठु माझा लेकुरवाळा संगे लेकुरांचा मेळा अशा विविध अभंगातून मातृत्वाची महती जनाबाईंनी सांगितलेली दिसून येते. विठ्ठल आणि ज्ञानेश्वर यांना मातृ रुपात पाहणे आणि संबोधने, जनाबाईंना लहानपणी झालेला मातृविरह यावर सुद्धा लेखकाने प्रकाश टाकला आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या काव्यरचनेतून स्त्री ज्याला जन्म तो बालक जर आईची सेवा करत नसेल तर त्याला सज्जन म्हणू नये असे सांगून मातृसेवेचे महत्व सांगितल्याचे लेखकाने अधोरेखित केले आहे. नारायण वामन टिळक यांनी त्यांच्या कवितेमधून आईला गुरुस्थानी मानले आहे, तर केशवसुतांच्या कवितेतील स्त्रीचा शोध घेताना आई लेकरापासून दूर असते तरी तिचे संपूर्ण लक्ष लेकराकडे असते अशा आशयाच्या कविता लिहिल्याचे लेखक सांगतात.

लक्ष्मीबाई टिळक यांनी त्यांच्या कवितेतून राम स्त्रियांना किती सन्मान देतात हे सांगत कैकयी सारख्या स्त्री मुळे आपल्याला वनात जावे लागले हे विसरून तिला ते मातेचाच दर्जा देतात हे सांगितल्याचे उदाहरण आपल्याला सापडते. कवी बी, भा रा तांबे, बहिणाबाई चौधरी, विं दा सावरकर, गोविंदाग्रज, बालकवी, वासुदेव गोविंद मायदेव, प्र के अत्रे इत्यादी कवींसोबत माधव ज्युलियन सारख्या कवींनी मातृत्वाचा जो गौरव केला आहे त्याचे यथार्थ वर्णन काव्य प्रदेशातील स्त्रीमध्ये दिसून येते. त्यातही माधव जुलियन यांच्या प्रेमस्वरूप आई, साने गुरुजी यांच्या काव्यरचनेतून डोकं होणाऱ्या स्त्रीच्या मातृप्रतिमा वाचताना वाचक हळवे झाले दिसून येतात. ग्रेस यांच्या कवितेतील आई सुद्धा दुर्बोध वाटत असली तरी ती फार सहजतेने उलडण्याचे काम लेखकाने केलेले दिसून येते. दलित साहित्यातील मातृ स्पंदने टिपत असताना वामनदादा कर्डक, अण्णाभाऊ साठे, यशवंत मनोहर, लोकनाथ यशवंत यांच्या कवितेतील मातृ प्रतिमा बाबतचे विश्लेषण किरण डोंगरदिवे यांनी केले आहे. 75 कवींचा अभ्यास करताना खरे तर सर्वच कवींच्या कवितेच्या स्त्री जाणीवांमधून मातृत्त्वाचा आविष्कार अटळ आहे. शांता शेळके, इंदिरा संत, सावित्रीबाई फुले, लक्ष्मीबाई टिळक, पद्मा गोळे पासून जनाबाई पर्यंत निवडक अश्या कवयित्रीच्या कवितेतील स्त्री रूपाचा अभ्यास करतांना त्यातील मातृखुणा विलोभनीय झाल्या आहेत हे वेगळे सांगायला नकोच, मात्र कवी विनायक म्हणजेच विनायक जनार्दन करंदीकर यांच्या हिरकणी कवितेतील मातृत्वाचा अविष्कार आणि त्या कवितेच्या निर्मिती प्रक्रिये बाबतच्या घटनांचा समीक्षक म्हणून लेखकाने केलेला अभ्यास महत्त्वाचा ठरतो. विनायक यांची हिरकणी ही संकल्पित कविता होती, ती पूर्णत्वास जाण्या अगोदर कवी विनायक यांचे निधन झाले आणि त्यानंतर त्यांचे पुतणे रा ना करंदीकर यांनी ती पूर्ण केली आणि तिच्यावर कधीही स्वतःचा हक्क सांगितला नाही हे लेखकाने आवर्जून सांगितले आहे. त्याचप्रमाणे राजकवी यशवंत यांनी वयाच्या दहाव्या वर्षी आई मृत्यूच्या दारात असताना लिहिली हा समज कसा खोटा आहे. याबाबत अभ्यास करून कवींनी आपले मत मांडले आहे. त्यासाठी त्यांना राजकवींच्या कुटुंबातील शिरीष पेंढारकर आणि इतर सदस्यांची मदत झाली मदत झाली. एखाद्या कवीवर लिखाण करताना फक्त त्याची पुस्तकेच न चाळता त्या कवीच्या कुटुंबीयांशी त्यांचा शोध घेऊन संवाद साधणे, त्यातून हवी ती माहिती मिळवणे, त्यावर मानसशास्त्रीय दृष्टीने विचार करणे आणि आपले मत मांडले इतकी सखोल समीक्षा वर्तमान काळात अभावाने दिसून येते. मात्र किरण डोंगरदिवे यांच्या काव्यप्रदेशातील स्त्री मधील लेखांचा आढावा घेतला असता अभ्यासपूर्ण समीक्षा लिहिणारे, आणि सकारात्मकता पेरणारे नव्या जाणिवांचे समीक्षक उदयास येत आहेत याची खात्री पटते. फुलता कवी फुलेंना ही कविता कवी अनिल ह्यांनी रात्री उशिरा काव्यमैफिल संपवून आल्या नंतर कुसुमावती देशपांडे ह्यांनी दार न उघडल्यामुळे लिहिली आणि त्यांना ही कविता सुचली तेंव्हा कुसुमावती देशपांडे घरात मरूण पडल्या होत्या असे सांगितले जाते मात्र किरण डोंगरदिवे ह्यांनी कवी अनिल ह्यांचे चिरंजीव शिरीष अनिल देशपांडे ह्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून ह्या मिथक कथेची उकल करून ही धादांत खोटी बाब असल्याचे सांगितले आहे.

ह्या पातळीवर जाऊन साहित्याचा खोल विचार करून सत्याला सत्य म्हणणाऱ्या समीक्षकात किरण डोंगरदिवे ह्यांचे नाव नोंदविले जाईल ह्यात शंका नाही. समीक्षेच्या दालनात काव्य प्रदेशातील स्त्री हा ग्रंथ मैलाचा दगड ठरणार आहे यात शंका नाही. लेखकाचे जितके परिश्रम या ग्रंथाला अंतरंगी खुलवण्यासाठी झाले आहेत तितकेच परिश्रम ह्या ग्रंथाचे बाह्यरंग फुलवण्यासाठी अथर्व प्रकाशनचे युवराज माळी यांनी घेतले आहेत. अरविंद शेलार यांचे तितकेच आकर्षक आणि समर्पक असे मुखपृष्ठ सुद्धा या संग्रहाची शोभा वाढवते. किरण डोंगरदिवे यांच्या रूपाने समीक्षेच्या प्रांतात एक अभ्यासू साहित्यिक मराठी साहित्याला मिळाला आहे असे निश्चितपणे म्हणता येते. लेखकाच्या भावी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.

- **पुस्तक: काव्यप्रदेशातील स्त्री**
- **लेखक :किरण शिवहर डोंगरदिवे**
- **प्रकाशन: अथर्व प्रकाशन जळगाव**
- **पृष्ठ: 516 (पुठ्ठा बांधणी)**
- **किंमत : रुपये 895/-**




हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अंबड तालुक्यातील शेतकऱ्यांना मदतीची आस

## खरीप हंगाम आला तरी अतिवृष्टी अनुदानही नाही आणि विमाही मिळेना

आधुनिक केसरी न्यूज

**रामदास पटेकर**

**अंबड :** अंबड तालुक्यातील शेतकऱ्यांना मुसळधार पाऊस तसेच अतिवृष्टीमुळे पिकाचे नुकसान होऊनही पीकविमा तर मिळाला नाहीच. मात्र खरीप हंगाम जवळ येऊन ठेपला असतानाही अतिवृष्टीच्या अनुदानाची रक्कम देखील मिळत नाही. अधिकारी तसेच नेत्यांकडून केवळ दिवसांवर दिवस ढकलण्याचा प्रकार सुरू असल्याचे अंबड तालुक्यात दिसून येत आहे. शासकीय अनुदानाची रक्कम मिळण्यासाठी आणखी किती दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार, याबाबत शेतकरी संभ्रमात आहे.

जालना जिल्ह्यासाठी कोट्यावधी रुपयांचा अनुदान मिळाल्याचा दावा करणारे सत्ताधारी व ते मिळेपर्यंत रस्त्यावर लढा देण्याची भाषा करणारे विरोधक हे अंबड तालुक्यातील जनतेसाठी कमी पडत असल्याने अनुदानाला विलंब झाल्याची कुजबुज शेतकरी करत आहेत. तसेच प्रशासनाला अधिकार नसल्याने तेही हतबल झाले आहे. सलग दोन वर्षापासून



अतिवृष्टीमुळे सोयाबीन पाण्यात गेले आहे. विरोधक तसेच सत्ताधारी व विरोधी नेत्यांच्या दौऱ्यातही केवळ अनुदानासाठी शेतकऱ्यांना आश्वासनाची खैरात देण्यात येत असल्याने अनुदान येणार तरी कधी हा शेतकऱ्यांना पडलेला प्रश्न सुटताना दिसत नाही.

यावर्षी सरकारी विमा कंपनी असल्यामुळे बदल दिसेल असे वाटत असताना खाजगी कंपनी पेक्षा या कंपनीने अधिक गोंधळ घातला आहे.

विमा कंपन्या नुकसान भरपाई मान्य करण्यास तयार नाहीत, अतिवृष्टीचे अनुदान वितरणाचीही परिस्थिती अशीच आहे. अद्यापही संपूर्ण नुकसान झाल्याप्रमाणे अनुदान वितरित करण्यात आलेले नाही. मधल्या काळात अनुदानासाठी तलाठ्यामार्फत बँक खाते नंबर, आधार नंबर इत्यादी कागदपत्रे जमा करून घेतली, मात्र पहिल्या टप्यात 60 ते 70 टक्के शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे अनुदान मिळाले. मात्र आता महिना उलटूनही आता शेतकऱ्याना अनुदानाची रक्कम मिळत नसल्याने प्रशासणासह राज्य शासनाच्या विरोधात शेतकऱ्याच्या समस्यांकडे कुणीच लक्ष देत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत.

अंबड तालुक्यात मुसळधार पाऊस तसेच अतिवृष्टीच्या पावसाने खरीपाच्या सर्वच पिकांचे मोठे नुकसान झाले असतांना विमा कंपनीने केवळ दहा टक्के नुकसान झाल्याचे दाखविले. याबाबत शेतकऱ्यांमधून ओरड झाली, मात्र ना सत्ताधारी पक्षाने शेतकऱ्यांचे ऐकले नाही. आणी त्यात भर विरोधीपक्षाने देखील ही शेतकऱ्यांसाठी महत्वाची असलेली बाब लक्षपूर्वक लावून धरली नाही. अंबड तालुक्यातील शेतकऱ्यांची सहानुभूती मिळावी म्हणून अतिवृष्टी झालेल्या भागात जाऊन सर्वपक्षीय फोटोसेशन करण्यात आले होते. इतकेच काय तर अंबड तालुक्यात कृषीमंत्री अब्दुल सत्तार वडीगोद्री महसूल मंडळात आले. व पालकमंत्री अतुल सावे देखिल् पाहणी करून गेले. मात्र अजूनही शेतकरी मदतीपासून वंचित असल्याने आता सत्ताधारी तसेच विरोधी पक्षाचा कोणताच कार्यकर्ता पुढे येत नाही, अशी खंत शेतकऱ्यांकडून व्यक्त केल्या जात आहे.

**शेतकऱ्याच्या समस्यांकडे कुणीच लक्ष देईना..!!**

अंबड तालुक्यात अतिवृष्टी झाल्याने काढलेले सोयाबीन पाण्यात वाहून गेले, सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले असतांना विमा कंपनीने नुकसान झाल्याचे दाखविले. मात्र आठ महिने उलटूनही अद्यापही मदत मिळाली नाही. ताबडतोब मदत मिळावी यासाठी सत्ताधारी पक्षाने शेतकऱ्यांचे ऐकले ना विरोधी पक्षाने लक्ष दिले. शेतकऱ्यांना रब्बी पिकाच्या अगोदर खरीप विमा व अतिवृष्टीचे अनुदान देण्यात यावे. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विमा कंपनीच्या विरोधात मुंडन आंदोलन केले. परंतु विमा कंपनी खरीप हंगाम जवळ येऊनही विम्याचे पैसे देत नाहीत. शेतकऱ्यांची नुसती दिशाभूल केल्या जात आहे. शेतकऱ्यांना ताबडतोब मदत द्यावी नसता आम्ही शेतकऱ्यासाठी रस्त्यावर उतरू

**सुरेश काळे, जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना, जालना**

अंबड तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत अतिवृष्टीचे अनुदान मिळालेले नाही. आधार कार्ड, खाते क्रमांक देऊनही शेतकरी दररोज तहसीलला अनुदान कधी मिळेल याची विचारणा करण्यासाठी जात आहे. सत्ताधारी तसेच विरोधक खरीप हंगाम जवळ येऊन ठेपला असतानाही शेतकऱ्यांच्या अनुदान मदतीकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. प्रशासन देखील लक्ष घालत नाही. शेतकरी संकटात सापडला आहे.

**राजांबर मते, शेतकरी, वडीकाळ्या ता. अंबड**



फुलंब्री : जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे सप्ताहात पहिल्या दिवसाची किर्तन सेवा माझे परममित्र गुरुबंधू हभप ज्ञानेश्वर महाराज कुकलारे गदाना खुलताबाद यांची झाली. प्रमुख उपस्थिती स्वगंधर्व गायक हभप कैलासजी महाराज ढेपले पाथ्रीकर माझे वर्गमित्र ह.भ.प. कारभारी म कापडे वाकोद, बाळु लांडगे, मृदंगाचार्य गायकवाड, पत्रकार जगदीश कुंटे, चोपदार काळे, जाधव, भजनी मंडळी बाबुराव जाधव, काकासाहेब जाधव, राजेश जाधव, दत्ता माऊली जाधव, समस्त ग्रामस्थ, वारकरी उपस्थिती होते.

## ग्रा.पं. सदस्याकडून महिलेचा विनयभंग

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महिलेशी अश्लील वर्तन करून तिचा विनयभंग केल्या प्रकरणी लोणी काळभोर परिसरातील कोरेगाव मूळ ग्रामपंचायत सदस्याच्या विरुद्ध लोणी काळभोर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या प्रकरणी सचिन गुलाबराव निकाळजे (रा. कोरेगाव मूळ, ता. हवेली, जि. पुणे ) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका महिलेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी निकाळजे ग्रामपंचायत सदस्य आहे. निकाळजे महिलेला गेल्या काही महिन्यांपासून त्रास देत होता; तसेच तिचा पाठलाग करत होता. महिलेने प्रतिसाद न दिल्याने निकळजे तिच्यावर चिडला होता. त्यानंतर निकाळजे महिलेच्या घरात शिरला. अश्लील वर्तन करुन तिला शिवीगाळ केली. या प्रकाराची कोणाला माहिती दिल्यास मुलांना जीवे मारु, अशी धमकी देऊन निकाळजे पसार झाला.

## नादांगाव येथील रोहित्र जळल्यामुळे पंधरा दिवसापासून गाव अंधारात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** नादांतांडा येथून जवळच असलेल्या नादांगाव येथील रोहित्र गेल्या पंधरा दिवसा पासून जाळल्यामुळे गावठाण गेल्या पंधरा दिवसा पासून ग्रामस्थाना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहें आत्ता उष्णतेने जिव्हाची लाही लाही होत आहें आणि गावात विद्यूत पुरवठा बंद असल्यामुळे गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहें राणावनातून ग्रामस्थाना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहें.नादांगाव हे शंभर टक्के वसुली आहे कोणी थकबाकीदार नाही. जोपर्यंत विज बिल वसुली होत नाही तो पर्यन्त रोहित्र मिळणार नाही असे महावितरणच्या अधिकाऱ्यांना कडून सांगण्यात येत आहें महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून सक्क्तीची वसुली केली जात आहें असा आरोप रवींद्र पाटील व नितीन पाटील यांच्या कडून केला जात आहें.सावळदबारा येथील इंजिनिअर, वायरमन व आफरेटरला फोन तर फोन उचलत नाही. गेल्या काही दिवसांपासून सावळदबारा येथील योगेश जाधव इंजिनयर हें दोन ठिकाणी कार्यरत असल्यामुळे ते अनेक गावाकडे लक्ष देखिल देत नाहीत. येत्या एक दोन दिवसात जर नादांगाव येथील रोहित्र आला नाही तर छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हाअधिकारी यांच्या कार्यालय समोर तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा ईशारा येथील गुरुप ग्रामपंचायतचे सरपंच मोरसिंग चव्हाण व ग्रामस्थ रवींद्र पाटील, ईश्वर राजपूत, नरेंद्र पाटील, मनोहर राजपूत, जुलालसिंग राजपूत, नितिन पाटील, प्रविण पाटील, महेंद्रसिगं राजपूत, राजेंद्र पाटील, योगेश राजपूत व कृष्णा पाटील व गावातील ग्रामस्थाच्या वतीने देण्यात आला आहे.

सध्या ऐन मे चालू असून तापमान खूपच वाढले आहे. गेले पंधरा दिवसा पासून गावठाण रोहित्र जळल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गिरण्या बंद आहे तीन किमी अंतरावर भर उन्हात जाऊन महिलांना याचा त्रास सहन करावा लागत आहे .उष्णतेने जिव्हाची लाही लाही होत आहे .आमची गावठाण रोहित्र एक ते दोन दिवशात बसलेच पाहिजेत असे निवेदन राज्यांचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्या कडे लेखी निवेदन दिले आहे.

**नितिन पाटील शेतकरी तथा**
**(सामाजिक कार्यकर्ते) नादांगाव ता सोयगाव**



महाराष्ट्र Business Katta












# अनावर


मनोज अग्रवाल
संपर्क क्र. : 9850678395

आधुनिक केसरी

**मानसीला दुःखाचा तीव्र धक्का बसला आणि ती धाय मोकलून रडू लागली. हुंदके देऊन रडणाऱ्या मानसीच्या आक्रोशाचा आवाज ऐकताच सर्व शेजारीपाजारी जमा झाले. सर्वजण तिला रडण्याचे कारण विचारत होते. पण ती रडण्यामध्ये एवढे गर्क होती की तिला आजूबाजूच्या लोकांचे आवाज क्षीण वाटत होते. जसे जसे लोक तिला विचारत होते, तसे तिचे रडणे चालूच होते. तेवढ्यात मानसीची जिवलग मैत्रीण मालती तिथे आली आणि तिने विचारले, " मानसी आधी तुझे रडणे बंद कर. तुझ्या रडण्याचं नेमकं कारण काय आहे ते आम्हाला सांग.**

मानसीने मालतीला बघितले आणि मानसीला आपले दुःख तिच्याकडे मोकळे करावेसे वाटले. जिवलग आणि विश्वासू व्यक्ती आपल्यासमोर आली की आपले दुःख त्या व्यक्तीसमोर मांडायला मन आपसूकच तयार होते. मानसीला अनावर झालेल्या दुःखाचे कारण सांगताना ती मालतीला म्हणाली, " मी घरातली कामे करत असताना अचानकपणे एक माणूस आला आणि त्याने माझा मुलगा मनीष बद्दल अतिशय दुर्दैवी बातमी सांगितली. आज सकाळीच मनीष नवीन ड्रेस घालून ऑफिसला गेला आणि जाताना त्याचा अपघात झाला व त्यात तो मरण पावला असं त्या माणसाने सांगितलं आणि तो निघून गेला. " मानसीने आपले बोलणे पूर्ण न करताच मोठ्या आवाजात रडणे सुरू केले. मानसी ओक्साबॉक्सि रडत होती. सर्वजण तिला समजावत होते. मानसीला अनावर झालेल्या दुःखाची तीव्रता तिच्या आक्रोशमय रडण्यातून व्यक्त होत होती. " माझा मनीष मला आणून द्या. माझा मनीष मला आणून द्या. " अशी हृद्य, आर्त साद ती सर्वांना घालत होती.

तेवढ्यात एक चारचाकी गाडी माणसाच्या घरासमोर येऊन थांबली. पाच सहा माणसांनी पांढऱ्या कपड्यामध्ये गुंडाळलेला मनीषचा मृतदेह गाडीतून बाहेर काढला आणि घरात ओसरीत आणून ठेवला. मनीषचा मृतदेह पाहताच मानसीच्या अश्रूंचा बांध फुटला. आता तर मानसी मोठ्याने आक्रोश करून रडू लागली होती. " मानसी स्वतःला सावर. धीर धर. " असं तिला मालती समजावत होती. "माझ्या पोटाचा गोळा इतक्या लवकर मला सोडून का गेला ? आता माझं काय होईल ?" असं बोलून मानसी हुंदके देत रडत होती.ती दुःख सागरात पूर्णतः बुडाली होती.

" ए आई, उठ लवकर मला ऑफिसला जायला उशीर होतोय. माझा डबा बनवून दे. आज ऑफिसमध्ये खूप कामे आहेत. " असा आवाज मानसीच्या कानावर पडला आणि तिची झोपमोड झाली. डोळे उघडताच मानसीला मनीष तिच्यासमोर दिसला. मानसी बिछान्यावर उठून बसली आणि तिने पाहिले की मनीषला साधे खरचटलेले सुद्धा नव्हते. तिच्या लक्षात आले की ती तीव्र दुःख देणार दुर्दैवी स्वप्न पाहत होती. तिचा एकुलता एक पितृछत्र हरवलेला मनीष जिवंत आणि सुखरूप आहे हे पाहून मानसीच्या आनंदाला पारावार उरला नाही. तिने मनीषला मिठी मारली आणि आनंदाने उसासा टाकला.

मानसी पटकन उठली आणि कामाला लागली.आता तिच्या आनंदाला पारावर उरला नव्हता.

मानसीला आनंद 'अनावर' झाला होता.




# पाचाट


सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**मराठवाड्यातील ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणा-या बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील रहिवाशी असलेले माझे मीत्र परशुराम नागरगोजे यांच्या 'पाचाट' या लघुकादंबरीचे नुकतेच प्रकाशन झाले. मुळ व्यवसायाने विमा प्रतिनिधी असलेले परशुराम नागरगोजे यांची ही पहिलीच कादंबरी. या कादंबरीच्या निमित्ताने त्यांचा साहित्य विश्वात लेखक म्हणून प्रवेश झाला आहे. परशुराम नागरगोजे यांनी स्वत: बालपणी भोगलेल्या ऊसतोड कामगारांच्या कुटुंबातील जीवन संघर्षाची कहानी शब्दबद्ध करून लिहिलेली पाचाट ही साहित्यकृती आहे. या कादंबरीतून त्यांनी अल्पभूधारक शेतकरी, शेतमजुर, ऊसतोड कामगारांच्या कौटुंबीक, आर्थिक, सामाजिक, आरोग्यविषयक समस्या अत्यंत पोटतिडकीने मांडल्या आहेत.**

त्यांनी ही लघुकादंबरी मला समीक्षणासाठी पाठवून दिली आणि ती मा्या हातात पडताच मी एका दमात वाचून काढलीही. पण पाचाटचे वाचन केले असता त्यांचे नवखेपण कुठेच जाणवले नाही. अत्यंत संयत, संयमाने आणि आत्मविश्वासाने त्यांनी ही कादंबरी लिहिल्याचे पदोपदी जाणवते. कादंबरी वाचत असताना त्यातील प्रत्येक प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो. योग्य त्या ठिकाणी निसर्ग वर्णन, प्रसंग वर्णन, पात्रांच्या मनात चाललेले विचारांचे वादळ स्वगताच्या रूपाने उभा करून त्यातील प्रत्येक पात्र आणि एकूण पूर्ण कादंबरीला अधिकाधिक जीवंत करण्याचा लेखकाचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. आळंदी देवाची येथील योगिराज प्रकाशनाने या पुस्तकाचे प्रकाशन केलेले असून मुखपृष्ठ अत्यंत बोलके आणि आकर्षक आहे. या कादंबरीस डॉ. लता पाडेकर यांची प्रस्तावना लाभली आहे. एकूण १२८ पानांची ही कादंबरी असून तिची छपाई सुद्धा खूप उत्तम दर्जाची आहे. पुस्तकाची किंमत अत्यंत माफक रुपये १५० आहे. राज्यात आज जवळपास सव्वाशेवर साखर कारखाने सुरू आहेत. ऊस तोडणी करून या कारखान्यांना त्याचा पुरवठा करण्याचे काम ऊसतोड कामगार करतात. या कामगारांमुळेच साखर कारखानदारी आज एका उंचीवर पोहचू शकली आहे. साखर कारखानदारी आर्थिकदृष्ट्या समृद्ध होत असताना, ऊसतोड कामगारांची आर्थिक स्थिती मात्र सुधारलेली नाही. ऊसतोड कामगार दारिद्र्य, बेरोजगारी, कनिष्ठ दर्जाचे राहणीमान याच्या दुष्टचक्रात सापडल्याचे आढळते. वाढत्या महागाईने सधन लोकांना अनेक प्रश्न भेडसावत आहेत, तिथे या ऊसतोड कामगारांची काय कथा ! ऊसतोड कामगारांच्या जीवनाची ही व्यथाच या कादंबरीतील मुख्य नायक गंगारामच्या रूपाने आपल्या समोर लेखकाने ऊभा केली आहे. या नायकाने अल्पभूधारक शेतकरी आणि ऊसतोड कामगार अशा दोन भूमिका निभावल्या आहेत. काळ्या आईवर तो आणि त्याचे कुटुंब अगदी मनापासून प्रेम करते. शेती हा त्याचा श्वास आहे मात्र त्यातील उत्पन्नानावर त्याचा उदरनिर्वाह चालत नसल्याने दरवर्षी सतोडीला जाणे ही त्याच्या आयुष्याची विवंचना आहे. यात त्याला प्रत्येक पावलावर साथ देणारी, तो नाउमेद झाला असता त्याचा उत्साह वाढवणारी त्याची अर्धांगिनी कौशल्या आहे. जितके कष्ट गंगारामच्या वाट्याला येतात, त्याहून अधिक कौशल्याने कौशल्या कामाचा निपटारा करते. ''आपल्या जीवाच रान करायच ; पण लेकरांच्या नशिबी आसलं जिणं येऊ द्यायचं नाही. लेकरं शिकवायची, मोठी साहेब करायची. पैसा कमी पडला तर शेतं इकायची ; पण पोरांच कल्याण करायचं'' या स्वगतातून तिची आपल्या कुटुंबाप्रती काळजी दिसून येते. स्त्रियांसाठी, लहान मुलांसाठी हळवा झालेला हा लेखक मातृहृदयी आहे. लहान मुले, स्त्रिया यांच्यासाठीचं हे हळवेपणच लेखकाला माणूस म्हणून एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाते. ऊसतोडीचा हंगाम दरवर्षी साधारणतः नोव्हेंबर महिन्यात सुरू होऊन, तो मार्च-एप्रिलपर्यंत चालतो. या पाच-सहा महिन्यांसाठी कामगारांना कामासाठी स्थलांतर करावे लागते. हंगामादरम्यान त्यांना तात्पुरत्या खोपी किंवा पालात राहावे लागते. एका ठिकाणचा ऊसाचा फड संपल्यानंतर दुसऱ्या ठिकाणी बाडबिछाना हलवावा लागतो. तेथे त्यांना स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी वा शौचालय या सुविधांची वाणवा असते. कडाक्याची थंडी, ऊन, वादळ-वारा, अवकाळी पाऊस यासारख्या अनेक समस्यांना तोंड देत ऊसतोड कामगारांचे काम सुरू असते, अविरतपणे. यांचा दिवस पहाटेच सुरू होतो तो ऊस तोडणी, बांधणी आणि वाहनांमध्ये लादनी करता करता कधी संपतो ते कळत नाही. दिवसाकाठी दोन ते अडीच टनाची गाठ घालण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यावरच त्यांची दिवसाची मजुरी ठरते. राज्यातील वेगवेगळ्या साखर कारखान्यांमध्ये ऊसतोड मजुरी ही वेगवेगळी आहे. या कामगारांना दिवसाकाठी जवळपास ७०० ते ८५० रुपये मजुरी मिळते. असे असले तरी त्यात सातत्य नाही, हेही तितकेच खरे. साखर कारखान्याचा तांत्रिक घोटाळा, नैमित्तिक क्लिनिंग, वाहनाचा घोटाळा, वा हवामानातील बदल यामुळे चार-चार दिवस कामाचे खाडे पडतात. तेव्हा त्याची मजुरी मिळत नाही. मुकादमाकडून उचललेली उचलही न फिटल्याने दरवर्षी ऊसतोड कामगाराकडेच बाकी राहते. त्यामुळे ऊसतोड कामगारासाठी मुकादम कधी मद्दगार तर कधी खलनायक ठरतो. ''अरं ! हितच सगळा सिजन गेला. काही केलं नाहीस अन गावाकडं गेल्यावर दात पाडून देणार हायस काय ? गंगाराम तूझं तू काहीबी कर अन माझी बाकी देवून टाक. त्याच्याशिवाय तुला गावाकडं जाऊ देणार नाही '' असं म्हणणारा मुकादम वाचकांचा तिळपापड करून जातो. दुसरीकडे, ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना शैक्षणिक सुविधांची मोठी कमतरता आहे. कामाच्या ठिकाणी शाळेची सुविधा नसल्याचे अनेक कामगारांचे म्हणणे आहे. तर ज्या ठिकाणी शैक्षणिक सुविधा आहेत, त्या ठिकाणच्या पाल्यांच्या शाळेची वेळ, परत येण्याची वेळ, अभ्यास याकडे लक्ष द्यायला पालकांना वेळ नसल्याचे दिसते. याचा एकंदरीत विपरीत परिणाम पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होतो. ऊसतोड कामगारांच्या पाल्यांचे शैक्षणिक नुकसान त्यांना परत दारिद्र्याच्या चक्रात लोटणारे आहे, हे सत्य. त्यामुळे पिढ्यान-पिढ्या कोयता काही हातचा सुटत नाही. आपली मुलं शिकली तर कोयता नक्की सुटेल या आशावादाने मुलांना शिकवण्यासाठी गंगाराम आणि त्याची पत्नी दिवसरात्र राब राब राबताहेत. ग्रामीण भागात पाचाट हा शब्द जवळपास सर्वांच्या परिचयाचा आहे. ऊसाचा पाला म्हणजेच पाचाट. पाचाट हे एकतर जाळले जाते किंवा जमीनीमध्ये कुजवले जाते. जोपर्यंत ऊस खाण्यायोग्य होत नाही तोपर्यंत ते ऊसाचे रक्षण करते. एकदा का ऊस तुटून गेला की, ऊसाची साखर होते व पाचटाची माती होते. अगदी काहीसे असेच या साहित्यकृतीतील गंगाराम या नायकासोबत घडले आहे. सुरवातीला समाजव्यवस्थेने आणि नंतर काळाने क्रुर चेष्टाच केली. त्याच्यावर नियतीने मांडलेला डाव पाहिला असता वाचकाचे डोळे पाणावल्याशिवाय राहणार नाही, मन गहिवरल्याशिवाय राहणार नाही. आयुष्यभर पाचाटाशी संगत केलेल्या नायकाच्या आयुष्याच कथेच्या शेवटी पाचाट होत. म्हणून लेखकाने या साहित्यकृतीला दिलेलं पाचाट हे नाव सर्वार्थाने फलद्रूप झाल्याची अनुभूती येते. अस्सल ग्रामीण भाषेत लिहिलेली पाचाट ही कादंबरी ऊसतोड कामगारांची व्यथा मांडणारी तर आहेच. सोबत यातून कौटुंबीक सौख्य, सहकार, मोठ्यांचा आदर, मातृ-पितृ भक्ती, सामंजस्य, परिस्थितीची जाण या संस्कारांची न कळत पेरणं झाल्याची पहायला मिळते. ऊसतोड कामगारांच्या समस्या, जगण्याचा जीवघेणा संघर्ष, वारंवार स्थलांतर आणि विस्थापन, तरीही जगण्याचा दुर्दम्य आशावाद आणि दारिद्र्याचे दशावतार अशा विदारक सामाजिक प्रश्नावर एका ऊसतोड कामगाराची हृदय पिळवटून टाकणारी अत्यंत करूणामय कहानी वाचल्यावर वाचक अंतर्मुख आणि दिडमूढ होवून जातो, हेच या कादंबरीचे यश आहे. मला खात्री आहे, ही कादंबरी वाचकांच्या नक्कीच पसंदीस पडेल आणि वाचकांच्या हिच्यावर उड्या पडतील. लेखकाने पुस्तक आपल्या हाती दिले आहे. आता आपण लेखकाच्या आशावादाला वाचक व संवेदनशील माणूस म्हणून प्रतिसाद देऊया.




आधुनिक केसरी

## लय भारी सुगरण


सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

# क्रिस्पी कॉर्न



**साहित्य :** दीड वाटी स्वीटकॉर्न , 1 वाटी मैदा ,2 वाट्या कॉर्न फ्लोअर , 2 चमचे बारीक कट केलेला लसूण, 1 सिमला मिरची बारीक चिरलेली ,1 कांदा बारीक चिरलेला , 1 चमचा रेड चिली सॉस, 4..5 चमचे टोमॅटो सॉस , 2..3 लाल सुक्या किंवा हिरव्या मिरच्या मोठ्ठे तुकडे , पाव वाटी बारीक चिरलेली कांदा पात , 1 चमचा मिरी पावडर ,तेल, मीठ .

**कृती :** प्रथम गॅसवर कढई मध्ये 3..4 बाउल पाणी गरम करून त्यात स्वीटकॉर्न घालून मध्यम आचेवर 7 मिनिटे कॉर्न छान उकळावेत . छान फुगून त्यांचा रंग बदलला की समजावे ते मस्त शिजले आहेत .मग मोठ्ठ्या तारेच्या चाळणीतून सर्व पाणी काढून ते कोरड्या कपड्याने सुकवावेत .आता ते मोठ्ठया भांड्यात घालून हाताने दाबून थोडे दुखवून त्यांतील सर्व पाणी बाहेर येईपर्यंत रगडावेत .मग त्यात 1 चमचा मैदा आणि 2 चमचे कॉर्नफ्लोअर घालून मिक्स करून हलवून घ्यावे .आता त्यांना ते पीठ चिकटले असेल .मग पुन्हा 1 चमचा मैदा व 2 चमचे कॉर्न फ्लोअर घालून टॉस करावे .असे 3..4 वेळा केले की कॉर्नची शोषण क्षमता थांबून ते कोरडे होतील. आता गॅसवर कढईत भरपूर तेल घालून ते तापत आले की कॉर्न चाळणीने चाळून जास्तीचे पीठ काढून त्यात तळण्यासाठी घालुन् त्यावर 80 %झाकले जाईल असे झाकण ठेवावे. कॉर्नमध्ये पाणी राहिले असेल तर एखादेवेळी ते फुटण्याची शक्यता असते .सर्व बुडबुडे जाऊन रंग बदलून ते तळले गेले की जाळीच्या रोळीत काढावेत .2 टप्प्यात याच पद्धतीने सर्व कॉर्न तळावेत .पण दोन्ही वेगवेगळ्या भांड्यात काढावेत . मग आधी तळलेले कॉर्न पुन्हा एकदा छान तळावेत म्हणजे जास्त क्रिस्पी होतात .दुसरेही असेंच तळून मस्त क्रिस्पी करून तारेच्या रोळीत काढून ठेवावेत. आता कढईत 2 चमचे तेल घालून त्यात लसुण घालून त्यावर मिरच्यांचे तुकडे घालून लगेंच कांदा सिमला मिरची , घालून छान परतावे .नंतर मिरी पावडर घालून रेड चिली सॉस , टोमॅटो सॉस घालून अर्धी कांदा पात घालून कॉर्न घालून त्यात मीठ व अजून तिखट पाहिजे असेल तर लाल तिखट घालून छान एकत्र करून वरून बाकीची कांदा पात घालून मिक्स करून सर्व्हिंग डिशमध्ये काढून सर्व्ह करावे.

**वैशिष्ट्य :** अशा पद्धतीने केलेले कॉर्न खात्रीने क्रिस्पी व चटपटीत आणि टेस्टी होतात .व जास्त काळ कुरकुरीत राहतात .

# संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र




नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी

**संविधानाविषयी अत्यावश्यक माहिती जाणून घेतल्यानंतर, आता आपण त्याच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न करणार आहोत. संविधानाच्या अनुच्छेदांना एकेक करून समजून घेऊनच आपण त्याचे अंतरंग जाणू शकतो. आपणास पूर्व कल्पना आहेच की, आपल्या संविधानात '२५ भाग' '१२ अनुसुच्या' आणि '३९५ अनुच्छेद' आहेत. गरजेनुसार वेळोवेळी आपल्या राज्यघटनेत 'घटनादुरुस्त्या' होऊन या अनुच्छेदांची संख्या '४५०' च्याही वर पोहोचलेली आहे. परंतु हे वाढलेले अनुच्छेद '३९५' च्या पुढे न मांडता, आहे त्याच अनुच्छेदांमध्ये 'खंड, उपखंड' म्हणून मांडल्यामुळे आपल्या राज्यघटनेतील अनुच्छेदांची संख्या ही '३९५च' दिसते.**

भारत स्वतंत्र झाला, त्यावेळी अनेक समस्यांचा सामना आपण करत होतो. त्यातच आणखी एक नवीन समस्या उभी राहिली. 'तेलगु' भाषिकांनी 'मद्रास' राज्यातून भाषेच्या आधारावर वेगळ्या आंध्र राज्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरू केले. यासंदर्भात विचार करण्यासाठी जून १९४८ मध्ये भारत सरकारने एस. के. धर यांच्या अध्यक्षतेखाली एक भाषिक आयोग नेमला. या आयोगाने डिसेंबर १९४८ मध्ये आपला अहवाल सादर केला. या अहवालात राज्यांची पुनर्रचना ही भाषेच्या आधारावर नव्हे, तर प्रशासकीय सुधारणांवर आधारित असावी, अशी शिफारस केली. अशा प्रकारे ह्या 'एस. के. धर कमिशनने' भाषेच्या आधारावर वेगळ्या आंध्र राज्याची मागणी फेटाळून लावल्याने हे आंदोलन अधिक तीव्र झाले. त्यावर उपाय शोधण्यासाठी पं. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल व पट्टाभी सितारामय्या या तिघांची एक J.V.P. समिती नेमण्यात आली. या समितीने एप्रिल १९४९ मध्ये आपला अहवाल सादर केला. या समितीने देखील राज्यांची पुनर्रचना ही भाषेवर आधारित नसून प्रशासकीय सुधारणांच्या आधारे व्हावी, अशी शिफारस केली. म्हणजेच या समितीने देखील वेगळ्या आंध्र राज्याची मागणी अमान्य केली.

यादरम्यान, भाषेच्या आधारावर वेगळ्या 'आंध्र' राज्याची मागणी करण्यासाठी 'आमरण उपोषण' करणाऱ्या "पोट्टी श्रीरामुलू" ह्या आंदोलनकर्त्या प्रमुख नेत्याचे उपोषणादरम्यान मृत्यू झाल्याने, हे आंदोलन प्रचंड चिघळले. त्यामुळे "फजल अली" यांच्या अध्यक्षतेखाली १९५३ मध्ये 'राज्य पुनर्गठण आयोगाची' स्थापना करण्यात आली. या आयोगाने केलेल्या शिफारसीनुसार १९५३ मध्ये 'भाषेच्या आधारावर' देशातले पहिले राज्य म्हणून "आंध्र राज्य" अस्तित्वात आले. परंतु या घटनेचा परिणाम व्हायचा तोच झाला. देशातील इतर राज्यात देखील 'भाषा आणि संस्कृतीच्या' आधारावर वेगळ्या राज्यांची मागणी होत होती. त्यांनी या घटनेमुळे आपल्या मागणीचा जोर वाढवला. त्यामुळे



भाग -१३

१९५६ मध्ये 'राज्य पुनर्घटन आयोगाच्या' शिफारसी नुसार "राज्य पुनर्गठन कायदा-१९५६" बनविण्यात आला. राज्यघटनेत ७ वी घटनादुरुस्ती करून या अगोदर ज्या A, B, C, D अशा चार श्रेण्या आपण राज्यांसंदर्भात बनवल्या होत्या, त्या सर्व रद्द करून दोनच प्रकारचे राजकीय एकके आपण बनवले. एक म्हणजे 'राज्य' आणि दुसरे 'केंद्रशासित प्रदेश'. त्यावेळी '१४ राज्ये' आणि '६ केंद्रशासित प्रदेश' बनविण्यात आले. हळूहळू त्यांची संख्या वाढत गेली.

आता आपण १९५६ नंतरही नविन कोणकोणते 'राज्य' आपल्या येथे निर्माण झाले, ते पाहुयाः-

१) १९६० साली भाषेच्या आधारावर 'महाराष्ट्र' आणि 'गुजरात' ह्यांची स्थापना झाली.

२) १९६३ साली 'आसाम' राज्यातून 'नागालँड' हे राज्य स्थापन झाले.

३) १९६६ -- 'हरियाणा'.

४) १९७२ साली 'मेघालय', 'मणिपूर' आणि 'त्रिपुरा' ह्या तीन राज्यांची स्थापना झाली.

५) १९७५ -- 'सिक्कीम'.

६) १९८७ साली 'मिझोरम', 'अरुणाचल प्रदेश' व 'गोवा' ह्या तीन राज्यांची स्थापना झाली.

७) १ नोव्हेंबर २००० -- 'छत्तीसगड'.

८) ९ नोव्हेंबर २००० --उत्तर प्रदेशातून 'उत्तराखंड' राज्य स्थापन झाले.

९) १५ नोव्हेंबर २००० -- 'झारखंड'.

१०) २ जून २०१४ रोजी 'तेलंगाना' राज्याची निर्मिती झाली.

सध्या भारतात 'अनुच्छेद-३७०' रद्द करण्यासोबतच जम्मू आणि काश्मीर या राज्याला असलेला राज्याचा दर्जा काढून त्याचे जम्मू आणि लडाख असे दोन केंद्रशासित प्रदेश केल्याने, आता देशात एकूण '२८ संघराज्य' व '८ केंद्रशासित प्रदेश' आहेत.

# तीर्थंकर भगवान महावीर वर्धमान: उत्तम संग्राह्य ग्रंथ



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी


**अलीकडे मोबाईलचा सुळसुळाट आणि सर्वत्र भूलभुलैया मिडियामुळे वाचन आणि लेखन संस्कृती लोप पावत असतांना वाळवंटात मारुद्यान सापडावे त्याप्रमाणे बोटावर मोजता येतील एवढे लोक हल्ली मूलगामी चिंतन-मनन-वाचन-लेखन करून वाघिणीच्या दुधासी आपली इमानदारी जपताहेत! त्यापैकीच एक असलेले महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध रंगकमी, पत्रकार, प्राचार्य, संशोधक, संपादक, फिल्म-माहितीपट निर्माते, व्यासंगी लेखक, फर्डे वक्ते असे बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणजे मराठवाड्याच्या मातीत जन्मून कोल्हापूरच्या मातीत रुजलेले पुरोगामी विचारवंत, निवृत्त प्राचार्य डॉ.बाबा बोराडे यांनी नुकतेच 'तीर्थंकर भगवान महावीर वर्धमान' हा महत्वपूर्ण ग्रंथ लिहिला आहे.**

आधुनिक केसरी

श्री मिलिंद काटे यांच्या अनुराधा प्रकाशन प्रकाशित या महत्वपूर्ण ग्रंथाचे जयसिंगपूर (कोल्हापूर) येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत आज प्रकाशन होत आहे.अनुराधा प्रकाशन हे महाराष्ट्रातच नाही तर सातासमुद्रापार जाऊन पुस्तके प्रकाशित करून आलेले अनुभवी प्रकाशन आहे. हे शिवधनुष्य पेलण्याचे काम एक व्यासंगी, चिंतनशील लेखक, ज्यांची जवळपास पन्नासच्यावर महत्वपूर्ण पुस्तके प्रसिद्ध आहेत असे मित्रवर्य श्री मिलिंद काटे एकटेच करत असतात. व्यासंगी लेखकास अनुभवी लेखक-प्रकाशक भेटले आणि सृजन-सुपीक जमिनीत विचार-शुद्ध बीज रुजले! मैत्री सुगंधाळली व महाराष्ट्रातील अनेक सृजनांचा मिळून एक समूह तयार झाला. त्यातून दिल-दोस्ती-दुनियादारी बहरत गेली. विविध विषय-आशयावर चर्चा होऊन 'वावर' आणि 'सृजन सोबती' समूहाला लागलेले सुमधुर फळ म्हणजे प्रा.डॉ.बाबा बोराडे लिखित 'तीर्थंकर भगवान महावीर वर्धमान' हा ग्रंथ होय.

काळ कोणताही असो, त्या काळात कोण काय लिहितो, बोलतो? कोणते ग्रंथ प्रकाशित होतात? कोणत्या लोकांचा सन्मान होतो? तरूण काय वाचतो, काय ऐकतो आणि काय करतो? याचे समकालीन समाजामध्ये इष्ट-अनिष्ट परिणाम काय जाणवतात? यावर देशाचे पुढील शंभर वर्षांचे भविष्य अवलंबून असते. तेंव्हा समकालीन लेखकांनी आपल्या काळातील घडामोडींवर लिहिलेच पाहिजे. लेखणी पैशाने किंवा सत्तेच्या वजनाने झुकली-वाकलेली नसावी! त्याचबरोबर आपला महान वसा-वारसा जे महापुरुष मागे ठेवून गेले आहेत त्यांच्या विचारांचे समकालीन परिपेक्षात चिंतन-मंथन व्हायला हवे. विस्मृतीतील महापुरुष-तत्वे पुन्हा लोकाभिमुख होणे काळाची गरज आहे. त्याच अनुषंगाने डॉ.बोराडे सरांनी हा ग्रंथ लिहिला आहे. ग्लोबल वार्मिंगच्या काळात वैश्विक तापमानाबरोबरच माणसही गरम होताहेत. दया, प्रेम, शांती, जिव्हाळा, आपुलकी हे केवळ पुस्तकात वाचायला मिळत असतांना महापुरुषांच्या शांततापूर्ण विचारांचे सिंचन होऊन नव्या पिढीतील सर्वच सृजनांनी जैन धर्मातील शेवटचे तीर्थंकर भगवान महावीर समजून घ्यावेत, त्यासाठी हा सगळा खटाटोप सुरु आहे.

चार पुरुषार्थापैकी धर्म आद्य पुरुषार्थ! प्रत्येकजण धार्मिक आहे. नास्तिक सुद्धा एक धर्मच आहे. धर्म म्हणजे विचार धारण करणे होय. कोणत्याही धर्मातील मूलतत्वांचे चिंतन-मंथन केले असता त्या धर्माला चिकटलेले थोतांड-कर्मकांड गळून पडतात आणि मग शिल्लक राहतो तो निखळ-निका विचार! तोच खरा धर्म! डॉ.बोराडे हे मुळात जैन धर्मीय नसले तरी ते एक चिंतनशील सृजन आहेत. 'तीर्थंकर भगवान महावीर वर्धमान' लिहितांना डॉ.बोराडेंना आपल्या भोवतालच्या जैन लोकांच्या व्यासंगाने जैन धर्म तत्वे, विविध तीर्थंकर आणि त्यातील शेवटचे तीर्थंकर भगवान महावीर वर्धमान यांच्या कार्य-कर्तृत्वाविषयी कुतूहल निर्माण झाले. प्रस्तुत ग्रंथ एकूण पाच प्रकरणामध्ये लिहिलेल्या ग्रंथास व्यासंगी संशोधक प्रा.डॉ.विजय पाटील यांचा महत्वपूर्ण अभिप्राय, सुप्रसिद्ध कवयित्री सुनंदा शिंगनाथ यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना आणि श्री मिलिंद काटे यांनी विवेकशिल चिंतनाने केलेली पाठराखण हे या पुस्तकाचे महत्वपूर्ण भाग आहेत. डॉ.बोराडे हे विद्यावाचस्पती आणि संशोधक मार्गदर्शक आहेत. त्यांचा लेखन-संशोधन कार्याचा दांडगा अनुभव इथे दृगोचर झाल्याशिवाय रहात नाही. त्यांची अगोदरची पुस्तके आणि विविध प्रस्तावना पहिल्या असता ते एक उत्तम चित्र-चरित्रकार, संशोधक आहेत. त्यांनी जैन धर्मातील महत्वपूर्ण ग्रंथ आणि वेबसाईटवरील लेखनाचा अभ्यास करून हे पुस्तक लिहिले आहे. पहिल्या प्रकरणात जैन धर्माचा इतिहास लेखन करतांना त्यांनी मानवाच्या उत्पत्तीपासून, सिंधू संस्कृती ते कुलकर किंवा मनु पर्यंत विश्लेषण करतांना जैन धर्मातील चोवीस तीर्थंकर, बारा चक्रवर्ती, नऊ बलभद्र, नऊ वासुदेव वगैरे बाबींचे चित्रण केले आहे. जन म्हणजे सामान्य लोक, जैन म्हणजे जैन धर्माच्या मार्गाने चालणारा आणि जीन म्हणजेच स्वतःच्या इंद्रियांना जिंकणारा. ही जीं धर्मातील सर्वोच्च अवस्था आहे. "ज्या जीवाचे मानसिक, वाचिक, कायिक विचार-व्यवहार शुद्ध आहेत. तो व्यक्ती धर्म किंवा मतभेद विरहीत जीन होतो" असे लिहून बोराडे, जैन धर्म हा एक शाश्वत धर्म आहे असे सांगतात. त्यानंतर बोराडे सर्वच चोवीस तीर्थंकाराच्या




यादीतील प्रथम तीर्थंकर ऋषभदेव, आदिनाथ यांची माहिती देतात. हकार, मकार आणि धिक्कार नीतीचा उल्लेख इथे आहे. तसेच ७२ कला, ६४ विद्या, १८ अंकलिपी, पात्र, औजारे, वस्त्र, चित्र आदि शिल्पांचा, व्यवसाय, व्यवहार, मृत व्यक्तीला दाह देणे इत्यादी बाबी ऋषभदेव यांच्याच काळात प्रारंभ झाल्याचा उल्लेख इथे आहे. नृत्यांगना निलांजनाच्या अचानक मृत्यूने ऋषभदेव जागृत झाले आणि भाऊ बाहुबलीकडे राज्य सोपवून सर्वसंग परित्याग करून ते तपश्चर्येला निघून गेले. त्यानंतर उर्वरित तीर्थंकारांची यादी देऊन बोराडे सर जैन धर्माची महत्वपूर्ण वैशिष्ट्ये स्पष्ट करतात. माणसातच देव आहे, अनेकांत सिद्धांत, औदार्य, अहिंसा, कर्म मुक्ती देणारा जैन धर्म आहे. सहनशिल, संयम, सहकार्य, सहअस्तित्व, श्रमण, आनंदी व्यावहारिक जीवन, अध्यात्मिक चेतना इत्यादी शिकवण देणारा जैन धर्म आहे. याशिवाय अहिंसा परमो धर्म, स्यादवाद, पंचमहावृत्ते, तीन गुणवृत्ते, चार शिक्षावृत्ते आणि जैन धर्मातील पंथाचे विश्लेषण इथे आले आहे. त्यानंतर भगवान महावीर यांचे जीवन-चरित्र-कार्याचा विस्ताराने उल्लेख आहे. इथे मात्र महावीरांचे कार्य आणि तत्वज्ञान विस्ताराने देण्याऐवजी बोराडे सरांना महावीरांच्या जन्म-जीवनातील विविध मिथकांनी आकर्षित केले आहे. त्यांची दीक्षा, साधना, भ्रमंती, केवळ ज्ञान कल्यानक, पहिली धर्मदेशना (उपदेश), पहिले प्रवचन, समवसरण, मोक्ष कल्याणक आदि प्रसंगांचे विस्ताराने विवेकशील चिंतन वाचायला मिळते. शेवटच्या प्रकरणात भगवान महावीरांचे तत्वाचरण यावर लिहिले असून त्यानंतर महावीर वर्धमानानंतर जैन धर्मात काय काय स्थित्यंतरे झाली त्यात सहा आचार्य, तीन मुख्य परंपरा, आणि काही ऐतिहासिक तथ्ये मांडतांना भारतभर, जगभर जैन धर्म आपल्या अनमोल तत्वांनी कसा सर्वमान्य झाला याचे विवेचन आले आहे. शेवटी जगभरातील २३८ जैन तीर्थ आणि संदर्भ सूचीने हा संक्षिप्त ग्रंथ थांबतो.

सज्जन बंधू-भगिनींनो, सांप्रतकाळी क्रोध, असहिष्णुता, असहकार, कट्टरता, उतावीळपणा वाढल्यामुळे माणसामाणसातील संवाद खुंटला आहे. तेंव्हा शांती, सहकार, प्रेम, वात्सल्य, आपुलकी, जिव्हाळा, सहिष्णुतेची जगाला नितांत अवश्यकता असून त्यासाठी जैन धर्माच्या शांती, अहिंसा, सहकार, सहअस्तित्व, सन्मान इत्यादी वैश्विक तत्वांची समाजात पुन्हा रुजवणूक होण्याची नितांत आवशकता आहे. त्यासाठी डॉ.बाबा बोराडे सर लिखित, अनुराधा प्रकाशनाने प्रकाशित केलेला 'तीर्थंकर भगवान महावीर वर्धमान' हा छोटासा ग्रंथ प्रत्येकाने वाचून नक्की संग्रही ठेवावा व आपल्या जीवनात रुजवावा. जय जिनेंद्र!

# कल्पनाशक्ती आत्मसात करा!

आधुनिक केसरी

प्रत्येकाच्या जीवनात कल्पनाशक्तीला खुप महत्व आहे. अफाट कल्पनाशक्ती ही माणसाला मिळालेली देणगीच आहे. प्रत्येकाने आपल्या जीवनात कल्पनाशक्तीचे महत्व समजावून घेणे गरजेचे आहे. आईन्सटाईन नेहमी म्हणायचे ज्ञानापेक्षा कल्पनाशक्ती महत्वाची आहे. जीवनात कल्पनाशक्ती असेल तर आपण जीवनात कोणतेही ध्येय साध्य करू शकतो. जगात अशी कुठलीही जादुची कांडी नाही आणी जादुने काही निर्माणही करता येत नाही. मात्र मनात जर आपल्या कल्पनाशक्ती असली की आपण यशापर्यंत पोहचू शकतो. फक्त ती आपल्याला ओळखता आली पाहिजे. आपल्या जीवनात कल्पनाशक्ती आत्मसात केली तर तर आपण निश्चितच कायापालट करू शकतो. तेव्हा कल्पनांवर विचार करा.त्या सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्न करा.आजपर्यंत जगात जे काही बदल व स्थित्यंतरे झाली ही कल्पनाशक्तीतुनच झाली आहे.यात काही शंका घेण्याचे कारण नाही.आदीमानवाने दगडावर दगड घासुन उर्जेची निर्मिती केली.व अग्नीचा शोध लागला. गुहेच्या बाहेर रेघोट्या मारत त्यातूनच चित्रकलेचा शोध लागला.गुणगुणन्यातुन गाण्याचा जन्म झाला. हे सारे कल्पनाशक्तीमुळेच शक्य झाले. कल्पनाशक्ती आत्मसात करण्यासाठी मनाची एकाग्रता लागते.प्रंचड आत्मविश्वास लागतो. आज आपण पाहतो जगात जेवढी माणसं यशस्वी झाली. मग आपण का नाही होणार त्यांच्यात अफाटशक्ती होती.आपणदेखील आपली कल्पनाशक्ती आत्मसात केली पाहिजे.तेव्हा आपण यशाचे शिखर गाठू शकतो.जीवनात कल्पनाशक्तीला खुप महत्व आहे. यशाकडे वाटचाल करत असताना कल्पनाशक्ती हा पहीला टप्पा आहे. नव्या वाटेने चालणे हे सोपे कधीच नसते.परंतू रूळलेल्या वाटेने जाणे कधीही फायदेशीर ठरते.आपल्या जीवनात नावीन्यपूर्ण कल्पना जोपर्यंत आपल्या मनात येत नाही. तोपर्यंत आपण यशस्वी होऊ शकत नाही. जग बदलण्याची ताकद आपल्यात आहे.

संतोष दत्तू शिंदे, मु.पो.काष्टी,ता. श्रीगोंदा, जिल्हा, अहमदनगर
मो.७७२१०४५८४५

कल्पनाशक्ती ओळखून आत्मसात करून ती विकसित करणे गरजेचे आहे. नशिबाने आपल्याला काही मिळेल हा भाबडा आशावाद सोडून द्या. मनात कल्पनाशक्ती असल्याशिवाय आपण पुढे जाऊ शकत नाही. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कल्पनाशक्ती आत्मसात करा. यश मिळवायचे असेल तर कल्पनाशक्ती आत्मसात करणे गरजेचे आहे.




# बळीराजाच्या वेदना काळजात पेरणारा कवितासंग्रह



बबलू कराळे
संपर्क क्र. 7218029838

आधुनिक केसरी

**बळीराजाच्या वास्तव वेदना मांडणारा पोशिंदा हा कविता संग्रह साहित्य साधना प्रकाशनने प्रकाशित केलेला आहे, डॉ. सतीश तराळ यांची प्रस्तावना या कविता संग्रहाला लाभली आहे. शेतकरी आपल्या शेती मध्ये राब -राब राबून धान्य पिकवतो आणि सर्व जगाचे पोट तो भरतो म्हणूनच त्याला या जगाचा पोशिंदा म्हटलेलं आहे. हाच दृष्टिकोन पुढे ठेऊन या कवितासंग्रहाची निर्मिती झालेली आहे, असे कविता वाचल्यावर कळते.**




या कविता संग्रहात एकूण ४४ कविता आहेत. सर्वच कविता अष्टाक्षरीआहेत.

किशोर बुरघाटे यांचेवर कवयित्री बहिणाबाई यांच्या रचनाबंधनाचा प्रभाव आहे. त्यातून त्यांनी अष्टाक्षरी रचना केली आकृतीबंध त्यांनी बहिणाबाईचा स्वीकारला असला तरी त्यांनी बहिणाबाईचेअनुकरण केलेले नाही. त्यांची कविता त्यांची स्वतःची स्वतंत्र

कविता आहे. त्यांनी कविता संग्रहाला 'पोशिदा' शीर्षक दिले आहे कारण या संग्रहात पोशिंदयावरील कविता आहेत. भारतीय शेतकऱ्यांची शोकांतिका हा वैधित चर्चेचा आणि चिंतेचा विषय आहे. गेल्या तीस बत्तीस वर्षापासून मोठ्या प्रमाणात शेतकरीआत्महत्या करीत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्तेच प्रमाण महाराष्ट्रात जास्त आहे.

महाराष्ट्रात विदर्भ हा शेतकरी आत्महत्येचा प्रदेश म्हणून भारताच्या नकाशात ओळखलाजावू लागला आहे. इतर भाषिक कवी, लेखकही विदर्भातील शेतकऱ्यांच्या व्यथावेदनांवर लेखन करीत आहेत. मराठी कवी, लेखकांनीही या समस्येवर प्रभावी लेखन केले आहे.किशोर बुरघाटे यांनी पोशियाची व्यथा उत्कृष्ट मांडली आहे.'पोशिंदा' शेतकऱ्यांना वर्षभर कष्ट करावे लागतात. दुष्काळ नापिकीचा सामना करावा लागतो. भ्रष्ट व्यवस्थेने त्याला दारिद्र्य आणि दुःख दिले आहे,

**"रात्रदिवस खातात**
**ज्याच्या कष्टाचा मलिंदा**
**शेतकरी बाप माझा**
**उभ्या जगाचा पोशिंदा."**

'पावसाया' ही कविताही शेतकऱ्याच्या व्यथांशीच संबंधीत आहे. अतिपावसान होणार शेतकऱ्याचं नुकसान व त्याची अगतिकता या कवितेत आहे. शेतकरी बाप कवितेतही शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांना वाचा पोडण्यात आली आहे. अंगात थंडी ताप असताना तो राबतो, कष्टतो, रात्रंदिवस कामधंदा करता, चटणी-भाकर खातो , मनस्ताप सहन करतो.

**"उभ्या जगाचा पोशिंदा**
**त्याच्या भाळी मनस्ताप**
**अतिवृष्टी दुष्काळात**
**नापिकी कर्जाचा शाप"**

'कष्टकरी' ही कविताही शेतकऱ्याच्या शेतमालाला उत्पादन खर्चानुसार भाव मिळत नाही त्याचे दुःख व्यक्त करणारी आहे. काळ्या आईचा सुपूत्र म्हणून शेतकऱ्याचा गौरव केला जातो. कष्ट करून तो मातीत मोती पिकवतो पण

**"दिवस रात्र गाळतो**
**शेतात रक्ताचा घाम,**
**सरकार देत नाही**
**कष्टाच्या मालाला दाम."**

'उस तोडणी' या कवितेत उसतोड कामगारांच्या व्यथा उत्कृष्ट मांडल्या आहेत. 'माझा शेतकरी'तही शेतकऱ्याची दैना स्पष्ट केली आहे. शेतकरी या शेवटच्या कवितेतही शेतकरी चटणी भाकर खातो, नापिकीचा सामना करतो, त्याच्या कापसाला भाव नाही, महागाई, आजारपण, लहरी निसर्ग, दारिद्र्य आदि संकटांना तो धैर्याने तोंड देतो इत्यादी बाबी उत्तमपणे मांडल्या आहेत.कुटुंबाला सामर्थ्याने धैयनि समोर नेई माझा शेतकरी राजा संकटाला तोंड देई किशोर बुरघाटे यांच्या शेतकऱ्यावरील कविता शेतकऱ्याची अगतिकता, श्रमनिष्ठा,विपन्नावस्था, त्याची सोशिकता, त्याच धैर्य, त्यांच्या जीवनात येणारी संकट यांच वर्णन करणाऱ्या आहेत. कृषकांच्या व्यथा, वेदना, यातना याच वास्तव वर्णन त्यांनी केल आहे. या कवितांमधून विविध विचार भावना आल्या आहेत. कवीची सामाजिक, राष्ट्रीय भावना तीव्र आहे. सामाजिक परिस्थितीचे योग्य भान कवीला आहे. एकदरीत पोशिंदा हा शेतकऱ्यांच्या वास्तव जीवनावरील उत्तम कविता संग्रह आहे.नवे कवी बहुतेक मुक्त छंदात लिहितात. किशोर बुरघाटे यांनी मात्र अष्टाकरी काव्य प्रकार निवडला आहे व त्याला बऱ्याच प्रमाणात न्याय दिला आहे. कवीचे काव्यवाचन, चिंतन, लेखन जसे जसे पुढे जाईल तशी ही कविता अधिक सुसंगत, सुरेख, अर्थसधन

होत जाईल. मी त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा देतो.

**पृष्ठ :56**
**किंमत :-100/-**
**प्रकाशक :- साहित्य साधना प्रकाशन, दर्यापूर**

**तुकारामनीती**
**भाग -54**

# झाले रामराज्य काय उणे आम्हासी |



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी


**तुकाराम गाथा वाचतोय आणि तुकाराम नीती लिहितोय तेंव्हापासून मला विविध अंगाने तुकोबा भेटत असतात, संवादी होत असतात. तीव्र उन्हाळ्यात तुकोबांच्या सतत भेटीमुळे मनाला आणि त्यातूनच शरीराला एक सुखद विचार स्पर्श होऊन जातो. मन आल्हाददायक, प्रसन्न होऊन एका नव्या विषयावर विचार करायला प्रारंभ करतं! संत तुकारामांची गाथा पुढे वाचतांना "रामचरित्राचे" १४ अभंग येतात. हे सर्व अभंग सरळ वाचत गेलो तर तूकोबांनी श्री रामचंद्र यांचा जवळपास संपूर्ण जीवनपट मांडला असून त्यातून त्यांचे कार्ये आणि वैशिष्ट्ये वाचायला मिळतात. त्यापैकीचा हा एक अभंग! भारत वर्षात काही पात्रं जनमानसांच्या मनीमानसी खोलवर रुजलेली असून सगळीकडे त्यांचा प्रभाव जाणवत असतो. अशा पात्रांपैकी श्री रामचंद्र हे एक महाकाव्यातील पात्र आणि एक युगपुरुष म्हणून समाजात खोलवर रुजले आहे.**

**झाले रामराज्य काय उणे आम्हासी | धरणी धरी पिक गाई ओविल्या म्हशी ||१||**
**राम वेळोवेळा आम्ही गाऊ ओवियें | दळीता कांडिता जेविताने बाइये ||धृ||**
**स्वप्नीचे दुःख कोणी न देखे डोळा | नामाचा गजर भय सुटला कळीकाळा ||३||**
**तुका म्हणे रामे सूख दिधले आपुले | तया गर्भ वासा येणे जाणे खुंटले ||४|| (शा.अ.गाथा अ.क्र.११०६)**

एखादा व्यक्ती महापुरुष केंव्हा होतो ? त्या काळात व्यवस्था कशी होती ? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होतात आणि त्या अनुषंगाने विविध चर्चा घडत असतात. रामायण व महाभारत ही दोन महाकाव्य आणि त्यांचा कालखंड, सत्य, कल्पना, महाकाव्य या दृष्टीने अनेक विद्वजन करत असलेली चर्चा पाहता आपल्याला त्यावर विचार करणे क्रमप्राप्त ठरते. त्यातही रामायण किती प्रकारचे आहेत ? कोण कोणत्या देशात रामायणासारख्या कथा आहेत यावर बरेच संशोधन झाले असून अजूनही संशोधन सुरूच आहे.

तुकाराम महाराज असो की अन्य संत विवेचक असो, त्यांनी रामायण आणि त्यातील उच्च सामाजिक मुल्ये महत्वाची मानली. अगदी अलीकडे महात्मा गांधीजींनी सुद्धा 'रामराज्य' संकल्पना मांडली. या सर्वच बाबी आणि इसविसनाचा विचार केला असता रामायण हे त्रेता युगात झाले. त्यावर महर्षी वाल्मिकींनी महाकाव्य लिहिले हे सर्वश्रुत आहे. साधारणतः इसविसनपूर्व ७३२३ साली रामायण झाले असावे, म्हणजे पूर्व वैदिक काळाअगोदर रामायण झाले. हे लिहिण्याचे कारण म्हणजे पूर्व वैदिक काळा अगोदर वर्णव्यवस्था नव्हती. केवळ कर्मावर माणसांचे वर्गीकरण केले होते. त्यामुळे रामायण वर्णव्यवस्थेचे समर्थन करत नाही. असे असले तरी; रामायणातील एक आदर्श नायक श्री राम, नायिका सीता आणि त्यांच्या बरोबरीने आलेली इतर पात्रे हा सार्वकालिक चिंतनाचा महत्वपूर्ण भाग झालेली आपल्याला पाहायला मिळते. श्री रामचंद्र आणि त्यांच्याकडून झालेल्या काही चुकांवर जसे शंबूक वध, वाली वध, परीटाने आक्षेप घेतल्यानंतर गरोदर पत्नी सीतेला सोडून देणे आदि बाबी चर्चिल्या जात असल्या तरी दुसरीकडे रामायण हा ग्रंथ आपल्यावरील टीका, समीक्षा, बदल स्वीकारायला तयार आहे, परंतु या ग्रंथाप्रमाणे इतर धर्माचे ग्रंथ टीका, समीक्षा, बदल स्वीकारायला तयार नसतात. रामायणावर टीका झाली तर लोक ती स्वीकारायला तयार असतात. यावरून रामायण आणि त्यातील विचारांत सहिष्णुता ओतप्रोत भरलेली आढळून येते. रामायण आणि त्याच्या नायक-नायीकांकडून काही चुका झाल्या असतील तर ते साहजिक आहे, कारण ती ही माणसेच होती आणि त्यांचे व्यवहार हे त्या त्या काळाचे अपत्य आहेत हे नाकारून कसे चालेल ? 'माणूस हा चुकीचा पुतळा आहे' या उक्तीप्रमाणे नायकाकडून काही चुका जरी झाल्या असल्या तरी त्यांच्या जीवनातील आणि राम राज्यातील तत्वे विश्वभर नावाजली जातात ही बाब अभिमानस्पद म्हणावी लागेल!

वारकरी संत वाङ्मयात सातत्याने श्री रामचंद्र, रामराज्य या संदर्भाने अनेकवेळा उल्लेख येतात. त्यात विशेषतः संत एकनाथांचे भावार्थ रामायण हे महाकाव्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणून ओळखले जाते. महर्षी वाल्मिकी, संत तुलसीदास यांचे रामायण ग्रंथ प्रमाणभूत असले तरी लेखनाची सर्वच वाङ्मयीन मुल्ये भावार्थ रामायणात ओतप्रोत भरलेली आढळतात. श्री रामचंद्र आणि रामायण हा संसारीकांसाठी सर्वकाळ पथदर्शी असणारा ग्रंथ आहे. रामाचे जीवन, सावत्र आईच्या मागणीवरून राज्याभिषेक सुरु असतांना सिंहासन सोडून वनवास पत्करला. जातांना आपल्या सावत्र आईचे अगोदर दर्शन घेतले आणि राज्य त्याग केला. त्याशिवाय आपला भाऊ आणि वहिनी वनवासाला जात असतांना लहान बंधू लक्ष्मणाने संसार त्याग करून भावाची सेवा करण्याचे ठरवले. दुसरीकडे भरताने सिंहासनावर आपल्या जेष्ठ भावाच्या पादुका ठेवून १४ वर्षे राज्यकारभार केला आणि वनवास संपवून आल्याबरोबर मोठ्या भावास राजसिंहासनावर बसविले. त्यांतर रामराज्य सुरु झाले. रामराज्य म्हणजे श्री रामचंद्र यांचा कालखंड! रामराज्यात माणसामाणसात भेद नव्हता, सुबत्ता होती. अन्न-वस्त्र-निवारा आदि सर्वच मुलभूत सुविधा मुबलक होत्या. त्यामुळेच प्रस्तुत अभंगात तुकोबाराय म्हणतात, आम्हीसुद्धा रामराज्यात असून इथे आम्हाला सर्व गोष्टी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे आम्ही रामाचे नाव वेळोवेळा घेत राहू. रामराज्यात सगळे लोक आनंदी-सुखी-समाधानी आहेत. स्वप्नातसुद्धा रामराज्यात कुणी दुःखी नाही. श्री रामचंद्र राजाने आपल्याला अनंत सुख दिले असून आता जीवनात कशाचीही वानवा नाही, अशा



आशयाचा हा अभंग आहे.

त्याशिवाय अलीकडे विसाव्या शतकात महात्मा गांधीनी लोकशाही राज्यांत रामराज्य संकल्पना मांडली आहे. महात्मा गांधीजीनी 'यंग इंडिया'मध्ये १९ सप्टेंबर १९२९ रोजी लिहिले होते की, "रामराज्यात सर्वत्र सुशासन आणि पारदर्शिता असायला हवी. रामराज्य म्हणजे हिंदूंचे राज्य नसून माझे रामराज्य म्हणजे निर्मिकाचे राज्य! माझ्यासाठी राम आणि रहीम एकच आहेत. सत्याशिवाय मोठा ईश्वर नाही आणि असेल तर तो मला मान्य नाही. राम झाला असेल किंवा नसेल, परंतु प्राचीन धर्मग्रंथ रामायणात निसंःकोच सत्य-आदर्श लोकशाही शासन होते, जिथे शेवटच्या नागरिकाला त्वरित न्याय दिला जात होता." याशिवाय गांधींजी वेळोवेळी लिहितात की, "माझ्या स्वप्नातील रामराज्यात राजा आणि निर्धन दोघांना समान अधिकार प्रदान केले जावेत." "माझे रामराज्य म्हणजे नैतिक अधिकारावर आधारित लोकांचे सर्वोच्च सार्वभौमत्व होय." सुशासनावर आधारित रामराज्य ही महात्मा गांधीजींची रामराज्य संकल्पना होती. याच धर्तीवर विनोबा भावेंनी रामराज्य म्हणजेच ग्रामराज्य असे विचार मांडले. विनोबांनी आपल्या 'स्वराज्यशास्त्र' या छोट्याशा पुस्तिकेत 'राजनीती हीच लोकनीती व्हायला हवी' असा विचार मांडला. संत एकनाथ, संत तुकाराम, महात्मा गांधी, विनोबा भावे आदि संत-विचारवंत लेखकांनी आपापली रामराज्य संकल्पना स्पष्ट करतांना सर्वोच्च लोककल्याण हाच एकमेव विचार मांडला.

सांप्रतकाळी श्री रामचंद्र, रामराज्य आणि त्याच अनुषंगाने अयोध्येतील श्री राम मंदिर आदि मोठे कळीचे विषय आहेत. सामान्य माणूस असामान्य कर्तृत्व करून दाखवतो. तो लोकांसाठी हिरो ठरतो. दशरथपुत्र श्री रामचंद्र यांनी असामान्य कार्य केल्यामुळे लोकांनी त्यांचा देव केला. हा लोक स्वभाव मोठा स्वार्थी आहे. एखादा महापुरुष देव केला की तात्काळ त्याला देवूळ, प्रतिमा, मूर्ती इत्यादीमध्ये बंदिस्त करायचे, त्याला हात जोडायचे, त्याला हार-फुले-प्रसाद अर्पण करायचा, पूजा करायची आणि आपण आपली ( काळी )कामे करायला मोकळे! देव संकल्पनेशी खेळलेले हे मोठे विस्मयकारी राजकारण नाही का ? त्यासाठी मी वारंवार बोलत आणि लिहित असतो की; महापुरुषांना देवत्व बहाल करून त्यांना मर्यादित करू नका. मंदिर झाले म्हणजे झाले का ? आले का रामराज्य ? किती लोक राम-लक्ष्मण-भरत यांच्या तत्वाने वागत आहेत ? राजकारणी लोक केवळ राम नावाचा ( गैर )वापर करून सत्ता सोपानावर चढताहेत, दुसरीकडे मात्र एकही राज्यकर्ता रामराज्य आणण्यासाठी उत्सुक नाही. केवळ भावनेने पोट भरेल का ? मोठमोठ्या घोषणा अथवा जाहिरातीने रामराज्य येईल का ? असे एक ना अनेक प्रश्न आज तुमच्या माझ्या समोर आहेत. महागाईने कळस गाठला आहे. तरुणांच्या हाताला काम नाही. उच्च शिक्षित बेकारांचे तांडे रस्त्यावर फिरत आहे. स्वस्तातला दिड जीबी डाटा कधी महाग झाला ते कुणालाच कळले नाही. सगळे मोबाईल वेडे झाले. वाचन संस्कृती लोप पावत आहे. महापुरुषांना कुणी वाचत नाही. वृद्ध आई-वडिल वृद्धाश्रमात जीव सोडत आहेत. हाय प्रोफाईल लोक लो विचारांनी ग्रस्त आहेत. असे एक ना अनेक समस्या समोर असतांना पुन्हा रामराज्य येईल का ? नक्की येईल, परंतु त्यासाठी आपण सर्वांनीच रामराज्यातील लोक, जीवन आणि तत्वांचे पालन केल्यास तो सुदिन दूर नाही! असे होणे म्हणजे अयोध्येत होणारे राममंदिर आणि तुकोबांच्या गाथ्यातील रामराज या विषयीची तळमळ सार्थ झाल्याशिवाय राहणार नाही! जय तुकोबाराय!

# भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज २१ मे, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा आज ३२ वा स्मृतीदिन. राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे जेष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता. देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते.**

राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या शाळेत झाले त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुन च्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या ट्रीनीटी महाविद्यालयात गेले पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला. त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता. ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले. लंडनमध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला. राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी काँग्रेस मधील नेत्यांकडून होऊ लागली. आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली तेंव्हा राजीव यांनी



आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली. १९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली. ३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. त्यानंतर झलेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत काँग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या. स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते. पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला. राजीव गांधी जेंव्हा संगणकावर बोलत होते तेंव्हा अनेकजण त्यांच्यावर टीका करत होते. पण संगणक क्रांती आणणार हा ध्यास त्यांनी घेतला होता. राजीव गांधींमुळेच सर्वसामान्य घरात संगणक पोहचला. राजीव गांधी यांनी घेतलेल्या एका निर्णयामुळे ८ टक्के म्हणजे तेरा लक्ष कोटींचा माहिती तंत्रज्ञान उद्योग उभा राहिला. यातून पन्नास लाख लोकांना थेट रोजगार मिळतोआहे. माहिती प्रधान सभ्यता, ज्ञान प्रधान सभ्यता, बुद्धिमत्ता प्रधान सभ्यता या तीन क्रांतीची पायाभरणी राजीव गांधी यांनी केली. त्याचीच फळे आज भारत देश चाखतो आहे. राजीव गांधी यांच्या दुरदृष्टीमुळे भारताचा वेगाने विकास झाला आणि लोकांचे जीवनमान उंचावले. स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात. राजीव गांधी यांनी दूरसंचार क्रांती बरोबरच नवे शैक्षणिक धोरण आणून देशभरात नवोदय विद्यालयाची स्थापना केली. त्यासोबतच पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून महिलांना राजकारणात मोठी संधी दिली. राजीवजींनी घेतलेले हे निर्णय भारताच्या जडणघडणीत आणि विकासात मैलाचा दगड ठरले आहेत. भारत देशाला राजीव गांधी यांनी तंत्र वैज्ञानिक दृष्टी दिली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील महाशक्ती बनवून भारताला स्वाभिमान दिला. पुढच्या पन्नास वर्षांचा अर्थव्यवस्थेचा पाया राजीव गांधी यांनी त्यावेळेला रचला होता त्यामुळेच आपण आज इथपर्यंत पोहचू शकलो. देशाला माहिती तंत्रज्ञानात परिपूर्ण करून महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पंतप्रधानाचे २१ मे १९९१ रोजी लिट्टे या दहशतवादी संघटनेने मानवी बॉम्बचा वापर करून हत्या केली म्हणून आजचा दिवस देशभर दहशतवादी विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. राजीव गांधी यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# शाळेचे बदलते स्वरुप



कविता चव्हाण
संपर्क क्र. 9370062031

आधुनिक केसरी

**आज सकाळी मैडमचा मला फोन आला पंचायत समिति मार्फत मुलींना पार्लर प्रशिक्षण देण्याचे काम माझ्यावर सोपवले आहे मॅडम मला बोलल्या आज बाराविचा पेपर आहे तू सरांना भेट आणि विचार कि मला मुलींसोबत मिटिंग करायची आहे मॅडमांनी मला नंबर दिला त्याप्रमाने मी सरांना फोन केला सर बोलले पेपर तिन वाजता आहे तर तुम्ही दोन वाजता या मी हो म्हटल आता ज्या शाळेत आपण पांचवी पासून ते कॉलेज पर्यंत शिक्षण घेतले त्या शाळेत आज खूप वर्षानी जाणार होते मला वाटल तिथले शिक्षक तर मला ओळखतात.**

आमचे घर शाळेपासून जवळ असल्याने काही न काही करनानें येन होत असते मी गेले दोन वाजता तर मुली आलेल्या नवत्या कॉलेज चे सर आले मी सांगितल म्हटल मला मुलींना भेटायचे तर ते सर मला ओळखत होते

तरी मला बोलले आता नाही भेटता येणार आता पेपर सुरु होतोय तुम्ही पेपर सूटल्यावर भेटा ते सर मला बोलले तुम्ही कोणत्या गावचे मी सांगितल मी इथलिच आहे माझ्या सोबत माझी वहिनी होती तिला बोलली जाऊ दें चल वहिनी मी माझी स्कूटी फिरवली आणि मॅडम ला कॉल केला थोड़ पुढे येऊन मॅडम बोलल्या जाऊ दें पेपर सुतल्यावर जा मागे वळून पाहिल तर मुली जमा होत्या दोन मिनिट बोलू दिल असत तर काय बिघडल असत मी माझ्या मनाची समजूत काढली कि पेपर सुरु होईल म्हणून बोलू दिल नसणार पुढे आली शिपायाला विचारल तो पण तेच बोलला पेपर सहा वाजून दहा मिनिटांनी सुटेल मी म्हटल काही हरकत नाही मी तेव्हाच येते अस ठरउन घरी आले परत सहा वाजता गेले दहा मिनिट तिथ थांबले तिथ पोलिस पण होते गावातला एक मुलगा पोलिस आहे तो पण होता त्यांन मला बघून रागात वहींनीला विचारल कोणाला भेटायच तुम्हाला मी त्याला नावाने बोलले तो काहीच बोलला नाही त्याच्या पद प्रतिष्ठेचा त्याला गर्व यावा जणु माझ्या मनात असा विचार आला याला मी नावाने बोलायला नको होत सर मनायला हव होत याचा त्याला राग आला असावा एक विचार हा आला मनात मी अन वहिनी तिथे थांबले तर दुरून शिक्षक लोक आम्हाला बघत होते त्यांनी शिपायाच्या हातून निरोप दिला तुम्ही दुसऱ्या गेटला थाम्बा नाहीतर नंतर कांटेक करा वहिनी मला बोलली चला ताई तिकडून जाऊ मी नको म्हटल तिला रस्ता चांगला नसेल चल परत जाऊ घरी अस बोलून परतिला निघालो मला त्या ठिकाणी जरा वेळही थाम्बु वाटल नाही मी दिव्यांग आणि त्यातल्या त्यात तुमची जूनी विद्यार्थी असून सुद्धा तुम्ही मदत केली नाही जास्त आदर सत्काराची अपेक्षा नवती पण प्रेमाचे दोन शब्द बोलले गेले असते तर आजही ती शाळा माझ्या मनात जिवंत राहिली असती एक गोष्ट समजली शाळेतील बदलत्या बांधकामासोबतच त्यातील जुनें शिक्षकांनी सुद्धा आपली वर्तवनुक बदलली आहे दिव्यांग व्यक्तिच्या मदतीला धाऊन येणारा हा समाज फक्त बोलायला पुढे येतो जेव्हा गरज पड़ते ना तेव्हा लोक ओळख दाखवायला काय बदलायला सुद्धा मागे पुढे पहात नाही फक्त पांच मिनिट मुलींना बोलउन बोलू दिल असत तर काय जाणार होत एवढ अवघड नवत ते नाही म्हणायला किती पटकन जमत न लोकांना परत त्या शाळेत परत जाण नको होवो हिच देवाकड़े प्रार्थना करते.



# लोकसभा निवडणुकीपूर्वी आणखी एक 'नोटबंदी'



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**देश पुन्हा एकदा 'नोटाबंदी'चा सामना करत आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ने शुक्रवारी, 19 मे रोजी एक परिपत्रक जारी करून, 2000 रुपयांच्या नोटा चलनातून काढून घेण्याची घोषणा केली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी मोदी सरकारने पुन्हा एकदा मोठा निर्णय घेतला आहे. आज RBI ने 2000 रुपयांची नोट चलनातून काढून घेण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने देशातील बँकांना 2000 च्या नोटा तात्काळ जारी करणे थांबवण्याचा सल्ला दिला आहे.**

यासोबतच सर्वसामान्यांना बँकांमध्ये नोटा परत करण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. मात्र, ही नोटाबंदी नाही, असे केंद्रीय बँकेने स्पष्टपणे सांगितले. या नोटा कायदेशीर निविदा राहतील, फक्त त्या चलनातून बाहेर काढल्या जातील. ते बदलण्यासाठी रिझर्व्ह बँकेने लोकांना चार महिन्यांहून अधिक कालावधी दिला असून, येत्या मंगळवारपासून ही प्रक्रिया सुरू होणार आहे.

8 नोव्हेंबर 2016 रोजी रात्री 8 वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित केले आणि मध्यरात्री 12 वाजता 500 आणि 1000 च्या नोटा चलनातून बाद करण्यात आल्या. या निर्णयामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने 2000 रुपयांची नोट चलनातून बाहेर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाने पुन्हा एकदा लोकांना 2016 ची आठवण करून दिली आहे.

8 नोव्हेंबर 2016 रोजी रात्री 8 वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित केले आणि मध्यरात्री 12 वाजता 500 आणि 1000 च्या नोटा चलनातून बाद करण्यात आल्या. अचानक नोटा चलनातून बाद करणाऱ्या सरकारच्या निर्णयाने देशभरात खळबळ उडाली होती. त्यावेळी लोकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. तथापि, यावेळी 2000 रुपयांच्या नोटाबंदीचा निर्णय 2016 च्या नोटाबंदीपेक्षा वेगळा आहे कारण 2000 रुपयांची नोट कायदेशीर निविदा रक्कम म्हणून सुरू राहणार आहे. म्हणजेच कोणाकडे दोन हजार रुपयांची नोट असेल तर त्याची ओळख कायम राहील. अशा परिस्थितीत तुमची ही नोट घ्यायला कोणीही नकार देणार नाही. मात्र, या नोटा ३० सप्टेंबरपर्यंत बँकेत जाऊन बदलाव्या लागणार आहेत. याआधीही देशात अनेकदा नोटाबंदी झाली आहे.

23 मे पासून नोटा बदलता येणार आहेत,

2000 रुपयांच्या नोटा बदलण्याची प्रक्रिया 23 मे 2023 पासून सुरू होईल आणि ती पूर्ण होईल. सप्टेंबर 30. बदलता येईल. जर तुमच्याकडेही या नोट्स असतील तर घाबरण्याची गरज नाही, उलट तुम्ही त्या सहज बदलू शकता. तुम्हाला फक्त या नोटा तुमच्या जवळच्या कोणत्याही बँकेच्या शाखेत घेऊन जाव्या लागतील आणि त्या तिथे बदलल्या जातील.



एकाच वेळी किती नोटा बदलल्या जातील ?

या वेळीही नोटा बदलण्याची प्रक्रिया नोव्हेंबर २०१६ मध्ये पहिल्या नोटाबंदीच्या वेळी होती तशीच आहे. जेव्हा 500 आणि 1000 रुपयांच्या मोठ्या नोटा चलनातून बाद करण्यात आल्या. म्हणजे आरबीआयने नोटा बदलण्याची मर्यादा निश्चित केली आहे.

मध्यवर्ती बँकेच्या परिपत्रकानुसार, तुम्ही एकावेळी 2000 रुपयांच्या फक्त 10 नोटा बदलू शकाल. म्हणजेच एकाच वेळी नोटा बदलण्याची मर्यादा 20,000 रुपये ठेवण्यात आली आहे. आरबीआयच्या 19 शाखांमध्ये नोटा बदलल्या जातील 2,000 रुपयांच्या नोटा बदलण्याशी संबंधित रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या FAQ नुसार, चलनात नसलेल्या नोटा RBI च्या 19 शाखांमध्ये देखील बदलल्या जाऊ शकतात. 2016 मध्ये नोटाबंदीनंतर आरबीआयने 2000 रुपयांची नोट जारी केली होती. 2017 मध्ये रिझर्व्ह बँकेने सुमारे 89% नोटा जारी केल्या होत्या तेव्हा दोन हजार रुपयांच्या नोटांचे सर्वाधिक चलन दिसले. 31 मार्च 2018 पर्यंत एकूण नोटांमधील त्यांचा वाटा फक्त 37.3 टक्क्यांवर आला होता, तर 31 मार्च 2023 पर्यंत हा आकडा 10.8 टक्क्यांवर आला होता.

2000 रुपयांच्या नोटा बंद करण्याच्या या मोठ्या निर्णयामागील कारणांबद्दल बोलताना आरबीआयच्या सूत्रांचे म्हणणे आहे की, चलनात बनावट नोटांचे प्रमाण वाढल्यामुळे 2000 रुपयांची नोट काढून घेण्यात आली आहे. याशिवाय ऑपरेशन क्लीन नोट पॉलिसीचा उद्देश काळ्या पैशाच्या बाजाराला लक्ष्य करणे आहे. काळ्या पैशानंतरच्या पहिल्या नोटाबंदीच्या वेळीही असेच म्हटले होते.

# दंगली धार्मिक की राजकीय...?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. त्यातही महाराष्ट्र हा संताची व महापुरुषांची भुमी आहे. संत आणि आणि महापुरुषांचे कार्य व विचार मानवता, समतादेवर आधारित असून अंधश्रद्धा, अज्ञान, पाखंड आणि चुकिच्या रुढीपरंपरा यावर वार करून माणसाला माणुसकी ची शिकवण देऊन समाजाला एकोप्याने जगायला शिकवले. संताच्या या विचाराच्या प्रभावाने जाती धर्माचे लोक एकत्र नांदत आहेत. अनेक गावामध्ये, शहरामध्ये अनेक परंपरा अशा आहेत कि ज्यामधुन मानवतेचे दर्शन होते. धार्मिक भेद न पाळता मानवाच्या ऐक्याचे चित्र वास्तवात दिसते.**

हिंदु मुस्लिम जैन ख्रिश्चन बौद्ध असा कोणताही भेद न करता धर्माचा गवगवा न करता माणूस म्हणून वावरतात व सर्व सामाजिक कार्यात सर्व जन एकत्र येऊन आनंद साजरा करतात. ही महाराष्ट्रात वैचारिक परंपरा आहे. संत काळामध्ये संतानी वैचारिक प्रबोधन करताना कुठे ही धार्मिक दंगल झाल्याचे वर्णन आढळत नाही. कारण संताचे विचार हे धार्मिक नसुन ते मानवकल्याणाचे होते व आहेत. ज्या ज्या वेळी माणसावर संकटे आली तेव्हा तेव्हा धर्माचा विचार न करता माणूस म्हणून समोर येऊन लढणारे लोक हे मानवतेची शिकवण देणारे आदर्शच आहेत. देशाला ब्रिटीशांकडून स्वातंत्र्य मिळण्यासाठी जो लढा उभा राहीला तो लढा लढताना त्यामध्ये सर्वच जातीधर्माचे लोक होते तर ते धर्म बघुन नव्हे तर कर्म बघून एकमेकांच्या खांद्याला खांदा लाऊन लढले, प्रत्येकाचे रक्त सांडले. रक्त सांडले गेले तेव्हा ते भारतीय होते. भारतीय म्हणून लढत लढा देऊन देशाला स्वातंत्र्य मिळावे या उद्देशाने प्रत्येक जन लढत होता तेव्हा ही कोणाच्या मनामध्ये धर्म जात नव्हती तर केवळ देश होता. असे अनेक उदाहरणे आपल्याला सामाजिक ऐक्याचे देता येतील. म्हणजे थोडक्यात काय तर सामाजिक ऐक्य व सामाजिक बंधुता अनेक दिवसापासून सुरू आहे. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर आपले शिक्षण, वर्तन व विचार हे देशहिताचे, राष्ट्रप्रेमाचे, एकोप्याचे व बंधुभावाचे असताना अचानक धार्मिक दंगली व्हायला सुरुवात कशी झाली हेही समजून घेणे आवश्यक आहे. राष्ट्रहीत, राष्ट्रप्रेम बाजूला सारून धर्मप्रेम व धर्महीत यामध्ये रुपांतर होऊन माणसात दुरावा निर्माण केला जात आहे हे मात्र चुकिचे आहे. लोकशाहीच्या नावाखाली सत्तेत जाण्याची संधी मिळाली. लोकशाही मध्ये प्रतिनिधी होऊन सत्तेत बसण्याची संधी मिळालेल्या लोकांचे देशप्रेम व राष्ट्रहीत या संकल्पना हळूहळू पुसट होत जाऊन, सत्तेचा गैरवापर वापर करून लोकांची कामे न करता कामामध्ये कामचुकार पणा करून, पैशाचा गैरव्यवहार करून स्वतः चे घरे भरायला सुरुवात केली. जनतेचा पैसा लोकप्रतीनुधींनी स्वतः फायद्यासाठी वापरल्याने लोकांच्या समस्या समुळ नष्ट होत नव्हत्या. निवडणुकी मध्ये काम, व विकासावर लोकांच्या दारी मत कसे मागावे काही मुद्दा पाहिजे म्हणून राजकीय पक्षांनी अनेक धार्मिक तेढ निर्माण होईल असे मुद्दे बाहेर काढले. व थोड्या फार प्रमाणात धर्माचा आधार घेऊन निवडणूका जिंकायला सुरुवात केली. जेव्हा राजकारणी लोकांना कळाले धर्माच्या नावावर निवडणूका जिंकता येतात तेव्हा त्यांनी लोकहिताचे कामे बाजूला सारून धर्मावर काम करायला सुरुवात केली आणि निवडणूकीच्या अगोदर धार्मिक वातावरण दुषित करून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करण्यात आला. सध्या अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे कि जेव्हा जेव्हा निवडणुका जवळ येतात तेव्हा तेव्हा दंगली घडतात. अर्थात ह्या दंगली धार्मिक नसतात. कारण जर दंगली धार्मिक असत्या तर कोणताही एका धर्माचा फायदा झाला असता अथवा धर्माचे उद्दिष्ट साध्य झाले असते. परंतु येथे दंगली झाल्या की राजकीय लोकांचा फायदा होतो मग याला धार्मिक दंगल म्हणायची का? पाचवर्षे आनंदाने नांदणाऱ्या लोकांमध्ये निवडणूक आली की संघर्ष होतो कसा? निवडणुका जवळ आल्या की मिडिया वाले जागे होऊन धर्मा धर्मात वाद व दुफळी निर्माण होईल अशा बातम्या प्रसारित करतात. मग निवडणूक नसेल तर सर्व काही ठिक असते का? दंगल ज्या ठिकाणी झाले तेथील स्थानिक लोक शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात आणि राजकारणी लोक राजकारण करतात. यावरून हेच स्पष्ट होते की धार्मिक दंगल होत नाही परंतु राजकीय मताची जुळवाजुळव करण्यासाठी राजकीय दंगलीला धार्मिक दंगलीचे स्वरूप दिले जाते. जर खरचं धर्मासाठी दंगल झाली असती तर नेत्यांचे मुले दंगली मध्ये उतरली नसती का? नेते धर्माचे नाहीत का? मग धर्माच्या नेत्यावर धार्मिक दंगलीचे गुन्हे दाखल का होत नाही. किंवा नेते धार्मिक दंगलीच्या ठिकाणी का राहत नाही. दंगल जर धर्माच्या नावावर होत असेल तर नेते दंगल संपल्यावर दोन्ही गटांना समजून का सांगतात. चुकिच्या गटावर कारवाई सत्य गटाला न्याय का मिळत नाही? खरचं धार्मिक दंगली घडल्या असत्या तर समोर



निवडणूक बघुन घडलीच नसती. दुसरी महत्वाची गोष्ट धार्मिक दंगल खरचं घडली असती तर तेथे शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी खुप कष्ट घ्यावे लागले असते. खरचं धार्मिक दंगल घडत असेल तर त्याला खुप मोठी अगोदरची कारणे व द्वेष असतो. परंतु आता दोघांमध्ये वैयक्तिक कारणावरून वाद जरी झाला तरी त्याला धार्मिक दंगलीचे स्वरूप देऊन वातावरण दुषीत करण्याचा व त्या आडून राजकारण करण्याचा डाव सुरू आहे. राजकीय लोक आपल्या भक्तांना तसे कृत्य करायला समर्थन करतात व राजकीय पोळी भाजून घेतात. राजकीय दंगल झाल्यावर मत माघायला जाताना शिक्षण, आरोग्य,रोजगार महागाई हे मुद्दे बाजूला ठेवून धर्म व धर्माच्या नावाखाली राजकीय निर्मीत दंगलीमधील लोकांना न्याय मिळवून देऊ या मुद्द्यावर मत माघायला मोकळे होते. म्हणजेच दंगली धार्मिक नसुन राजकीय असतात पण त्याला मतासाठी धार्मिक बनवले जाते. राजकीय दृष्टिकोन समोर ठेवून घडवलेल्या दंगली निवडणूक पुर्वीच होतात, दंगलीच्या नावावर मते मागितले जातात, धर्म धोक्यात आहे सांगितले जाते. कोणताही धर्म एवढा कमकुवत नसावा कि दोन चार वाईट मानसाच्या कृत्यामुळे धर्माला धोका निर्माण व्हावा. दुसरा प्रश्न उरतो तो दंगली मध्ये सहभागी असलेल्या लोकांचा. अनेक लोक राजकीय ईमानदारी म्हणून, नेत्याचा शब्द म्हणून स्वतः दंगली मध्ये सहभागी होतात केसेस लाऊन घेतात राजकारणामुळे आयुष्य बरबाद करतात. वाईट प्रवृत्तीचे लोक प्रत्येक धर्मात, क्षेत्रात असतात पण याचा अर्थ असा मुळीच नाही तो पूर्ण धर्मच चुकिचा किंवा आरोपी आहे. चोरी लुटमार, बलात्कार, खुन खराबे प्रत्येक धर्मातील लोक करतात, परंतु धर्माचे राजकारण करणारे लोक त्याची मांडणी चुकिच्या पद्धतीने करतात. मिडिया कोणतीही शहानिशा न करता राजकीय दबावाखाली सरकारची भुमीका मांडत आहे हे सर्व मान्य आहे. गुन्हा हा गुन्हा असतो, गुन्हेगार हा गुन्हेगार असतो. गुन्हा व गुन्हेगाराला धर्म नसतो. परंतु राजकीय पोळी भाजताना लोकांच्या जिवावर राजकारण करून लोकांनाच आरोपी बनवून राजकीय लोक सत्ता उपभोगतात. राजकीय नेत्याचे कार्यकर्ते, धर्माचे लोक साहेबांच्या कार्यक्रमाची तयारी करायला कामी येतात. म्हणून देशातील प्रत्येक नागरिकांनी देशाप्रती जागृत होऊन धर्माला वैयक्तिक बाब समजून आपले आचरण करावे. कोणत्याही बाबीविषयी भावनिक न होता त्या मधले तथ्य शोधावे. व सत्याची बाजु घ्यावी. असे झाले तर धार्मिक दंगलीची जाणीवच होणार नाही. परंतु दुसऱ्या धर्मातील चुकिच्या कृत्याला आपण त्यांच्या धर्माशी जोडायचे, यांच्या चुकीच्या कृतीला त्यांनी धर्माशी जोडायचे हे बरोबर आहे का? कोणता धर्म चुकिचे कृत्य करायला व चुकिचे कृत्य करणाऱ्यांना समर्थन करण्याची परवानगी देतो. जर धर्मच परवानगी देत नाही तर द्वेष आणि इतर धर्मातील मोजक्या चुकिच्या लोकांमुळे पुर्ण धर्मच चुकिचा आहे म्हणून त्यि धर्माचा द्वेष करणे आणि तेही जेव्हा राजकारणी लोक सांगतात तेव्हाच..! राजकीय लोकांना आपण शिक्षण, रोजगार, आरोग्य महागाई यावर प्रश्न विचारले पाहिजे तेव्हा आपल्याला राजकीय लोकांचा खरा चेहरा कळतो. परंतु आपले काम राजकीय नेते करत नाहीत पण राजकीय नेत्यांचे द्वेष, धार्मिक दंगल करण्याचे मोजकेच लोक काम करतात आणि सर्वांना बदनाम करतात हे थांबले पाहिजे. आणि कुठेही चुकिचे कृत्य घडत असेल तर त्यावर रितसर कारवाई देखील करायला पाहिजे. परंतु राजकीय नेत्यांचे ऐकुन राजकीय दंगलीला धार्मिक दंगल बनवू नये. आपल्या राष्ट्रात, राज्यात सुख शांती व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे काम जागृत नागरिकच करू शकतात. म्हणून कोणताही दंगली ला धार्मिक दंगल समजण्या अगोदर त्याची पुर्ण माहिती घ्या. म्हणजे दंगल धार्मिक आहे की राजकीय आहे हे आपल्या लक्षात येईल. व होणारी सर्वसामान्य लोकांची हानी आपण टाळू शकू.

# जैसा संग तैसा रंग



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**पतन उद्धार संगाचा महिमा । त्यजावे अधमा संत सेवी ।। तुकाराम महाराज म्हणतात संगतीमुळे माणसाची किंमत वाढते अथवा घटते. ज्याप्रमाणे दुधात पाणी मिसळले तर दुधाची किंमत कमी होते पण पाण्याची वाढते. धान्यात खडे टाकले तर धान्याची किंमत कमी होते, खड्यांची किंमत मात्र वाढते. एकाच आईच्या उदरी जन्मलेल्या पोपटांपैकी चोराकडे राहणारा पोपट शिव्या देतो, साधूकडे राहणारा मात्र सुस्वागतम म्हणतो. हा संग महिमा आहे. बालपणापासूनच आपण ज्याच्या संपर्कात आलो त्याचा परिणाम आपल्या जडणघडणीवर, व्यक्तिमत्वावर होत असतो त्याचा बरावाईट गुण लागतोच.**

जसे मातीत पडलेले फुल मातीला आपला सुगंध देऊन जाते तसेच आपल्या आयुष्यात चांगला बदल घडवून आणण्यासाठी आपण कुणाच्या सहवासात आहे हे महत्त्वाचे ठरते. माणसाचे विचार सभोवतालच्या वातावरणानुसार बदलत असतात. तो ज्यांच्या सहवासात असतो, तशा प्रकारच्या नजरेनेच त्याच्याकडे पाहिले जाते त्यामुळे आपण कोणाबरोबर वावरतो यालाही खूप महत्व असते. समूहाचा, संगतीचा माणसाच्या प्रगती किंवा अधोगतीमध्ये मोठा हिस्सा असतो. आपली संगत आपल्या आयुष्याची वाट ठरवते. योग्य संगतीमुळे आयुष्य घडते तर अयोग्य संगतीमुळे आयुष्याची वाट लागते. धूर्त माणसाचा संगतीत राहिले तर मनात आपसूकच धूर्त विचार येतात आणि हळूहळू ते स्वभावात रुजतात. तेच सज्जनांच्या संगतीत राहिले तर विचार निर्मळच राहतात. आपण कोणाच्या सोबत राहतो त्यावर आपले विचार, स्वाभव अन कर्म अवलंबून असतात. चोरांच्या संगतीत राहिल्याने लोक चोरच समजतात तेच हुशार लोकांचा संगतीत राहिले तर लोक विद्वानांचा सोबती म्हणून संबोधतात. आपल्या संगतीनुसार लोकांच्या मनात आपली प्रतिमा आपली ओळख तयार होत असते. हेच नव्हे तर सोबत रहाणारे लोक एकमेकांकडून काही शिकत असतात, एकमेकांचे अनुकरण करत कळत नकळत काही गुण अवगुण घेत असतात. 'ढवळ्याशेजारी पवळ्या बांधला आणि वाण नाही पण गुण लागला' हे बोलवचन या बाबतीत खरेच आहे. नकारात्मक, संकुचित विचारसरणीच्या माणसांबरोबर राहिल्याने काहीतरी नवीन करण्याची उमेद नष्ट होऊन आपण आयुष्यात मागे पडत जातो. विशाल दृष्टिकोन असणारी माणसे मात्र त्यांच्या सक्रीयतेने धडपडण्या सोबतच आपल्याला प्रयत्नवाद शिकवतात.

**असंगाशी संग सुख होय भंग ।लागे तेणे रंग दुर्गुणांचा ।।**

**काळीमा सज्जना लाभ तो दुर्जना ।लागती वेदना भाव जीवा ।।ग्रहणाचा रंग सुर्यास लागता ।काळवंडे कांता तेजाचिया ।।शंभु म्हणे ऐसा लागू नये रोग ।नासवते रग कुसंगती ।।**

असंगाशी संग केल्यास आपल्या वाटयाला दुःख येते. ही कुसंगती अशा रोगाप्रमाणे असते जो रोग लागला तर नस नस नासवते म्हणून कुसंगती पासून सदा लांबच असावे. जसा पेटलेला कोळसा हातात घेतला की आपला हात भाजतो आणि पेटलेला नसतांना तो आपले हात काळे करतो म्हणजे वाईट ते वाईटच. असंगाशी संगत नुकसानकारक ठरते. कधीकधी असंग म्हणजेच वाईट संगत इतकी हानिकारक सिद्ध होते की असंगाशी संग करण्यापेक्षा संगतहीन रहाणंही चांगलं ठरते. 'असंगाशी संग म्हणजे प्राणाशी गाठ' आपल्या ही प्रसिद्ध म्हण याबाबत सांगून जाते. महाभातात युद्धनीतीत अर्जुनापेक्षा सरस असलेला कर्ण त्याच्यासोबत असलेल्या दुष्ट, पापी, नीच, स्वार्थी लोकांच्या सहवासाची किंमत आपले प्राण देऊन चुकवावी लागली.

**अकुर्वन्तोऽपि पापानि शुचयः पापसंश्रयात् ।**
**परपापैर्विनश्यन्ति मत्स्या नागह्रदे यथा ॥**

म्हणजेच ज्याप्रमाणे ज्याप्रमाणे साप असलेल्या तळ्यामधील सापाला कोणी मारायला लागतो तेंव्हा साहजिकच त्याच्याबरोबर तळ्यात राहणाऱ्या काही माशानांही आपले प्राण गमवावे लागतात अगदी तसेच आपण स्वतः पाप केले नसले, आपण पवित्र असलं तरी पापी लोकांना आधार दिल्यामुळे त्यांची संगत केल्याने, त्यांच्या दुष्कृत्यांमुळे काही दोष नसतांनाही आपल्याला नुकसान सहन करावे लागते. जेंव्हा एखादा व्यक्ती दुर्जनांच्या सहवासात असतो, तेंव्हा त्याच्या कोणत्याही चांगल्या गुणांकडे लक्ष दिले जात नाही. चांगल्या, थोर पुरूषाच्या संगतीत राहावे ही शिकवण देतांना तथागत गौतम बुद्ध सांगतात

न भजे पापके मित्ते न भजे पुरिसाधमे।
भजेथ मित्ते कल्याणे भजिथ पुरिसुत्तमं।।

अर्थात वाईट मित्रांची संगत करू नये. अधम पुरूषाचा सहवास टाळावा. सन्मित्राची संगत धरावी. उत्तम पुरूषाचा सहवास करावा.

**मृगा मृगैः संगमुपव्रजन्ति, गावश्च गोभिस्तुरगास्तुरंगैः।मूर्खाश्च मूर्खैः सुधयः सुधीभिः समानशील व्यसनेषु सख्यः॥**

हरिण हरणांसोबत, गाय गाईंसोबत, घोडा घोड्यांसोबत, मूर्ख मुर्खांसोबत तर बुद्धिमान हे बुद्धिमान व्यक्तींसोबत राहतात. 'समानशीले व्यसनेषु सख्यं' म्हणजे मैत्री होत असतांना सारख्या विचारांशीच मैत्री होते. तरी प्रत्यक्षात मात्र चांगल्या लोकांचा सहवास सहजच घडत नाही, हेही तितकेच खरे आहे. सारख्या ध्येयांसोबतचा प्रवास होत असतांनाही मैत्री होते. उत्तम लोकांचा सहवास घडल्यास तो सोडू नये. सज्जन लोक सद्गुणांची कदर करतात म्हणून सद्गुणी माणसांबद्दल सज्जनांच्या मनात आदर निर्माण होतो. हा आदरच सज्जनांशी मैत्री दृढ करण्यास कारणीभूत होतो. सज्जनांसंबंधी असलेल्या आदरामुळेच आपल्यातील सद्गुण वाढत जाऊन, दुर्गुणांबद्दलचा वीट येतो म्हणून 'समानशिले व्यसनेषु सख्यम्' या वाक्यात सूचित केल्याप्रमाणे सज्जनाशी, सद्गुणी माणसाशी झालेली मैत्री परस्परांतील सद्गुण वाढविण्यालाच मदत करते, प्रोत्साहित करते. परस्पर सद्गगुणांमुळे एकत्र येऊन, मित्र झालेले लोक एकमेकांच्या कल्याणाकरिता म्हणजे चिरकालीन सुखाकरिता प्रयत्नरत राहतात म्हणून त्या परस्परांचे अंतःकरण प्रसन्न राहते. आपण अत्तराच्या दुकानातून बाहेर पडल्यावर अत्तर खरेदी केले नाही तरी सुगंध मात्र सोबत आणतोच ना! अगदी त्याचप्रमाणे आपण चांगल्या वा वाईट लोकांच्या सहवासाचा परिणाम आपल्या जीवनावर होतच असतो. आपल्या जीवनावर संगतीचा आणि वातावरणाचा खूप प्रभाव पडत असतो. आपली संगत ही सदैव सर्वोत्तम लोकांमध्येच असावी. उत्तम लोकांच्या संगतीत असल्यानं उत्तम विचारांचे आणि प्रतिष्ठेचेही लाभ मिळतात. जसं ऊसासोबत एरंडाला पाणी मिळतं हे आपण ऐकलंय, तसं सज्जनांसोबत, चांगल्या मित्रांसोबत आपल्या ज्ञानामध्ये भर पडते, सन्मानामध्ये भर पडते, मात्र अधमांची सोबत ही वेदनादायीच असते.

**य<u>स्ति</u>त्याज स<u>चि</u>वि<u>दं</u> सखा<u>यं</u> न तस्यं <u>वा</u>च्यपिं <u>भा</u>गो अंस्ति ।यदीं <u>शृ</u>णोत्यलंकं शृणोति <u>न</u>हि <u>प्र</u>वेद सु<u>कृ</u>तस्<u>य</u> पंथां ॥**

जो ज्ञानदायक अशा मित्राचा म्हणजे सख्याचा त्याग करतो, त्याचे कुणीही ऐकत नाही. तो सत्कर्मांस प्रवृत्त होऊ शकत नाही. महाभारतातील एक श्लोक आहे संताच्या संगतीने संत होशील, तपस्वीच्या संगतीने तपस्वी होशील व चोरांच्या संगतीने चोर होणार. ज्याप्रमाणे प्रथम कपडा पांढराच असतो जसा रंग द्यावा तसा दिसतो तसेच संग तसा रंग.

**यदि संत सेवती यद्यसंतं तपस्वीनं यदि वा स्तेनमेव ।वासो यथा रंगवर्श प्रयाति तथा स तेषां वशमभ्युपैती ।। म्हणूनच ज्ञानोबाराय म्हणतात संतांच्या संगती मनोमार्ग गती ।आकळावा श्रीपती येणे पंथे ।।** तथापि दुर्जनांचा संग पूर्ण वर्ज करावा. नको दुर्जनाचा संग । क्षणोक्षणा चित्तभंग ।। असे तुकाराम महाराज सांगतात. ज्याची बुद्धी, आचार, विचार ( क्रिया ) बोलणे वाईट तो दुर्जन समजल्या जातो. सत्संग उर्ध्वगतीस व दुःसंग अधोगतीस कारण ठरतो.

**सत् संगती दुर्लभ संसारा ।निमिष दंडभरी एकऊ बारा ।।** तुलसीदास म्हणतात की, सत्संगती दुर्लभ आहे, पण ती एकदा जरी घडली तरी जीवाचे कल्याण होते. नारदांची वाल्या कोळ्याशी थोडावेळासाठी भेट झाली, परिणामी वाल्याकोळी आद्य कवी वाल्मिक ऋषी झाले.

**सत् संगती आधी घडी सुमिरन वर्ष पचास ।वर्षा बरसे एक घडी अरट फिरत बारह मास ।।**

सत् संगतीची अर्धी घडी म्हणजे पन्नास वर्षाचे स्मरण होय. रहाट गाडगे बारा महिने फिरते पण एक घडीचा जोरदार पाऊस त्याच्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे. चांगली संगत, सन्मित्र ओळखता यायला हवा. मित्र सुखाच्या काळामध्ये आणि आपत्काळातही आपल्याशी प्रेमभाव ठेवतो आणि स्वार्थ सोडून निरंतर मित्राचे हित साधण्याचा प्रयत्न करीत असतो. कोणत्याही अवस्थेत एकसारखेच वागतो, आपत्काली मदत करतो आणि मित्रांनी दिलेली सूचना मानतो, मित्राने केलेल्या मदतीचा स्वीकार करतो. आपल्या मनातील चांगल्या वाईट गोष्टी मित्राने विचारले असता अथवा न विचारताही मनमोकळेपणाने सांगतो आणि अशा गोष्टी वेळप्रसंगी मित्राला विचारून घेऊन, मित्रावर आलेल्या आपत्ती दूर करण्याचा प्रयत्न करतो ही सन्मित्रची लक्षणे आहेत. सत् संगत दुरावता कामा नये, त्यामुळे आपले सर्वाथाने नुकसानच होते. स्वार्थामुळे मित्र दुरावतात. कधीकधी बालपणापासून परस्पर मित्रता दृढ झालेल्या लोकांमध्येही थोड्याशा व्यवहारिक कारणांनी उत्पन्न झालेल्या काही गोष्टींमुळे मनाची मित्रभाव बिघडून मन अस्वस्थ होते आणि नंतर पश्चाताप करण्याची पाळी येते. सत्संगत कायम टिकवण्यासाठी आपल्या मनातील लहान-सहान दुर्गुण दूर सारून त्या जागी मन प्रसन्न राखण्याकरता उत्तम असलेले करुणा हे ईश्वराचे वैशिष्ट्य आपल्यामध्ये उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे. जेव्हा सज्जनांच्या अंतकरणात दुःखी मनुष्याविषयी करूणा दृढ होते तेव्हा त्यांची दुःखे दूर करण्याची सद्भावना सज्जन साधकाच्या मनात प्रबल होते. दुःखी लोकांतील बरीचशी माणसे जेव्हा सज्जनांच्या सहवासात येतात तेव्हा ज्या दुर्गुणांमुळे ती माणसे दुःख भोगत असतात ते दुर्गुण आपल्यात असल्याची जाणीव त्यांना हळूहळू होत जाते. सज्जनांच्या प्रेरणेने ती दुःखी माणसे आपल्यातील दुर्गुण सोडण्याचा प्रयत्न करीत राहतात, तसेच सज्जनातील सदगुण आपल्यात उत्पन्न करण्याची इच्छा करतात अशा तऱ्हेने दुःखांना कारण असलेले दुर्गुण व नास्तिकता स्वार्थपरायणता, विषयलोलुपता इत्यादींची हकालपट्टी मनुष्याच्या मनातून होऊ लागली म्हणजे दुःख उत्पन्न होण्याची नवीन कारणे घडत नाहीत.

**कस्तूरीचें रूप अति हीनवर ।माजी असे सार मोल तया ।।**
**आणीकही तैसीं चंदनाचीं झाडें ।परिमळें वाढे मोल तयां ।।**
**काय रूपें असे परीस चांगला ।धातु केली मोला वाढ तेणें ।।**
**फिरंगी आटितां नये बारा रुके ।गुणें मोलें विकें सहस्त्रवरी ।।**

## सबब

मोहवून जाते मनाला
चंद्राची चमचमती कोर
दरीत तीव्र निराशेच्या
दिसतो आशेचा दोर

लक्ख चमकतो काजवा
किर्र अंधाऱ्या रात्रीत
जाणवतो सुखाचा क्षण
गर्द दुःखांच्या कात्रीत

अवनी अन आकाशात
जुळते पावसाची नाळ
गाभाऱ्यात कष्ट,श्रमाच्या
जीवाची होते आबाळ

वेधून घेते साऱ्यांचे लक्ष
सुंदर नर्तीकेची नृत्यलकब
ध्येय गाठतात ध्येयवेडे
निक्षुन अव्हेरतात 'सबब'

-मनोज शोभाबाई प्रकाश
अग्रवाल,
छत्रपती संभाजीनगर

## दिव्यांची वात पेटली

जनू रात
काजव्यानी लकलकली
अंधारात जनू
दिव्यांची वात पेटली
काळरात्र हिरमुसली
प्रकाशात झगमगली
जनू रात
काजव्यानी लकलकली
अंधारात जनू
दिव्यांची वात पेटली
रातकिड्यांनी बोंभाटे फोडली
सळळळ वारे सुसाट सुटली
ही काळकुट्ट रात्र
चौफेर पसार फिरली
जनू रात
काजव्यानी लकलकली
अंधारात जनू
दिव्यांची वात पेटली
अंधाराच अंजन
डोळयात झनझनल
जनू रात
काजव्यानी लकलकली
अंधारात जनू
दिव्यांची वात पेटली
- लक्ष्मण वाल्डे-कन्नड,
जि.संभाजीनगर

## सुख-दुःख

सुख दुःखाची वाहती दरी
दुःख सावरुनी थोडं
सुख मनी भरी
थोडं विसरुनी
हसू गालावर खिळी
संगतीला असेल प्रीतीची परी
आयुष्य सजते कसं उरी
अखखा जन्म जेव्हा सुख नेहाळी
काळ वेळ कोरी घड्याळ काटे
आयुष्याच्या पाटीवरी
सांग मनाला फुस
लावील का कुणी
दुःख सावरुनी थोडं
सुख मनी भरी
थोडं विसरुनी
हसू गालावर खिळी
संगतीला असेल प्रीतीची परी
आयुष्य निखळू दे गोजिरवाणी
दुःख सरु दे धो धो पाऊसावाणी
सुख वाहू दे नदीवाणी
दुःख सावरुनी थोडं
सुख मनी भरी
थोडं विसरुनी
हसू गालावर खिळी
संगतीला असेल प्रीतीची परी

लक्ष्मण वाल्डे-कन्नड,
जि.संभाजीनगर

## अस्सा बाळ यावा पोटी...

जसा देतसे कुंभार,
आकार मातीच्या गोळ्याला...
तशी घडविते आई,
तिच्या तान्हुल्या बाळाला...
नऊ महिने जपतें,
उदरातला तो गोळां...
इवल्याशा अंकुराचा,
तिला कितीं- कितीं लळा...
जेंव्हा जन्मां येई जीव,
तिच्या कुशीत गं तान्हा...
वासल्याने फुटें तिला,
तिच्या बाळासाठी पान्हां...
देऊन अमृताची धारं,
त्याला वाढविते आई...
जोजविते गं मायेने,
गाते रोजंच अंगाई...
दिसां -मासाने वाढतों,
बाळं तिच्या अंगणात...
त्याच्यासाठी साठलेली,
किती स्वप्नं नयनांत...
संस्काराचे बाळकडू,
देऊ जिजाऊंच्या परि...
बाळ घेईल आकाशी,
उंच- उंच गं भरारी...
माता -पित्याच्या कष्टाची,
असों बाळालाही जाणं...
अशा बाळाचा गं वाटे,
माय-बापां अभिमानं...
नाव बाळाचे गं यावे,
बाई ज्याच्या- त्याच्या ओठी...
धन्यं- धन्यं होईल जीव,
अस्सा बाळं यावा पोटीं...
अस्सा बाळं यावा पोटीं...

- सौ. शारदा श्रीकृष्ण
वानखेडे-चोपडे परभणी
९८२३०६६६०६

## स्वप्नं

स्वप्नं फॉरवर्ड करतो आहे
पुढच्या पिढीकडे हळुवारपणे
त्यांच्या खांद्याना पेलतील असे.

अन काही डिलीट
करतोय कायमचे
आकाशात मोकळा
श्वास घेण्यासाठी
आता स्वप्नांची बजबजपुरी
सहन होत नाही मनाला

म्हणून ज्यांना लाभला
नाही किनारा वास्तवाचा
त्यांना महासागराच्या
मधोमध निर्जन बेटावर
सोडून आलोय कायमचा

फक्त हे ढगांनो
मी आकाशात पाहिल तेव्हा
त्या स्वप्नांचं रूप घेऊन
मला वाकुल्या दाखवू नका.

आता फक्त..कर्मण्यवाद
युगंधराने सांगितलेला
आयुष्याच्या महाभारतातील
कोणत्याही फळाच्या
अपेक्षेविना..

ज्ञानेश्वर गायके.कन्नड
मो..९४०३३८४८८९



## बाप

बाप नावाच्या वल्लीची
काय सांगू व्यथा
सारं आयुष्य देवूनही
त्याचा हंडा रिताच ।।१।।
मुलगा ,भाऊ,नवरा,बाप
सारेच नाते निभावतोय
सगळयांचा भार सोसत
हा जगणंच विसरतोय ।।२।।
बापाच्या नशिबी असतात
अपमान अन कष्ट
तुम्ही काय केलं आमच्यासाठी
उलटा बापालाच प्रश्न ।।३।।
उभी जिंदगी जाळूनही हा
राहतो मुका,हातावरचे घट्टे
अन डोळ्यांखालची वर्तुळंच
सांगतात याच्या कर्माची कथा ।।४।।
पंखात बळ भरतांना पिल्लांच्या
होतो मेघासारखा रिता
झुंजत असतो जगाशी
वाल्याकोळ्या प्रमाणेच प्रत्येक पिता ।।५।।
जबाबदाऱ्या साऱ्या पाडतो पार
आपल्या स्वप्नांचा बळी देवून
सगळ्यांना खूश ठेवण्यातच
याच आयुष्य जात वाहून ।।६।।
उतार वयात तरी या जीवाला
मिळावा विसावा...
प्रेमाचा शब्द अन
मायेचा ओलावा ।।७।।
कधीतरी वेळ काढून बापाजवळ बसावं
आनंद त्याचा पाहून गालातच हसावं ।।८।।
काय अर्थ असतो तो गेल्यावर रडण्यात
बाप नावाच वादळ शमल्यावर
फक्त आठवणींचा कापूस पिंजण्यात ।।९।।
प्रा.डॉ.संगीता दोंदे
मिलिंद कला महाविद्यालय,औरंगाबाद

## कोणीतरी असावा



कोणीतरी असावा अपुला आपुलकीने समजून घेणारा
दुःख आपले बघून नव्याने जगायला लावणारा
कोणीतरी असावा अपुला मायेने जवळ करणारा
डोळ्यातील अश्रू पाहून त्या अश्रूंना समजून घेणारा
कोणीतरी असावा अपुला प्रेमाने दोन शब्द बोलणारा
वेळ आली वाईट तरी... असावा पाठीमागे उभा राहणारा
कोणीतरी असावा अपुला संकटाच्या वेळी धाव घेणारा
दहा कामे बाजूला सारून माणुसकी धर्म निभावून दाखवणारा
कोणीतरी असावा अपुला निःस्वार्थ भावनेने कार्य करणारा
रंजल्या, गांजल्यांचा दाता बणून समाजाला दिशा दाखवणारा
सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

## आई

स्त्री आणि गुरू म्हटलं, की प्रथम मी माझ्या मातेला आठवतो.
तिने लहानपणी केलेल्या संगोपनाची आठवण मी साठवतो.
मातेमुळेच खरे झाले, माझे जीवन सुरू.
तीच तर खरी असते, प्रत्येक बाळाची गुरू.
घरच्या घरी, ती बाळावर मूल्यसंस्कार घडविते
पुढच्या शिक्षणासाठी, शाळेत बाळाला ती पाठविते.
माते मी माझ्या जीवनात, झालो किती मोठा.
तरी तुझ्या लाभलेल्या, सहवासाविना मी असेन छोटा.
म्हणून स्त्री आणि गुरू म्हटलं, की प्रथम मी माझ्या मातेला आठवतो
तिने लहानपणी केलेल्या, संगोपनाची आठवण मी साठवतो.
-सुशिल सुदर्शन गायकवाड. तरडगाव, जि.सातारा, 9561394320.

## येईल पावसाळा

येईल पावसाळा नमवून घे उन्हाळा
वैशाख संपल्यावर सजवून घे उन्हाळा
तापे जमीन जेव्हा येतो वळीव बरसत
धारेत आसवांच्या शमवून घे उन्हाळा
औजार सज्ज माझे पेरावयास दाणे
आता मशागतीने बदलून घे उन्हाळा
गेली कित्येक वर्षे दुष्काळ नेहमीचा
आभाळ हासल्यावर परतून घे उन्हाळा
सांगू मृगास आम्ही करण्या कृपा जराशी
थेंबात नित्य 'सागर' भिजवून घे उन्हाळा
प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
९०११०८२२९९



## वेदना...!

वेदना थांबण्यास कुणाकडे घेऊ धाव,
सांग माझ्या देवा तुझे कोणते रे गाव.
व्यथा भोगतांना मन माझे जळते रे,
नशिबातल्या यातना जीवनात छळते रे.
जगतांना वेदनांचे चटके खूप साहिले,
कठीण समय येता दुःखात अश्रु वाहिले.
जगाकडे पाहतांना सारे वाटते उदास,
साडेसाती जाऊ दे, ही दुवा मागतो खुदास.
हुंदका दाटल्यावर केविलवाणी पडावे,
आणि झाडाला धरून एकांती खूप रडावे.
- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण. मो. ९७६४३५०३७४

## मोगरा

माझ्या अंगणात मोगरा फुलला
वाऱ्याच्या झुळूकेत खुशीत डुलला
देवाच्या चरणी फुले मोगऱ्याची
घराघरात नांदे उधळण सौख्याची
मोगरा पाहून चित्ती समाधान
मानवास लाभले सृष्टीचं हे दान
पहाटेचा वारा वाहतो मंद मंद
सोबतीला त्याच्या मोगऱ्याचा सुगंध
अंगणातील मोगऱ्याचा परिमळ दरवळी
हिरव्या पानावरी जणू पांढरी रांगोळी
- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव, जि.यवतमाळ
मो.9011559106

## त्या वळणावर....

त्या वळणावर आज पुन्हा
एकदा पाऊले थबकली.
समोर सुंदर तृण पाती सुंदर वृक्ष वेली,
अन् निस्तब्ध वाट ती एककल्ली.
नव्याने पुन्हा तेच धुके तेच
ऊन अन् पुन्हा एकदा सावली.
पानांची सळसळ अन् पानगळ ही,
आज पुन्हा मनामध्ये विसावली.
दूर..दूर.. कधी वाट एककल्ली,
कोवळा अंकुर सुंदर वृक्षवल्ली,
हरवलेल्या क्षणी निस्तब्ध वाट दूरात धावली.कधी
पापणीत ओलावली.
© सौ.वैशाली इंदुमती जाधव महाडिक
संपर्क क्र.-९७६७४३७९२३



# महाराष्ट्राचे ढोलकी सम्राट : पांडुरंग घोटकर



बाळासाहेब जोगदंड
संपर्क क्र. 9423051246

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राचे तमाशा आणि लावणी हे आपले सांस्कृतिक संचित आणि लोकपरंपरा आहे. या सांस्कृतिक संचितामध्ये अनेक नामवंत कलावंत आपल्या कलेने अजरामर आहेत. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आणि प्रतिभावान जेष्ठ ढोलकीसम्राट 'पांडुरंग घोटकर' हे कडक ढोलकीवादनातले सोनेरी पान म्हणावे लागेल. त्यांच्या ढोलकीवादनाविषयीच्या कलेने ते रसिकांच्या मनावर कायम गुंजन घालत आहेत. ते आज वयाची पंचाहत्तर वर्ष पूर्ण करीत असून त्यांचा अमृतमहोत्सव सोहळा आज देवगिरी महाविद्यालय संभाजीनगर येथे संपन्न होत आहे. त्यानिमित्त या ढोलकी सम्राटाच्या कलागुणांविषयी जागवलेली खास शब्दआठवण...**



पांडुरंग घोटकर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आणि प्रतिभावंत जेष्ठ ढोलकी वादकाचे नाव. महाराष्ट्राचे ढोलकी सम्राट म्हणून त्यांची सर्वत्र ख्याती आहे. कडक ढोलकी वादनातील हात म्हणूनही त्यांचे नाव रसिकांच्या ओठावर आदराने घेतले जाते. त्यांचा जन्म 21 मे 1947 रोजी औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील भिवधानोरा येथे झाला. वयाच्या बाराव्या वर्षी नांदेड तमाशा महोत्सवात या नामवंत कलावंताने आपल्या ढोलकी वादनाची चुणूक दाखवून तो महोत्सव दणाणून सोडला. जेमतेम इयत्ता तिसरीपर्यंत शिक्षण त्यांना मिळाले. पारंपरिक संबळ वादन गुरु वडिलांकडून त्यांना मिळाले. तसेच तबला वादनाचे शास्त्रोक्त शिक्षण गुरु लक्ष्मणराव काटे, उस्ताद अमीर हुसेन खान, जी. एल. सामंत यांच्याकडून मिळाले.

पारंपरिक गोंधळी कुटुंबात जन्मलेल्या पांडुरंग घोटकर यांचे वडिल अण्णा घोटकर 'संबळ' तालवाद्यात निपुण होते. संबळ वाजविण्याची कला, संबळचा ठेका ,संबळ वादनातील बारकावे आदिचे मार्गदर्शन वडिलाकडून त्यांना मिळत गेले . आणि या मार्गदर्शनाच्या जोरावर तसेच इतर नामवंत गुरु मंडळीच्या सावलीत हा कलावंत पुढे घडत गेला. प्रचंड इच्छाशक्ती, जिद्द, चिकाटी या वैशिष्ट्यांना आपलेसे करत ध्यासाने या कलावंताने ढोलकी वादनातले नाव पुढे कमावून ठेवले. उत्तर हिंदुस्थानात 'नाल' नावाने परिचित असलेली ढोलकी वाजविण्यास त्यांनी प्रारंभ केला. लावणी सादरीकरणाच्या वेळचे ढोलकीच्या बाजाचे शिक्षण तीन वर्षे त्यांनी लक्ष्मणराव काटे या ढोलकीपटूंकडून घेतले. आमिर खॉ साहेब यांच्या कडून तीन वर्षे तर जी.एल.सामंत यांच्याकडून तब्बल दहा वर्षे तबला वादनाचे शिक्षण घेऊन ते पारंगत झाले. लावणी नृत्याआधी 'मुजरा' या भागाचे कौशल्य पांडुरंग घोटकर यांनी विकसित केले. आणि ते महाराष्ट्रातील अनेक मान्यवर लावणी नर्तिकांचे गुरु ठरले. अदाकारी आणि गायन हे आपल्या लोकप्रिय लावणीची त्रिसूत्री आहे. या त्रिसूत्रीला नेमकेपणाने हेरत कथ्थकचा पदन्यास, त्यासाठी होणारे तबल्यातील बोलांचे उपयोजन आणि लावणीतील पदन्यास आणि त्यासाठी वापरण्यात येणारे विविध ताल यांचा अभ्यास पांडुरंग घोटकर यांनी केला. सुरुवातीस मथुरा- द्वारका संगीत बारीत त्यांनी ढोलकी- तबला वाजवण्यास प्रारंभ केला. 1961 पासून अनेक कार्यक्रमांतून त्यांच्या अप्रतिम ढोलकी वादनाची प्रशंसा प्रेक्षकांकडून होऊ लागली. 1966साली नेफा आघाडीवर जवानांचे मनोरंजन करण्यासाठी भारत सरकार तर्फे त्यांनी कार्यक्रम केला. या कार्यक्रमात राधाबाई बिडकर, संजीवनी बिडकर या संगीत बा-यांचे फड त्यांच्या सोबत होते. या संचासोबत जवळपास एक महिनाभर घोटकर यांनी ढोलकी वादनाद्वारे जवानांचे मनोरंजन करीत भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविले होते. त्यानंतर 1974 ते आजपर्यंत महाराष्ट्र शासनाच्या तमाशा प्रशिक्षण शिबिरात ढोलकी वादन व लावणी यासाठी ते सतत मार्गदर्शन करत आहेत. 1969 पासून जसराज थिएटर निर्मित वगसम्राट दादा इंदुरीकर यांच्या 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यात त्यांनी वाजवलेली अप्रतिम ढोलकी आजही प्रेक्षकांच्या कानात घुमत राहिलेली आहे.



1977 साली राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद ,पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासमोर राष्ट्रपती भवनात त्यांनी कार्यक्रम सादर करून या महनीय व्यक्तींची वाहवा त्यांना मिळाली. 1981 साली जपान सरकारतर्फे लोककला महोत्सव अंतर्गत जपान येथे महाराष्ट्राच्या लावणीचे व महाराष्ट्राच्या ढोलकीचे यशस्वी सादरीकरण करून तिथल्या रसिकांच्या टाळ्या त्यांच्या कार्याची उंची अधोरेखित करून जातात. दूरदर्शनवर सुहासिनी मुळगावकर निर्मित प्रतिभा आणि प्रतिमा या कार्यक्रमात संगीततज्ञ डॉ. अशोक रानडे यांनी ढोलकी व संबळ वादन याविषयी त्यांची मुलाखत घेतली. 1989-90 यावर्षी एनसीपीए निर्मित 'बैठकीची लावणी' या कार्यक्रमात पु. ल. देशपांडे,डॉ.अशोक रानडे यांच्याबरोबर त्यांनी केलेले ढोलकी वादन त्या आठवणींना नक्कीच उजाळा देणारे ठरते. कलाछाया संस्थेतर्फे पुण्यात प्रथमच लावणी व ठुमरी या कार्यक्रमात पंडित बिरजू महाराज व यमुनाबाई वाईकर यांना कडक ढोलकीची साथसंगत करून त्या कार्यक्रमाची उंची वाढवली. पुढे पद्मश्री यमुनाबाई वाईकर, सत्यभामा पंढरपूरकर , कौशल्याबाई कोपरगावकर , राधाबाई बुधगावकर , विठाबाई नारायणगावकर, सुलोचनाबाई चव्हाण, गुलाबबाई संगमनेरकर, ज्ञानोबा उत्पात, शाहीर साबळे, शाहीर विठ्ठल उमप, आशा भोसले, लता मंगेशकर , रवींद्र साठे, शोभा गुर्टू, रामदास कामत, कीर्ती शिलेदार या मोठ्या गायकांना साथ संगत करण्याचे भाग्य त्यांना मिळाले.

गाढवाचं लग्न, थांबा थोडं दामटा घोडं , सखी माझी लावणी, विच्छा माझी पुरी करा, एक धार्मिक चार बेजार, आतून कीर्तन वरून तमाशा, मदनाची मंजिरी, तीन पैशाचा तमाशा इत्यादी लोकनाट्यात ढोलकीची साथ करीत ही लोकनाट्ये अजरामर केली. संगीतकार विठ्ठल शिंदे, तुकाराम शिंदे, विश्वनाथ मोरे, सुधीर फडके , राम कदम, बाळ पळसुले, हृदयनाथ मंगेशकर, आनंद मोडक लक्ष्मीकांत-प्यारेलाल, राजेश रोशन, बप्पी लहरी, अनु मलिक यांच्या सोबत त्यांना काम करण्याची संधी मिळाली. देवापुढे माणूस, रामनगरी, फटाकडी, एक होता विदुषक या मराठी चित्रपटासोबतच आक्रोश, अपनापन या हिंदी चित्रपटातून ढोलकीवादनाचे कसब त्यांनी दाखवून दिले. पांडुरंग घोटकर ढोलकी शिवाय तबला, पखवाज, संबळ, दिमडी इत्यादी वाद्य वाजवीत आपल्या अंगातील विविध कलांचे दर्शन ते घडवून आणतात. मधू कांबीकर यांनी 2 जून 1972 मध्ये महाराष्ट्राच्या राज्यपालांसमोर राजभवन येथे त्यांचे कलादर्शन घडविले होते. त्यावेळेस पांडुरंगरावांनी केलेली ढोलकीची साथ खूप गाजली. 1972-73 तर च्या काळात बीड येथे नवरंग थेटरच्या स्थापनेत पांडुरंग घोटकर यांचे मोलाचे मार्गदर्शन राहिले. कुठलेही आर्थिक पाठबळ, लावणीचे शास्त्रशुद्ध शिक्षण नसलेल्या, सामाजिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या या क्षेत्रातील लावणी कलावंतांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आजही ते करतात. देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद येथे लोककला विभागातील ढोलकी तसेच लावणी विषयीचे मार्गदर्शन ते करत आहेत. त्यांच्या हातून अनेक तरबेज ढोलकी वादक घडताना दिसत आहेत. महाराष्ट्र महोत्सव, लोकोत्सव, मुंबई फेस्टिवल, मुंबई लावणी महोत्सव, महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित राज्य लावणी महोत्सव, विविध शिबिरे यातून ते आपले कलादर्शन घडवून आणताहेत. महाराष्ट्राचे तमाशा आणि लावणी आपले सांस्कृतिक संचित आणि लोकपरंपरा आहे. माझ्या अनुभवातून आणि मार्गदर्शनातून अनेक उत्तम विद्यार्थी ढोलकीवादक म्हणून माझ्या हातून घडत आहेत याचा आनंद मला सतत वाटतो असे ते नम्रपणे नमूद करतात. अशा प्रतिभावान ढोलकीसम्राटास त्रिवार सलाम व वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा..!

**ढोलकीचा तबला करू नका . .**

"वादकांना ढोलकीचा बाज कळला पाहिजे . ढोलकी तासनतास एकटयाने वाजवण्याचे एकल वाद्य नाही . ढोलकी साथीचे आणि गाणे रंगवण्याचे वाद्य आहे . खूपवेळ चक्रधार, मुखडे, गत, कायदे वाजवून ढोलकीचा तबला करू नका अशी तंबी पं . पांडुरंग घोटकर यांनी तरुण वादकांना दिली . ढोलकी आपले लोकप्रिय वाद्य असून त्याचे वाद्य सौंदर्य टिकवून ठेवण्याची जबाबदारी वादकांची आहे . परंतु त्याची लोकप्रियता जतन करण्याची गरज रसिकांची आहे असे मत पं . पांडुरंग घोटकर यांनी खास संवाद साधताना व्यक्त केले .

# 'पुरुषी' मनात दडलेला 'विषाणू' भय इथले संपत नाही



आशिष निनगुरकर
मो. 9022879904

आधुनिक केसरी

**रस्ते, बस स्थानके, रेल्वे स्थानके, उद्याने आणि अन्य सर्व सार्वजनिक स्थळे सर्वांसाठी खुली आहेत. त्यांचा आनंद सर्वजण घेऊ शकतात. मात्र, अनेक स्त्रियांसाठी ही छळाची ठिकाणे ठरतात. स्त्रियांच्या संचाराच्या तसेच व्यक्ती म्हणून प्रतिष्ठेच्या मूलभूत हक्कावर दररोज गदा आणली जात आहे.सीमा रस्त्यावरून चालत असते, तेव्हा एक पुरुषांचा समूह तिच्या चेहऱ्यावर व बांध्यावर टिप्पणी करतो. 'वा! काय फिगर आहे!' 'बत्तीस असेल की छत्तीस?' सीमा या आगाऊ टिप्पणीकडे दुर्लक्ष करून चालत राहते. टिपण्या अधिक अश्लाघ्य होत जातात. ते तिला 'बिच' म्हणतात.सुधा बससाठी रांगेत उभी आहे. अचानक तिला तिच्या छातीवर हात पडल्यासारखा वाटतो. ती आजूबाजूला बघते पण हे नेमके कोणी केले ते तिला ते कळत नाही. तिला आपल्या खासगी मर्यादेत अतिक्रमण झाल्यासारखे वाटते पण काही बोलण्याची हिंमत तिला होत नाही.**

स्त्रीचा जन्मच मुळी अत्याचार सोसण्यासाठी झाला आहे अशी आपल्या समाजाची धारणा आहे. या धारणेला गरीब, श्रीमंत, जात, धर्म, पंथ, शिक्षित, अशिक्षित, ग्रामीण, शहरी, नोकरीवाली, बिगरनोकरीवाली असा कुठलाही अपवाद नाही. स्त्री- पुरुष समानता ही बाब आपल्याकडे केवळ आपण आधुनिक विचारणीचे आहोत हे दाखविण्यापुरतीच मर्यादीत आहे. वास्तव नेमके याच्या उलट आहे. भारतीय संविधानाच्या कलम १४ नुसार भेदभावापासून मुक्ती, कलम १५ अन्वये स्त्री पुरुष समानता आणि कलम २१ अन्वये जीवित व स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचा हक्क महिलांनाही दिला आहे. तरीही महिला कौटुंबिक हिंसाचारास बळी पडतात. त्यांची प्रतिष्ठा सांभाळली जात नाही. समाजसुधारक, विचारवंतही आपल्या समाजाचे पूर्ण मानसिक परिवर्तन करु शकलेले नाहीत. समाज सुधारणा करण्यासाठी केवळ प्रबोधन पुरेसे नसते. महाराष्ट्राचे आराध्य दैवत गणपतीचा उत्सव सुरु असताना, सगळीकडे आनंदी आनंद असताना मन सुन्न करणारी, हृदयद्रावक घटना मुंबई मधील अंधेरी इथे घडते. अंधेरी, साकीनाका इथे शुक्रवारी पहाटे एका ३० वर्षाच्या परिचय असलेल्या महिलेवर ४५ वर्षाच्या आरोपीने बलात्कार करुन तिला एका टेम्पोमध्ये फेकून देवून निघून जाणे ही माणुसकीला काळिमा फासणारी अत्यंत क्रूर घटना आहे. मुंबई शहर महिलांना खूप सुरक्षित मानले जाते पण शहर कितीही आधुनिक असो पुरुषांच्या मानसिक वृतीत जोपर्यंत सुधारणा होत नाही तोपर्यंत आपण कितीही स्त्री-पुरुष समानतेच्या गप्पा मारल्या तरी अजूनही एकविसाव्या शतकात स्त्रिया सुरक्षित नाहीत हेच अधोरेखीत होते. तिच्यावर बलात्कार करुन तिच्या अंतर्गत भागात लोखंडी गज घालणे हे हैवानी कृत्य दुसरा एक माणूसच पण एक पुरुष करतो, हे काळे कृत्य समस्त स्त्री जातीला नव्हे समस्त समाजाला भयानक चीड, संताप आणणारी आहे. एकट्या, असहाय्य व अंधाऱ्या रात्रीचा फायदा घेऊन तिच्यावर निर्घुणपणे अत्याचार करणे यात कुठला आला आहे पुरुषार्थ ? ही भयंकर घटना २०१२ साली १६ डिसेंबरच्या रात्री दिल्लीत घडलेल्या काळ्या कृत्याची, निर्भयाच्या घटनेची आठवण करुन देणारी आहे. संपूर्ण देशात खळबळ माजणारी ही घटना विसरत नाहीत तोपर्यंत तशीच दुसरी घटना मुंबई मध्ये घडते यावरुन या देशातील आरोपींना कायद्याचे काहीच भय वाटत नाही हेच दिसून येते. निर्भया प्रकरणानंतर आपल्या देशात बरेच कठोर कायदे करून सुद्धा आरोपींना वचक बसत नाही. त्याच्यानंतर हैदराबाद येथे डॉक्टर महिलेवर मदत करण्याच्या बहाण्याने तिला दूर नेऊन सामुहिक बलात्कार करुन पुरावे नष्ट करुन तिला जिवंत जाळणे, उत्तरप्रदेश मधील हाथरसमध्ये पण अशीच घटना घडणे अश्या घटना वारंवार घडत आहेत. त्यामुळे बलात्कार करणाऱ्या नराधमाना कायद्याची किंवा पोलीसांची अजिबातच भिती राहिली नाही नव्हे आपल्या अमानुष कृत्याची शरम पण वाटत नाही आणि त्यांच्यात पिडीतेला मारून टाकून पुरावा नष्ट करण्याची दुष्ट प्रवृत्ती वाढीस लागली आहे.

महाराष्ट्र तर गेल्या कांही दिवसांत महिलावर होणाऱ्या अमानुष अत्याचाराने हादरून गेला आहे. मुंबई, पुणे, कल्याण, उल्हासनगर, अमरावती, वसई, पिंपरी-चिंचवड ह्या सर्व ठिकाणी महिलांच्यावर अत्याचार झाल्याच्या घटनांनी पुनः एकदा महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मुंबई हे शहर महिलांसाठी अत्यंत सुरक्षित मानले जाते. मुंबई पोलिसांची कीर्ती साऱ्या जगभर आहे. पण १० सप्टेंबरच्या पहाटे अतिशय घृणास्पद घटना घडते आणि पुन्हा अख्खा महाराष्ट्र खडबडून जागा होतो. त्या पिडीतेवर अमानवी अत्याचार करुन, तिला एका निर्जीव वस्तुसारखी फेकून देऊन तो नराधम अतिशय थंड डोक्याने कसा काय निघून जातो ही घटनाच अत्यंत चीड, संताप आणणारी आहे. ज्या स्त्रीच्या कुशीतून जन्म घेतो तशाच एका दुसऱ्या स्त्रिच्या कुशीची विटंबना नव्हे तर क्रूरपणे चिरफाड करणे असे कृत्य मुके प्राणीसुद्धा करत नाहीत पण असे राक्षशी कृत्य एक पुरुष करतो ही गोष्ट समस्त पुरुष वर्गाला शरमेने मन खाली घालायला लावणारी आहे. समाजाकडून व विरोधी पक्षाकडून त्याला फाशीच्या शिक्षेची कडाडून मागणी होईल, सरकार, पोलीस प्रशासन यांच्यावर समाज, विरोधी पक्ष दबाव आणेल. काही दिवस वातावरण तापून त्याच्यावर चर्चा होतील, वेगळी चौकशी समिती नेमली जाईल. पण काही वर्षांनी पुराव्या अभावी जमीन मिळून ते नराधम सुटतात आणि म्हणूनच पुन्हा अशा घटना घडतात हे नेहमीचेच झाले आहे. कायद्यातील सर्व तरतुदींचा आरोपी वापर करतात त्यामुळे आपल्याकडे फाशीची शिक्षा अमलात आणण्यास खूपच विलंब होतो. त्यामुळे जलदगती न्यायालयात खटला चालवून आरोपींना जबर शिक्षा झाली पाहिजे आणि पिडीतेला व तिच्या कुटुंबियांना लवकरात लवकर न्याय मिळाला पाहिजे. तिच्या कुटुंबावर आपल्या मुलगीचा असा अत्यंत दुर्दैवी मृत्यू होतो याचा मानसिक आघात होतो शिवाय पिडीतेच्या मुलींना पण किती तीव्र मानसिक धक्का बसत असेल याची कल्पनाच न केलेली बरी. मुळात स्त्री ही एक भोगवस्तू आहे ही पुरुषी वृत्ती समूळ नष्ट झाली पाहिजे. अजूनही खेडयातून मुलगा- मुलगी भेदभाव होतोच आहे. पालन पोषण करताना आई-वडिलच मुलाने काही केले तरी चालते असेच संस्कार मुलांवर करतात. पुरुष प्रधान संस्कृती २१ व्या शतकात सुद्धा शिक्षित, उच्चशिक्षित समाजात घट्ट पाय रोवून उभी आहे. कौटुंबिक हिंसाचार म्हणजे शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषतः अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे किंवा धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे किंवा पीडित महिलेचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे किंवा तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडे हुंडयाची मागणी करणे व या सर्व गोष्टींचा दुष्परिणाम पीडित व्यक्ती अथवा तिच्या नातेवाईकांवर होणे तसेच आर्थिक छळ करणे म्हणजे महिलेचे स्वतःचे उत्पन्न, स्त्रीधन, मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित करणे, घराबाहेर काढणे या बाबींना कौटुंबिक हिंसाचार म्हटले जाते. तोंडी आणि भावनिक अत्याचार जसे अपमान करणे, वाईट नावाने बोलावणे, चारित्र्याबद्दल संशय घेणे, मुलगा झाला नाही म्हणून अपमान करणे, हुंडा आणला नाही म्हणून अपमान करणे. महिलेला किंवा तिच्या ताब्यात असलेल्या मुलाला शाळेत, महाविद्यालयात किंवा इतर शैक्षणिक संस्थांमध्ये जाण्यास मज्जाव करणे, नोकरी स्वीकारण्यास व करण्यास मज्जाव करणे, स्त्रीला व तिच्या ताब्यात असलेल्या मुलाला घरामधून बाहेर जाण्यास मज्जाव करणे, नेहमीच्या कामासाठी कोणत्याही व्यक्तीबरोबर भेटण्यास मज्जाव करणे, महिलेला विवाह करावयाचा नसल्यास विवाह करण्यास जबरदस्ती करणे, महिलेच्या पसंतीच्या व्यक्ती बरोबर विवाह करण्यास मज्जाव करणे, त्याच्या अथवा त्यांच्या पसंतीच्या व्यक्तीबरोबर विवाह करण्यास जबरदस्ती करणे, आत्महत्येची धमकी देणे इतर कोणतेही भावनात्मक किंवा तोंडी अपशब्द वापरणे यांचा समोवश होतो. आर्थिक अत्याचारात हुंडयाची मागणी करणे, महिलेच्या किंवा तिच्या मुलांचे पालन –पोषणासाठी पैसे न देणे, महिलेला किंवा तिच्या मुलांना अन्न, वस्त्र, औषधे इत्यादी न पुरविणे, नोकरीला मज्जाव करणे, नोकरीवर जाण्यासाठी अडथळा उत्पन्न करणे, नोकरी स्वीकारण्यास संमती न देणे, पगारातून रोजगारातून आलेले पैसे काढून घेणे, महिलेला तिचा पगार, रोजगार वापरण्यास परवानगी न देणे, राहात असलेल्या घरातून हाकलून देणे, घराचा कोणताही भाग वापरण्यास किंवा घरात जाण्यास, येण्यास अडथळा निर्माण करणे, घरातील नेहमीचे कपडे, वस्तू वापरण्यापासून रोखणे, भाड्याच्या घराचे भाडे न देणे या बाबींचा समावेश होतो.विशिष्ट वर्गातील लोकच लैंगिक छळात सहभागी असतात हीदेखील सामान्य धारणा आहे. मात्र, येथे मुद्दा वर्गाचा नाही, तर मानसिकतेचा आहे.

स्त्रियांना त्रास देणे सोपे आहे असे वाटणारे लोक स्त्रियांचा लैंगिक छळ करण्यात सहभागी असतात. कौटुंबिक हिंसचारास प्रतिबंध करणारा हा कायदा केंद्र सरकारने केला. या कायद्याद्वारे पीडित महिलेला न्याय, संरक्षण मिळू शकते. या कायद्याच्या आधारे पीडित महिला तिच्या अथवा तिच्या मुलांविरुध्द होणारे अत्याचार थांबवू शकते. स्त्रीधन, दागदागिने, कपडे इत्यादींवर ताबा मिळवू शकते. संयुक्त खाते अथवा लॉकर हिंसा करणाऱ्या पुरुषास वापरण्यास प्रतिबंध करु शकते. स्त्री ज्या घरात राहत असते ते घर सोडावे लागणार नाही. हिंसाकारी पुरुषास स्त्री राहात असलेले घर विकण्यास प्रतिबंध करु शकतो. वैद्यकीय उपचाराचा खर्च मागू शकतो भावनिक व शारीरिक हिंसाचाराबद्दल नुकसान भरपाई स्त्रीला मागता येते. त्याचप्रमाणे पीडित महिलेला मोफत कायदेविषयक केंद्राद्वारे सल्ला, सेवा पुरविणाऱ्या संस्था, वैद्यकीय सुविधा, निवासगृह इत्यादी मधून आवश्यक त्या सेवा सुविधा प्राप्त करुन घेता येतात. भारतीय दंड संहिता ४९८ अ कलमाखाली पोलिसात तक्रार दाखल करता येते. **क्रमशः**



# मनोज भाई संसारे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

धुळे : आंबेडकरी चळवळीतील आक्रमक नेते अशी प्रतिमा असलेले स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे सर्वेसर्वा मनोज भाई संसारे (५५) यांचे १२मे रोजी सायंकाळी प्रदीर्घ आजाराने मुंबई सेंट्रेल येथील बाबू जगजीवनराम रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीची मोठी हानी झाली आहे. आज धुळ्यात युथ पॅंथर फाउंडेशनच्य वतीने त्यांना अभिवादन करण्यासाठी धुळे शहरातील संपूर्ण आंबेडकरी समाज एकवटला होता. यावेळी आंबेडकर समाजाचे लढवय्या नेते म्हणून ओळख असलेले मनोज भाई संसारे यांच्या आठवणींना यावेळी उजाळा देण्यात आला. मनोज भाई संसारे यांनी केलेले कार्य आणि नामांतराच्या लढ्यात दिलेले योगदान हे महत्वपूर्ण होते. रिपब्लिकन ऐक्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे. आज युथ पॅंथर फाउंडेशनच्या वतीने पॅंथर मनोज भाई संसारे यांची अभिवादन सभा घेण्यात आली. धुळे शहरातील सर्वच आंबेडकरी नेत्यांनी जेल रोड क्युमन क्लब समोरील गरुड वाचनालय या ठिकाणी मनोज भाई संसारे यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना अभिवादन करण्यात एकत्र आले होते. यावेळी आंबेडकरी समाजाचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी युथ पॅंथर फाउंडेशन चे शंकर आण्णा खरात, विशाल पगारे, निशांत मोरे, नागिंद मोरे, यशवंत बागुल, सिद्धार्थ वाघ, किरण इशी, सनी सोनवणे, योगेश पगारे, सचिन खरात, विनोद केदार, गौतम मोरे, आकाश बागुल, आकाश येरेकर, आबासाहेब अमृतसागर, जॉनी पवार, विवेक नेतकर, बबलू रामराजे, सागर मोहिते, बबलू लोंढे, दिनेश निकुंबे, राहुल भामरे, ॲड. ऋतुराज वाघ, नितीन म्हासदे, राहुल वाघ, बबलू खरात, विनोद गरुड, संदीप वाघ, बापू अहिरे, रोहित म्हसदे, संदीप त्रिभुवन, स्वप्निल सोनवणे, राहुल पवार, छोटू बोरसे, बंटी लोंढे, योगेश खैरनार, संदीप त्रिभुवन, बापू अहिरे, सचिन खरात, विवेक नेतकर, अक्षय बारसके, संजय सरदार, विकी बागुल, पंकज गायकवाड, गणेश बोरसे,चेतन गायकवाड, स्वप्निल सोनवणे आदी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उष्माघाताचे नागपुरात 3 बळी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पारा चढल्याने उकाडा वाढला आहे. त्यामुळे नागपूर महापालिकेच्या आरोग्य विभागाने उष्माघाताच्या ३ संशयित मृत्यूची नोंद केली आहे. परंतु, शवविच्छेदन अहवालानंतरच या मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होईल. नागपूर जिल्ह्यात मध्यंतरी सातत्याने अधून- मधून पाऊस, ढगाळ वातावरण, उन्हाचा खेळ सुरू होता. त्यामुळे तापमानही कमी होते. परंतु गेल्या काही दिवसांपासून सातत्याने तसपमान ४२ ते ४४ अंश सेल्सियस दरम्यान आहे. उकाड्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. सर्वत्र तापासह गॅस्ट्रो, अतिसार यासह उन्हामुळे होणाऱ्या विविध आजारांचे रुग्ण वाढले आहे. नागपूरच्या मेडिकल, मेयो, आयसोलेशन या



शासकीय- महापालिका आणि सर्व खासगी रुग्णालयांत गेल्या काही दिवसांत ओकारी, हगवण, तापासह इतर उष्माघात सदृश्य लक्षणाचे रुग्ण वाढले आहे. दरम्यान महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे १९ मे पर्यंत ३ उष्माघाताच्या संशयित मृत्यूची नोंद झाली. त्यापैकी २ अनोळखी रुग्ण असून एका रुग्णाची माहिती आरोग्य विभाग काढत आहे.


# राज्यात सीसीआयमार्फत ११हजार प्रति क्विंटल कापूस खरेदी केंद्र सुरू करा

## शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

महाराष्ट्रातील एकमेव नगदी पीक कापसाची दाणादाण ही केंद्र सरकारच्या कापूस उत्पादक शेतकरी विरोधी धोरणामुळे असुन महाराष्ट्राचे सरकार सुद्धा या गंभीर विषयावर मौन घेऊन असल्यामुळे येत्या तीन– चार दिवसात केंद्र सरकारने कापूस निर्यात करण्यासाठी प्रति गाठी मागे ३०,००० /– अनुदान जाहीर करावे व शिन्दे फडणवीस सरकारने महाराष्ट्रातील ८२ लाखावर कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १००० हजार रुपये अनुदान जाहीर करावे लागेल अशी मागणी शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष डॉ गजेंद्र पाटील, छत्रपती संभाजी नगर जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव, हिंगोली जिल्हा अध्यक्ष मारुती चोपडे तर नागपूर जिल्हा अध्यक्ष डॉक्टर रमेश पाटील, प्रदेश कार्यकारणी समितीचे अध्यक्ष अंबादास कोरडे पाटील व उपस्थित शेतकरी यांनी केली आहे .

**फुलंब्री :** कापसाला रु ११००० रूपये प्रती क्विंटल बेसरेट विक्री किंमतीची घोषना राज्य सरकारने करून सीसीआय मार्फत शेतकऱ्यांकडे शिल्लक असलेला कापूस तात्काळ खरेदी करून कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे शोषण थांबून कापूस उद्योगालाही चालना द्यावी अशी मागणी आज झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली. महाराष्ट्र राज्यातील सध्या अनेक जिल्ह्यांमध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्याची परिस्थिती गंभीर असून सध्या कापसाला हमीभाव नाही, जिनिंग मध्ये रुईच्या गाठी मोठ्या प्रमाणात शिल्लक असल्याची माहिती जिनिंग मालकांकडून मिळत आहे, तर गिरण्यांमध्ये कापसाचा धागा शिल्लक पडून आहे यामुळे कापूस पीक धोक्यात आले असुन केंद्र सरकारने तात्काळ कापसाचा हमीभाव कमीत कमी ११००० रुपये प्रति क्विंटल करावा व केंद्र सरकारने ५० लाख खंडी रुई ७० हजारच्या दराने बाजारातून विकत घेऊन अनुदान देऊन निर्यात केल्यास भारतातील कापसाची मंदी दूर होऊ शकते नाहीतर पुढच्या वर्षीही कापूस उत्पादक शेतकरी प्रचंड आर्थीक संकटात येतील तरी केंद्र सरकारने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी संघटनेने फुलंब्री जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे पत्रकार परिषदेमध्ये केली आहे. यावेळी बोलतांना शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय सचिव युनूस आलम सिद्दिकी, श्री छत्रपती संभाजी नगर जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव यांनी ज्याप्रकारे महाराष्ट्रात आर्थिक अडचणीत आलेले कापूस उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या कडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी भीती व्यक्त केली. सरकारने दुजाभाव करू नये.. एकीकडे अडचणीत आलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ४० टक्के अनुदान प्रति क्विंटल ३५०/- रू. दिले आहे मात्र महाराष्ट्राचे कृषी विकासाला चालना देणारे एकमेव प्रमुख नागदी पीक कापसाचे भाव १४ हजार रुपये प्रति क्विंटल वरून ७५०० रुपये प्रति क्विंटल ५०%ने खाली आल्यानंतरही केंद्र सरकार व राज्य सरकारने महाराष्ट्रातील ८०/८२ लाख कापूस उत्पादक शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे याकडे संघटनेने लक्ष वेधले आहे. राज्य सरकारने कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या गंभीर समस्येकडे लक्ष न दिल्यास मोठया प्रमाणात कापूस उत्पादकांना आत्महत्या चा मार्ग दाखवायचा का असा उलट सवाल करत. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना खरीप हंगाम पुर्वी १हजार रूपये प्रति क्विंटल आर्थिक मदतीचे पॅकेज महाराष्ट्र राज्य सरकारने द्यावे अशी मागणी शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय सचिव युनूस आलम सिद्दिकी, प्रदेश कार्यकारी समितीचे प्रदेशाध्यक्ष अंबादास कोरडे पाटील, जिल्ह्याचे अध्यक्ष काशिनाथ जाधव, अहमदनगर ग्रामीण जिल्ह्याचे अध्यक्ष दौलत गंणगे यांनी केली आहे. महाराष्ट्रातील ८२ लाख कापुस उत्पादक शेतकरी प्रचंड आर्थीक संकटात मागील वर्षी कापसाला प्रति क्विंटल १२ हजार रुपयेचे वर भाव मिळाला आहे, यावर्षी केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्याला विक्रमी उत्पादन काढण्याच्या संदर्भात आव्हान केल्यामुळे शेतकऱ्यांनी यावेळी १ कोटी १० ते २२ लाख हेक्टर मध्ये कापसाची लागवड करून सरकारने केलेल्या आव्हानाला साथ दिली आहे त्यात शेतकऱ्यांची काय चूक. ? त्यामध्ये संपूर्ण मराठवाडा, खांदेश उत्तर महाराष्ट्र सह, विदर्भ विदर्भात मोठ्या प्रमाणात, तर यावेळी यावेळी काही प्रमाणात पश्चिम महाराष्ट्रात पेरा करण्यात आला होता. सुरवातीला प्रचंड पाऊसाने कापसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले व ७० टक्के पीक वाया गेले, मात्र महाराष्ट्रातील ८० ते ८२ लाखावर शेतकऱ्यांनी कापूस लागवडीचा प्रचंड खर्च करत जेमतेम ३० ते ४० टक्के कापसाचे उत्पन्न घेतले व मागील डिसेम्बरपासून कापसाचे भाव वाढतील या आशेने सर्व कापूस घरी ठेवुन कापसाचे भाव वाढतील या आशेने कापूस उत्पादक शेतकरी सरकारी खरेदी व हमीभाव वाढीची वाट पाहत आहेत. आज कापसाचा भाव जेमतेम ६५०० ते ७००० हजार कृपया पर्यंत खाली आला आहे.



# वणी-चंडिकापूर, वणी-भातोडे रस्त्यावरील पुलाची दुरवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** सप्तशृंग गडाकडे पायवाटेने जाणार्या वणी चंडीकापूर मार्गावरील पुलाच्या मध्यभागी मोठा खड्डा पडला आहे. परिसरातील शेतकर्यांच्या समस्या वाढल्या असून ट्रक्टर व चारचाकी वाहने तर जाऊ शकत नाही व दुचाकीवरुन जीवघेणा प्रवास करावा लागतो आहे दिंडोरी तालुक्यात गतवर्षी पावसाने रस्ते, पुल बांध, नदीपात्र याची वाताहात केली होती त्यात वणी चंडीकापूर व वणी भातोडा रस्त्यावरील पुलाच्या दुरावस्थेमुळे शेतकरी बांधवांची डोकेदुखी वाढलेली आहे दरम्यान सप्तशृंगगडावर वणी चंडीकापुर मार्गे वणी येथुन पायी जाण्यासाठी रस्ता आहे त्या रस्त्यावर एके ठिकाणी पुल व त्यावर फरशी असुन पुलाखालुन पाण्याचा प्रवाह वाहुन जाण्यासाठी खाली पाईप टाकले आहेत. या रस्त्यावरुन प्रतिदीन शेकडो वाहने त्यात ट्रक्टर पिकअप जीप कार ये जा करत मात्र सदर पुलावरील फरशी मागील वर्षी वाहुन गेली व पुल क्षतिग्रस्त झाल्याने पुलाचे वास्तव स्वरुप पुढेआले यामुळे या मार्गावरुन ये जा करणारांना दुचाकीवरुन जीव घेणा प्रवास करावा लागतो आहे मात्र वर्षाचा कालावधी उलटुनही पुलाची समस्या कायम आहे या पुलाच्या मध्यावर अंदाजे दहा फुटाचा खड्डा पडला आहे ही दुरुस्ती तातडीने करण्याची मागणी राकेश थोरात अनिल थोरात यांनी केली आहे पावसाळा महीनाभरावर आला आहे त्यापुर्वी ही दुरुस्ती झाली नाही तर या समस्येमुळे कृषी साहीत्य वाहतुक करता येणार नाही. परिणामी कामाचा खोळंबा होईल शेतीकामाचा हंगामात दळणवळण यास अडचण येईल. दरम्यान वणी भातोडे या पाच किलोमीटर अंतरात दोन किलोमीटर अंतरावर पुलाची दुरावस्था झाली आहे.पावसाळ्यापुर्वी याचीही दुरुस्ती आवश्यक आहे.वणी चंडीकापुर व वणी भातोडा या रस्त्यावरील समस्या शेतकर्यांच्या पाचवीला पुजलेली आहे.वारंवार मागणी करुनही पदरात काही पडत नसल्याने दाद मागावी कोणाकडे अशी स्थिती आहे.वेळोवेळी आश्वासने देऊन तोंडाला पाने पुसण्याच्या अनुभवामुळे शेतकरी वर्गात रोषाचे वातावरण आहे.

लोकप्रतिनीधी व प्रशासन याची त्वरीत दखल घेऊन सदर पुलाची दुरुस्ती करुन वाहतुक योग्य होणे कामी कार्यवाहीकरण्याची मागणी जगदंबा देवी संस्थानचे अध्यक्ष राजेन्द्र थोरात, सुनिल थोरात 'तुषार देशमुख,भुषण देशमुख ,आबासाहेब देशमुख ,राकेश थोरात यांनी केली आहे

# अस्वलाने अडवली पर्यटकांची वाट!

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वाघांनी अनेकदा पर्यटकांची वाट अडवली आहे, पण अस्वलही त्याच वाटेवर जात असेल तर.. नागझिरा अभयारण्यात हे घडले आहे आणि पर्यटक मार्गदर्शक अमित डोंगरे यांनी हा क्षण कॅमेऱ्यात टिपला आहे. नागझिरा अभयारण्य आणि अस्वलाचा उल्लेख होणार नाही असे शक्यच नाही. या अभयारण्याची ती ओळख आहे. कधी तो वारुळ पोखरुन त्यातील अळ्या खातो, तर कधी पावसाळ्यासाठी तयार करुन ठेवलेली मधाची पोळी या वारुळात लपवून ठेवतो आणि खातो. अस्वल आणि तेही सहकुटूंब या अभयारण्यात ज्या पर्यटकाला दिसले तो नशीबवान! या अभयारण्यातल्या अस्वलाच्या अनेक कथा आहेत. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांनी त्यांच्या पुस्तकात अस्वलाचे अनेक किस्से सांगितले आहेत. दोन दिवसांपूर्वी पर्यटकांची वाहने या अभयारण्यातून जात असताना हे अस्वल रस्त्याच्या मधोमध फेरफटका मारायला लागले. रस्त्याच्या दोन्ही बाजूने जंगलात जाण्यासाठी त्याला वाट मोकळी होती. पर्यटकांची वाहनेही बऱ्याच अंतरावर होती. तरीही तो पर्यटनाच्या रस्त्यावरच चालत होता. त्याला जणू हेच सांगायचे होते की हा रस्ता तुमचा नाही तर हा माझ्या अधिवासातला रस्ता आहे. बराचवेळानंतर त्या अस्वलाने आत जंगलातली वाट पकडली.

# धरणात रसायने सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** नाशिक जिल्ह्यात रासायनिक कंपन्या रसायने धरणांमध्ये सोडत असल्याचे निदर्शनास आले आहे त्यामुळे जिल्ह्यातील जीवित, शेती व पशुधन धोक्यात आले आहे त्यामुळे धरणामध्ये रसायने सोडणाऱ्या कंपन्यांची तातडीने चौकशी होऊन त्यांच्यावर कार्यवाही व्हावी तसेच या कंपन्या कायमस्वरूपी बंद करण्यात याव्यात अशी मागणी शिवसेना नेते प्रकाश पाटील यांनी विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांना समक्ष भेटून केली आहे.

नाशिक जिल्ह्यातील मुकणे, दारणा, नांदूरमध्यमेश्वर धरणांमधून नाशिक, नगर, संभाजीनगर या जिल्ह्यात सिंचन व पिण्यासाठी पाणी जाते. मात्र नागरिकांच्या जीविताला धोका आहे हे माहीत असूनही काही कंपन्या या धरणांत आपल्या कंपनीचे अतिरिक्त रसायने या धरणात आणून सोडतात. त्यामुळे या धरणाच्या लाभक्षेत्रातील शेती धोक्यात आली आहे. निफाड तालुक्यातील गोदावरी नदीत दोनदा रसायने सोडण्याचा प्रकार झाला आहे. त्यामुळे जलचर प्राणी मरून वर आले आहेत. पाटबंधारे खात्याने या बंधाऱ्यातील पाणी वापरू नये असे लेखी आदेश परिसरातील ग्रामपंचायतींना



काढले आहे. हे पाणी शेतात सिंचनाचा वापरले असता जमिनीवर रसायनांचा पांढरा थर येत आहे. त्यामुळे पिकांवर परिणाम होत आहे. या धरणांच्या पाण्यावर नाशिक, लासलगाव, शिर्डी, सिन्नर, वैजापूर, कोपरगाव, येवला आदी शहरांच्या पाणी योजना आहेत त्यामुळे या भागातील नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत. याबाबत महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियामक मंडळाची भूमिका संशयास्पद आहे. यांचेकडून कुठलीही कार्यवाही झाल्याचे ऐकिवात नाही. मध्यंतरी धरण परिसरात रसायन टाकतांना शेतकऱ्यांनी टँकर पकडला आहे मात्र तरीही प्रदूषण नियामक मंडळ अद्याप सुस्त आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील ज्या कंपन्या प्रदूषण विषयक नियम धाब्यावर बसवत असतील अशा कंपन्यांवर तातडीने कार्यवाही करण्यात येऊन त्यांना कायमस्वरूपी टाळे लावावे, आगामी काळात असे प्रकार घडू नये जर असे प्रकार घडल्यास मोठे जनआंदोलन छेडले जाईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, केंद्रीय आरोग्यराज्यमंत्री, पालकमंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, आरोग्यमंत्री, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियामक मंडळाला पाठविण्यात आल्या.



# विकास मीना यांची गणोरीला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मिना यांनी तालुक्यातील गणोरी येथे गावातील विविध विकास कामांची पाहणी केली. या वेळी आढावा घेऊन त्यांनी अधिकारी वर्गास सूचना केल्या. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालय व महिला बचत गटांनी लावलेल्या स्टॉलला भेट दिली. या वेळी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी ज्योती कवडदिवे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. पी. ठाकरे, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता सुनील खंदारे उपस्थित होते.

विकास मिना यांनी ग्रामपंचायत कार्यालयाला भेट दिली असता सरपंच सरला तांदळे यांनी त्यांचे स्वागत केले. ग्रामपंचायतीमार्फत राबविल्या जाणाऱ्या आयुष्यमान भारत, सिंचन विहिरी, जनावरांचे गोठे, पाणंद रस्ते, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोल्यांचे बांधकाम, वृक्ष लागवड; तसेच गोवर्धन प्रकल्प आदी कामांची पाहणी करत आढावा घेतला. या प्रसंगी विस्तार अधिकारी ज्ञानदेव जायभाये, ग्रामविकास अधिकारी सुरेश चौधरी, पंचायत समितीचे मग्रारोहयोचे अभिजीत गायकवाड, मनीषा कदम, संतोष तांदळे उपस्थित होते.

# नियामक मंडळाने घेतलेले निर्णय मुख्य सचिवांकडे हा निर्णय रद्द करा : राजेंद्र दाते

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** बार्टी, महाज्योती, सारथीच्या स्वायत्ततेवर गदा आणण्याचा शासन घेऊ पहात असलेला निर्णय विद्यार्थी वर्गासाठी घातक ठरणार असुन बार्टी, महाज्योती, सारथी आणि 'टीआरटीआय' या सर्व संस्थांमधील विद्यार्थ्यांचे एकसूत्रता आणण्यावर फक्त चर्चा करण्याचा नावाखाली घेतलेली बैठक दिशाभुल ठरेल असे स्पष्ट मत जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले असुन स्वायत्ततेवर गदा आणणारा निर्णय त्वरीत रद्द करावा अशीही मागणी त्यांनी केली आहे.

प्रत्येक समाजाची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती पाहून त्या समाजातील विद्यार्थ्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम आखण्यात आले असतानाही सर्व संस्थांचे प्रशिक्षण कार्यक्रम एकसारखे असावेत.यासाठी नुकतीच बैठक घेण्यात आली. आता या संस्थांच्या नियामक मंडळाने घेतलेले निर्णय मुख्य सचिवांकडे शिक्कामोर्तब करण्यासाठी पाठवावेत, असा नवा नियम लागू करण्याच्या हालचाली सुरू असल्याने संस्थांच्या स्वायत्ततेला धक्का बसण्याची स्थिती निर्माण झालेली असुन असा कुठलाही ठराव शासनाने मंजुर न करता विखंडित करावा अशी स्पष्ट मागणी जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमत्र्यांकडे केली आहे.

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यां साठी सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे ( बार्टी ) ची स्थापना केली. पुढे 'बार्टी' च्या धर्तीवर महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजे महाज्योती स्थापना झाली. नंतर छत्रपती शाहू महाराज संशोधन,प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था म्हणजे सारथी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था ( टीआरटीआय ) बहुजन समाजातील विद्यार्थ्यां साठी सुरू करण्यात आल्या. प्रत्येक समाजातील आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करून या योजना सुरू करण्यात आल्या आता सर्व संस्थांच्या योजना या एकसारख्या करण्याच्या हालचाली शासन स्तरावर सुरू असुन स्वायत्तता संपवणारा ठराव बार्टी, सारथी, 'टीआरटीआय',.महाज्योती या स्वायत्त संस्थांचे प्रशिक्षण कार्यक्रम सारखेच असावेत म्हणून १० मे रोजी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. येथे सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांनी एक ठराव मांडला त्यानुसार या संस्थांच्या नियामक मंडळाने ठराव घेतला की,त्याची अंमलबजावणी न करता त्यांना मुख्य सचिवांच्या अध्यक्षते खालील उच्चाधिकार समितीची मंजुरी घ्यावी लागेल. या ठरावावर मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा त्यावर शिक्कामोर्तब करण्याबाबत चर्चाही झाली. हा ठराव पास झाल्यास या संस्थांच्या स्वायत्ततेत काही एक अर्थ उरणार नसल्यामुळे असे दुरोगामी परीणाम करणारे सदर ठराव तात्काळ विखंडित करून या संस्थांची स्वायत्तता अबाधीत ठेवण्याची मागणी जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्र्याकडे केली आहे.









# ठंडाठंडाकूलकूल कोथिंबीरीचेसरबत



## लय भारी सुगरण




सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345


आधुनिक केसरी

ठंडाठंडाकूलकूल आपण अनेक प्रकारच्या डिशमध्ये कोथिंबीर वापरतो. तुम्ही पकोडे, पराठ्यासाठी आणि विविध भाज्यासाठी कोथिंबीरचा वापर करून शकता. कोथिंबीर आपल्या अन्नपदार्थामध्ये एक अनोखी चव वाढवण्याचे काम करते. चवीव्यतिरिक्त, अनेक आरोग्य फायद्यांसाठी देखील ओळखले कोथिंबीरला ओळखले जाते. आपण कोथिंबीर अनेक प्रकारे वापरू शकता. पचन सुधारण्यास कोथिंबीर मदत करू शकते. कोथिंबीरीमध्ये फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स जास्त प्रमाणात असतात. जे पचन सुधारू शकतात. हे चयापचय गतिमान करते. हे सूज आणि बद्धकोष्ठता दूर ठेवण्यास मदत करते. यामुळे तुम्हाला बऱ्याच काळासाठी पोट भरल्यासारखे वाटते. हे आपल्याला अति खाण्यापासून प्रतिबंधित करते.( गुगल तात्यांच्या खजिन्यातली माहिती ) #ठंडाठंडाकूलकूल या सदरात आपण आज कोथिंबीर वापरून एक प्रकारचं मस्त चवीचे पेय तयार केलं आहे. मुळ रेसिपी पंढरपूरच्या ज्योती शेटे. ज्योतिर्मय योग व निसर्गोपचार केंद्र" पंढरपूर. 919270171217 jyotishete57@gmail.c मॅडम यांची. मी पहिल्यांदा त्यांच्याकडे प्यायली . त्यांची शिष्या नंदिनी रानरूई. हिने मला सांगितली. चविष्ट, पौष्टीक, पटकन होणारी ही रेसिपी सध्याच्या उष्णतेच्या त्रासापासून आराम देणारी अशीच आहे. मग करून बघा आणि कळवा नक्कीच.त्यासाठी लिहून घ्या साहित्य आणि कृती. **साहित्य :** एक कोथिंबीरीची पेंडी,आठ ते दहा पुदिन्याची पाने, अर्धा चमचा जिरे, एक चमचा धणे, दोन तीन चमचे खडीसाखर, दोन लसूण पाकळ्या, चवीनुसार काळे मीठ/सैंधव, लिंबू,एक लीटर पाणी **कृती :** कोथिंबीर स्वच्छ धुऊन बारीक चिरून घ्या. आता मिक्सरच्या भांड्यामध्ये बारीक चिरलेली कोथिंबीर, पुदिन्याची पाने, लसूण पाकळ्या, जिरे, धणे, काळेमीठ अगदी थोडे पाणी घालून फिरवून घ्या. त्यांची पेस्ट गाळण्याने गाळून त्यात पाणी घालून मिश्रण ढवळून घ्यावे. त्यात लिंबू पिळून परत एकसारखे ढवळून घ्यावे. सर्व्ह करताना आवडत असल्यास सब्जाबी भिजवून घाला.मस्त चवीचे ,पौष्टिक, उष्णता कमी करणारे कोथिंबीरीचे सरबत तयार. करणार ना ? करूनच बघा . नक्की आवडेल.( साखर ,मीठ, लिंबू यांचे प्रमाण कमी जास्त करु शकता. )

# शासन आपल्या दारी उपक्रमाचा बोजवारा

## जुनेच वेळापत्रक व्हायरल झाल्याने संभ्रम

आधुनिक केसरी न्यूज




**निफाड :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम राबवला जात आहे. मात्र महसूल विभागाकडून याची फारशी जाहिरात न केली गेल्याने या योजनेचा बोजवारा उडाला असून नागरिकांपेक्षा अधिकारी वर्गाचीच उपस्थिती जास्त दिसून येत आहे. शासकीय योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहचावी आणि नागरिकांची कामे जलद व्हावी या हेतूने नाशिक जिल्ह्यात 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम राबविला जात आहे. विविध कार्यालयांचे प्रतिनिधी एकाच छताखाली आणून शासकीय सेवांची माहिती किंवा लाभ देण्यासाठी निफाड तालुक्यात जिल्हा परिषदेच्या गटांमध्ये शिबिरे घेतली जात आहेत. रेशनकार्ड, धान्य वितरण, कृषी विभाग, पशुसंवर्धन, आदिवासी, आरोग्य, जलसंधारण, अशा विविध विभागांतील वेगवेगळ्या योजनांची ओळख नागरिकांना या शिबिरातून होणार आहे. त्या माध्यमातून लाभार्थी संख्या आणि इष्टांक वाढण्यास देखील मदत होईल. यात कमीत कमी कागदपत्रे सादर करून जलद मंजुरी मिळविण्याची प्रक्रिया राबविली जात आहे. परंतु, तत्पूर्वी शासकीय या योजनेची माहिती आणि शिबीर ठिकाणांची नागरिकांना व्हायला हवी, परंतु ही शिबिरे कोठे आणि कधी घेतली जाणार असल्याची माहिती नागरिकांपर्यंत न पोहोचल्याने नागरिक संभ्रमात आहेत. 'शासन आपल्या दारी' उपक्रम राबविण्यासाठी तत्कालीन प्रांताधिकारी अर्चना पठारे यांनी २२ डिसेंबर २०२२ रोजी संबंधित विभागांना पत्र पाठवले होते. त्यात निफाड तालुक्यातील विविध गटांमध्ये आयोजित होणाऱ्या शिबिराची तारीख, शिबिराचे ठिकाण, शिबीर अधिकारी यांची नावे अशी माहिती दिलेली आहे. परंतु, बाजार समिती निवडणुकांच्या आचारसंहिता लागू झाल्याने ही शिबिरे पुढे ढकलली गेली. बाजार समितीच्या निवडणुका झाल्या आहेत. प्रांताधिकारी अर्चना पठारे यांची बदली होऊन हेमांगी पाटील यांनी पदभार स्विकारुन महिना उलटला आहे. या उपक्रमाबाबत अर्चना पठारे यांनी काढलेले पत्रच समाज माध्यमांत फिरत आहे. त्यात तारीख, वेळ, ठिकाण आणि काही शिबीर अधिकारी बदलण्याची गरज असतांना त्याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. तालुक्यातील कोणत्याही अधिकाऱ्याच्या लक्षात हा मुद्दा न आल्याचे आश्चर्य आहे.

### देवगाव गटात शिबीर 'पडल्याची' चर्चा

देवगावमध्ये गट शिबीर गुरुवारी ( दि .१८ ) संपन्न झाले असले तरी नागरिकांची किरकोळ उपस्थिती हा मुद्दा चर्चिला गेला . याबाबत पत्रकारांना देखील या उपक्रमाची माहिती देण्यात आली नाही . देवगाव गटातील मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल यांनी व्यापक जनजागृती केली असती तर गटातील समस्या असलेल्या नागरिकांची गर्दी होऊन समस्या तत्काळ सोडविता आल्या असत्या व दाखल्यांची मागणी संख्या वाढली असती . सदर शिबीर पार पडल्यानंतर काही नागरिकांना या उपक्रमाची माहिती झाली . या कार्यक्रमास 'बघे' वगळता उपस्थित नागरिकांच्या संख्येपेक्षा अधिकारी वर्गाची उपस्थिती जास्त असल्याने देवगाव येथील शिबीर 'पडल्याची' चर्चा होती .



# नवनियुक्त पोलीसांचा संविधानाने सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** यश मिळविण्यासाठी गेली अनेक वर्ष स्पर्धा परीक्षा देत अनेकांना संघर्ष करावा लागत असतो.त्या संघर्षातूनच यशाचे शिखर गाठत असताना एका नव्या आयुष्याची सुरुवात होत असते. यश हे सहजा सहजी मिळत नाही. त्यासाठी मेहनत ही महत्वाची असते. तरडगाव येथील ग्रामपंचायतीने उभारण्यात आलेल्या अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी यशाला गवसणी घातली आहे. त्यांनी पोलिस दलात प्रवेश करण्यासाठी जी परीक्षा दिली होती.त्या परीक्षेतून त्यांना यश मिळालेले आहे. आकाश शिंदे (शिंदे माळ), विशाल जाधव (तरडगाव), अभिजीत व्हाण( भूरकरवाडी), विनय गायकवाड (तरडगाव) हे यश मिळविलेल्यांची नावे आहेत. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या या विद्यार्थ्यांनी पोलीस दलात घवघवीत असे यश मिळविलेले आहे.मुंबई पोलिस आणि ठाणे पोलीस येथे निवड झालेली आहे.या यशा बद्दल लोणंद (ता.खंडाळा) येथे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी भारतीय संविधानाची उद्देशिका आणि अस्लम बागवान यांचे लोकशाहीचा जागर नावाचे पुस्तक देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.लोणंद येथील वृक्षप्रेमी व युवा सामाजिक कार्यकर्ते शंभूराज भोसले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. हॉटेल चवदारचे सुशिल गायकवाड यांच्या कडून या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.तसेच शंभुराज भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त ही त्यांचा शुभेच्छापर सत्कार करण्यात आला.या प्रसंगी कापड व्यवसायिक राकेश भाटिया उपस्थित होते.भारतीय संविधानाची उद्देशिका आणि लोकशाहीचा जागर नावाचे पुस्तक सत्कारातून मिळाल्याने नवनियुक्त पोलिसांनी याबद्दल आनंद व्यक्त केला. जे आम्हांला सत्कारातून हवं होतं.तेच मिळाले.आमच्यासाठी ही महत्वाची वस्तू असल्याचे अभिजित चव्हाण यांनी म्हटले आहे.

# आठ लाखांचे मोबाईल चोरीला

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण :** येथील संतोषी माता रस्त्यावरील श्री सद्‌गुरू मोबाईल विक्रीचे दुकान फोडून चोरट्यांनी गुरुवारी रात्री दुकानातील आठ लाख रुपये किमतीचे महागडे सत्तर मोबाईल चोरून नेले.

दुकानाचे मालक नीलेश जगताप यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासून आरोपींचा शोध सुरू केला आहे. गुरुवारी रात्री साडे नऊ वाजता नीलेश दुकान बंद करुन घरी गेले. रात्रीच्या वेळेत चोरट्यांनी दुकानाचे मुख्य लोखंडी दार उघडून दुकानातील ७० महागडे मोबाईल गुंडाळून पळून गेले. शुक्रवारी सकाळी दुकान मालक नीलेश यांना त्यांचा एक मित्र रमेश गौड यांनी दुकानाचे लोखंडी दार तोडले असून दुकानात चोरी झाल्याचा संशय व्यक्त केला. नीलेश यांनी तात्काळ पोलिसांना ही माहिती देऊन ते दुकानात आले. चोरट्यांनी दुकानातील आठ लाख रुपये किमतीचे मोबाईल चोरुन नेल्याचे निष्पन्न झाले. वर्दळीच्या संतोषी माता रस्त्यावर चोरी झाल्याने चोरट्यांना पोलिसांचा धाक राहिला आहे की नाही असे प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.




# शासकीय कार्यालयात शुकशुकाट कायमच;

## कर्मचाऱ्यांवर कोणाचा धाकच नाही का?



आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** सहा दिवसाच्या आठवड्यामुळे कर्मचाऱ्यांवर अधिकचा येणारा ताण शनिवारच्या दिवशी रेंगाळलेले कर्मचारी यांना कामात उत्साह कायम टिकून राहण्यासाठी, अधिकारी, कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी व्हावा, त्यांना कुटुंबियांना वेळ देता यावा. या उद्देशाने शासनाने पाच दिवसाच्या आठवड्याची संकल्पना अंमलात आणली आहे. त्यामुळे तरी कर्मचारी पाच दिवस अंग झटून काम करतील, अशी अपेक्षा होती. मात्र तसे होताना दिसत नाही. कर्मचारी शुक्रवारी सकाळी हजरच नसल्याचे चित्र आहे. काहीजण कशीतरी दुपारपर्यंत कळ सोसून थांबतात, दुपारून मात्र निमित्त सांगून गायब होताना दिसत होते. दुपारनंतर जि.प., जिल्हाधिकारी कार्यालय, कृषी कार्यालय, तहसील, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पंचायत समिती या प्रमुख कार्यालयांतील उपस्थितीच ५० टक्क्यांच्याही खाली उतरल्याचे दिसत होते. इतर शासकीय कार्यालयांचा तर विचारच न केलेला बरा. काही ठराविक कार्यालयांमध्ये ठराविक कर्मचारीच जागेवर असल्याचे दिसून आले. शुक्रवारीच गायब होणारे काही अधिकारी व कर्मचारी हे त्यांच्या सोयीच्या ठिकाणाहून येतात. यातून काही बहाद्दर शुक्रवारी दुपारनंतर गावाकडे रवाना होतात. सोमवारी ही या पेक्षा वेगळी परिस्थिती नसणार सोमवारी कार्यालयीन वेळेत बहुतांश अधिकारी, कर्मचारी शासनाने ठरवून दिलेल्या वेळेत यावेत, अशी अपेक्षा आहे, मात्र कर्मचारी हजर होत नाहीत, अन् होणार नाहीत, कारण या कर्मचाऱ्यावर कोणाचा धाकच उरलेला नाहीये असे चित्र सध्या पहावयास मिळत आहे. लेटलतिफशाहिवर पायबंद बसावा यासाठी शासनाने बहुतांश कार्यालयांमध्ये बायोमेट्रीक हजेरी प्रणाली बसविली. बहुतांश कार्यालयीन ठिकाणी बायोमेट्रीक प्रणाली मध्ये तांत्रिक बिघाड केल्याचा बोलले जात आहे.



# प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांना लोकमान्य टिळक पत्रकारिता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** येथील महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य तथा महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, समीक्षक आणि ज्येष्ठ पत्रकार प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांना हिंदवी बाणा लाईव्ह आणि कै. दुर्गादास सराफ पत्रकार प्रतिष्ठान, कंधार यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय लोकमान्य टिळक पुरस्कार कंधार येथे भव्य कार्यक्रमात नुकताच सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी आपल्या पत्रकारितेची सुरुवात दैनिक लोकमत सारख्या बलाढ्य आणि नामांकित लोकप्रिय दैनिकातून केली. लोहा कंधार तालुक्याचे प्रतिनिधित्व करत त्यांनी या भागातील सामान्य जनतेचे प्रश्न शासन दरबारी मांडून या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सरकारला भाग पाडले. तसेच आपल्या निर्भीड पत्रकारितेतून शासन प्रशासनाला वारंवार धारेवर धरत विकासाचे प्रश्न धसास लावले. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय पत्रकारिता करत करतच लोहा कंधार भागातील लोक जीवनाचे सांस्कृतिक संचित त्यांनी सर्वदूर महाराष्ट्रात गाजविले. मराठवाड्यातील लोकभाषा आणि लोकसंस्कृतीला पत्रकारितेतून जिवंत ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य प्राचार्य वसंत बिरादार पाटील यांनी केली आहे या कार्याची दखल घेऊन कंधार येथील हिंदवी बाणा लाईव्ह आणि कै. दुर्गादास सराफ पत्रकार प्रतिष्ठान यांच्यावतीने त्यांना नुकताच समारंभपूर्वक राज्यस्तरीय लोकमान्य टिळक पुरस्कार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रवक्ते आणि महाराष्ट्रातील निर्भिड वक्ते तथा दैनिक 'सामना' चे कार्यकारी संपादक खा. संजय राऊत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी बबनराव थोरात, मा. खा. सुभाष वानखेडे, मा आ. रोहिदास चव्हाण, मा. आ. ईश्वरराव भोसीकर, अॅड. मुक्तेश्वरराव धोंडगे तसेच शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहरराव धोंडे, दैनिक लोकपत्रचे संपादक रवींद्र तहकीक, दैनिक प्रजावाणीचे संपादक शंतनू डोईफोडे, मन्याड फाउंडेशनचे संचालक एकनाथ दादा पवार, सिनेअभिनेते अनिल मोरे, बालाजी पांडागळे, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील पुरस्काराबाबत प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# रोहिदास चव्हाण यांच्या वतीने खा. संजय राऊत यांचे जंगी स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शिवसेना नेते तथा दैनिक सामना चे कार्यकारी संपादक खा. संजय राऊत हे मराठवाडा दौऱ्यावर असताना दि. १९ मे रोजी लोहा येथे आले. लोहयात शिवसेनेचे लातूर जिल्हा संपर्क प्रमुख तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या बिडवई नगर येथील कैलास स्मृती निवासस्थानी भेट दिली. शिवसेना नेते खा.संजय राऊत यांचे आगमना प्रसंगी दोन जेसीबी च्या साहाय्याने पुष्पवृष्टीने भव्यदिव्य जंगी स्वागत करण्यात आले. लातूर जिल्हा संपर्क प्रमुख तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण व माजी नगराध्यक्षा सौ. आशाताई रोहिदास चव्हाण यांच्या वतीने लोह्याच्या परंपरे नुसार शाल पुष्पहार व भव्य दिव्य मोठा वजनाचा खारीक खोबऱ्याचा हार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. राज्यातील शिवसेनेचे महत्वपूर्ण नेते जेष्ठ पत्रकार तथा दैनिक सामनाचे संपादक खा. संजय राऊत हे व्यक्तिमत्त्व विचाराने अतिशय रोखठोक लेखणीच्या माध्यमातून समाजप्रबोधन करत न्याय मिळवून देणारे व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाते.खा.संजय राऊत यांच्या सोबत माजी खासदार सुभाष वानखेडे, नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, जिल्हाप्रमुख विनोद पावडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी सर्व मान्यवरांची चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी नगरसेवक संभाजी पाटील चव्हाण, खरेदी विक्री संघाचे संचालक भिमराव पाटील शिंदे, शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण, शिक्षक सेनेचे तालुकाध्यक्ष संभाजी पवार, पतपेढीचे माजी चेअरमन बी.वाय. चव्हाण, माजी नगर सेवक दत्ता कांबळे, रामकिशन पारेकर, अशोक केंद्रे कैलास कहाळेकर, लोहा सेवा सोसायटीचे चेअरमन गोविंद चव्हाण, बालाजी पाटील, मोहन वाघमारे शिवसैनिक, युवासेनेचे, शिक्षकसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# होल्डिंग हँड्स पुणे शाखेकडून मजुरांना कपडे वाटप

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** पुण्यामध्ये कामाच्या निमित्ताने येणाऱ्यांचा लोंढा खूप आहे. घरे नसल्याने काही मजूर रस्त्यावरच गुजराण करीत असतात, असे अनेक मजूर रस्त्यावर झोपडीतून राहत असतात. अशा मजुरांना होल्डिंग हँड्स पुणे शाखेने येरवडा येथे कपडे वाटप केले. तसेच लहान मुलांना खेळणी आणि खाऊ वाटप करण्यात आला. यावेळी होल्डिंग हँड्सचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर, पुणे जिल्हाध्यक्ष अपर्णा मेहता, राज्य विभाग सतीश इंदापुरकर, रोजगार प्रमुख पूर्वा शिरोळकर, प्राची सिरसीकर, अपर्णा चक्रवर्ती, स्वामी वाघ इत्यादी उपस्थित होते. सुरेश सिरसीकर संस्थापक व अध्यक्ष असलेल्या छ. संभाजीनगर ( औरंगाबाद ) ची होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था ही देश पातळीवर काम करीत असून दिल्ली, पंजाब, गोवा व कर्नाटकात या संस्थेच्या शाखा आहेत. ही संस्था आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी असलेले अनेक उपक्रम राज्य व राज्याबाहेर राबवित असते.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
* मासिक पाळी अनियमित असणे
* हॉर्मोन्स चे असंतुलन
* मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
* PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
* मासिक पाळी बंद होणे
* वारंवार गर्भपात होणे
* श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
* शुक्राणु कमी असणे
* शुक्राणुची गती कमी असणे
* शुक्राणु स्खलन
* स्वप्न दोष
* सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सल्टींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# उकळत्या दुधाच्या कढईत पडून मुलीचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** उकळलेल्या दुधाच्या कढईत पडून गंभीररित्या भाजलेल्या मलकापूरच्या ओमश्री जाधव हिने मृत्यूशी तब्बल तीन आठवडे झुंज दिली. मात्र, ही झुंज अपयशी ठरली. शुक्रवारी तिचा मृत्यू झाला. यामुळे मलकापूर शहरात हळहळ व्यक्त होत आहे. मलकापूर येथील हनुमान दूध डेअरीचे संचालक युवराज जाधव नांदुरा रस्त्यावरील जाधववाडीत वास्तव्यास आहेत. घराच्या आवारात त्यांनी व्यवसाय थाटला आहे. मागील २७ एप्रिलला त्यांनी नेहमीप्रमाणे मोठ्या भांड्यात दूध उकळून मोठ्या कढईत ठेवले होते. सहा वर्षीय कन्या ओमश्री ही इतर चिमुकल्यांसमवेत खेळताना अनावधानाने त्या दुधाच्या कढईत पडली. घरच्यांनी तिला बाहेर काढून उपचारासाठी स्थानीय रुग्णालयात नेले. प्राथमिक उपचारानंतर गंभीर जखमी ओमश्रीला प्रथम जळगाव खान्देश येथे व नंतर मुंबई येथील रुग्णालयात हलवण्यात आले.